शनिवार । ९ मे १९८१ । एक रुपया

# माणूस

मुक्काम निपाणी....



डावीकडून...प्रा. रमेश शिपुरकर, प्रा. सुभाष जोशी, श्री. शरद जोशी, तंबाखू कामगार स्त्रिया, एस्. आर्. पी....( छायाचित्र : सरोजा परुळकर )

लेखमाला....पृष्ठ ९ वर

## णमो अरिहंताणं !

¤ २३ दिवस आमच्या डोळ्यांसमोर संयतपणे उसळणारा रस्ता रोको आंदोलनातील शेतकऱ्यांचा प्रशांत सागर अजून नजरेपुढून हलत नाही. टाळ-मृदुंग, सभा, घोषणा ह्यांचे ध्वनी अजूनही कानांत प्रतिध्वनित होत आहेत. निपाणीच्या इतिहासात अभूतपूर्व अशी ही शेतकऱ्यांची एकजूट आणि अन्यायाला वाचा फोडण्यासाठी आजपर्यंत इतिहासात प्रथमच लाभलेले हे व्यासपीठ. कसदार नेतृत्व लाभताच आजपर्यंत कोंडलेले नि:श्वास, दडपलेला आवाज आणि दबलेली चीड आता इथं बाहेर पडू लागली होती. मनावरील दडपण झुगारून देताच नवचैतन्याचं पिसं अंगात भरून राहिलं. सभा, भाषणं, टाळ, मृदुंग, भजनं अशा विविध प्रकारे दबलेला आवाज मोकळा होऊ लागला. रोज संध्याकाळी सभा. सभेतील भाषणांना १५-२० हजार शेतकऱ्यांचा एकमुखी प्रतिसाद. शेवटी हात उंचावून घोषणा. न्याय मिळवण्याचा निर्धार. सहभोजनं. चर्चा. अलोट उत्साह पण मर्यादशील, संयत वातावरण. हे सगळं संपवलं ते ६ एप्रिलच्या बेछूट गोळीबारानं. चैत-

→

ऱ्याने फुललेले देह निश्चेतन होऊन पडले. घोषणा देणारे दमदार आवाज वेदनानी व्याकुळ होऊन केविलवाणेपणे 'पाणी, पाणी' करू लागले. हर्षानं व त्वेषानं वर उठणारे हात जागेवर राहिलेच नाहीत! मंदिराचं स्मशान झालं. चैतन्याची राख झाली!

'शेतकरी हा या देशाचा मालक आहे, त्यानं जबाबदारीनंच वागलं पाहिजे,' हे नेत्याचे उद्‌गार सार्थ करताना २३ दिवस शेतकऱ्याच्या संयमाची पराकोटी झाली. दंगा अजिबात झाला नाही!

तरीही लाठीमार झाला, गोळीबार झाला. मग रक्तपात, पळापळ, मरणप्राय वेदना आणि अचानक बसलेल्या आश्चर्य व दुःख यांच्या धक्क्यातून लोक अजून सावरले नाहीत तोच गोळीबाराची पुढची फैर! पुन्हा पळापळ, मग मृत व जखमीच्या जिवलगाची हृदय हेलावणारी निवेदनं. आक्रोश. त्यांच्या आक्रोशातूनच तंबाखू व्यापाऱ्यांच्या आतापर्यंतच्या पिळवणुकीचं सूत्र ठळकपणे समोर मांडलं गेलं आणि मग माझ्या डोळ्यासमोर दोन वर्षांपूर्वी निपाणीमध्ये घुमलेला अहिंसेच्या उपासकांचा धर्मजागर उभा राहिला.

णमो अरिहंताणं! १९७९ मधल्या चातुर्मासात परमपवित्र जैनसाधु आचार्यदेव श्री. पद्मसागरमहाराज ह्यांची प्रवचनं जुलै ते नोव्हेंबर ह्या कालावधीत दररोज व्हायची. निपाणीतील सर्व थरांतील नागरिक लोटायचे. श्रोत्यामध्ये अग्रभागी असत ते निपाणीतील धनिक व्यापारी व त्यांचे सुपुत्र! ही मंडळी कपाळाला गंध, हातात चांदीच्या डब्यात पूजासाहित्य अशा थाटात नतमस्तक होऊन महाराजांच्या मुखावाटे महावीराचा उपदेश ऐकत, डोकी टेकत व महाराजाचा जयजयकार करीत. महाराज नीरक्षीरविवेकी. ते भक्तीची सोंगं वठवणाऱ्या अवडंबरावर हसत हसत कोरडे ओढत. आपल्या प्रवचनामधून ते नेहमी सांगत, 'भगवान महावीर हे अहिंसेचे उपासक व समाजवादाचे महान पुरस्कर्ते होते. मी महावीरांचा एक सेवक आहे. लोक मला विचारतात की, प्रवचनाचे वेळी श्रीमंताना जवळ बसवून घेण्याचा हा कुठला समाजवाद? मी त्याना सांगतो की, एखाद्या क्वालिफाईड डॉक्टरकडे रोग्यांची रांग लागलेली असते. एकामागोमाग एक असे रुग्ण तपासले जात असतात. अशा वेळी एखादा सीरियस, अत्यवस्थ रुग्ण आला तर ते त्याला रांगेत उभे करतात काय? नाही. त्याच्याकडे प्रथम लक्ष पुरविले जाते. आम्ही विरागी साधु हे क्वालिफाईड डॉक्टर आहोत आणि प्रवचनाला येणारे लोक हे रुग्ण. श्रीमंत लोक हे सीरियस रोगी आणि म्हणूनच त्याना पुढे बसवून घेऊन त्यांच्यावर सक्त देखरेख ठेवली जाते.' पुढ्यातल्या तंबाखू सम्राटाना असा चिमटा घेऊन ते एक गोष्ट सांगत —'एकदा एक मनुष्य आपल्या मांजराला घेऊन दरबारात राजाकडे आला व त्याने सांगितले की गेले पाच महिने मी सक्त परिश्रम घेऊन ह्या मांजराला काठीच्या तालावर नाचायला शिकविले आहे. मांजराची एकाग्रता अशी की, समोरच्या काठीवरून त्याचे लक्ष मुळीच विचलित होत नाही. राजाने दरबारात मांजराच्या नृत्याला परवानगी दिली. काठीच्या तालावर मांजर नाचू लागले. इतक्यात प्रधानजीने चलाखीने तेथे एक उंदीर सोडून दिला. उंदीर पहाताच नृत्य, मालक व त्याची काठी विसरून मांजराने त्याच्यावर झडप घातली.' ही गोष्ट सांगून महाराज म्हणत, 'तुम्हीही दररोज न चुकता येथे येता, कपाळाला गंध लावता, एकाग्रतेने प्रवचन ऐकता, मान डोलावता. पण येथून उठून पेढीवर जाऊन बसल्यावर समोर गिऱ्हाईक दिसलं की प्रवचन, महाराज, महावीर सर्व काही विसरून त्याच्या खिशावर झडप घालता. पुन्हा दुसरे दिवशी प्रवचनात तीच एकाग्रता!'...व्यापाऱ्यांनी ह्या उपहासातून काहीच बोध घेतला नाही.

निपाणीत आंदोलनाच्या बंदोबस्तासाठी आलेल्या पोलीस-जीप्स् व्यापाऱ्याच्या दारात झुलताना अनेकदा निपाणीकरांनी पाहिल्या होत्या. आंदोलन-विरोधात निघालेल्या मोर्चात हेच व्यापारी व त्यांचे सुपुत्र अग्रभागी होते. आंदोलनातील दोन नेते सुभाष जोशी व भाई धारिया ह्यांच्या घरावर ही मंडळी दीर्घकाळ दगडफेक करीत असताना पोलिसांची निळी व्हॅन सुरक्षित अंतरावर उभी असलेलीही निपाणीकरानी पाहिली होती. पण दगडफेक करणाऱ्या कोणालाही अटक झाली नाही. त्याचवेळी शेतकऱ्यांच्या व एका पत्रकाराच्या मोटार सायकलीची मोडतोड करण्यात आली. पोलिसानी काहीच दखल घेतली नाही. त्याच दिवशी रात्री व्यापाऱ्यांचे शिष्टमंडळ पोलीस अधिकाऱ्याना भेटते व दुसरे दिवशी पहाटेपासून अटकसत्र सुरू होते. मग लाठीहल्ला व अखेर गोळीबार. सगळ्या घटना अगदी सुसंगत, क्रमवार घडत गेल्या. व्यापारी व पोलीस ह्यांचे हात एकमेकात गुंतले होते, ह्याबद्दल कुणालाच शंका नाही. डझनावारी शेतकऱ्याच्या रक्ताचे पाट वाहिल्यानतर वाहतुकीला खुला झालेल्या

मलपृष्ठ २ वर

**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे

अंक : एकूणपन्नासावा

९ मे १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

पुणे वार्ता

# वसंतराव देशपांडे आणि ' कट्यार '

डॉ. वसंतराव देशपाडे. हिंदुस्थानी संगीताच्या क्षेत्रात मोठा दबदबा निर्माण केलेलं नाव. ' डॉक्टर ' ही पदवीही त्याच क्षेत्रात मिळवलेली. हिंदुस्तानी संगीताचा विचार करताना कुमार गंधर्व आणि भीमसेन जोशी याच्या नावानं दोन बोटं घातल्यावर तिसऱ्या बोटावर वसंतरावांचंच नाव येतं.

पण हे दोन धुरंधर जिथं पोचू शकलेले नाहीत अशा आणखीही एका क्षितिजाजवळ वसंतराव जाऊन पोचले आहेत. ते क्षितिज आहे संगीत रंगभूमीचं. मराठी संगीत रंगभूमीचा डोलारा कोसळण्याची शक्यता निर्माण झाली असतानाच पुरुषोत्तम दारव्हेकरांचं ' कटयार काळजात घुसली ' हे तसं गद्य शीर्षक असलेलं नाटक ' नाटयसंपदा '-ने रंगभूमीवर आणलं आणि त्यानं सारी मरगळ धुऊन टाकली. या यशामध्ये दारव्हेकर आणि नाटकाचे संगीतकार पं. जितेंद्र अभिषेकी यांच्याबरोबरच 'कटयार'-मध्ये मुख्य भूमिका करणाऱ्या वसंतरावाचाही फार मोठा वाटा आहे.

शुक्रवार, ता. एक मे रोजी पुण्यातल्या बालगंधर्व रंगमंदिरात ' कटयार ' चा ५२५ वा प्रयोग सादर करण्यात आला. या निमित्त आयोजिलेल्या खास समारंभात वसंतरावाचा एकसष्टिपूर्तीनिमित्त सत्कारही करण्यात आला. राज्याचे सांस्कृतिक मंत्री जयंतराव टिळक समारंभाचे प्रमुख पाहुणे होते आणि पं. महादेवशास्त्री जोशी अध्यक्षस्थानी होते.

' बालगंधर्व ' च्या सर्व परिसरात केलेली उत्कृष्ट विद्युत्‌रोषणाई, रसिकाचं पुष्पवृष्टी करून होणारं स्वागत, मध्यंतराला ' नाटयसंपदा ' तर्फे कॉफीपान यामुळं हा एक हृद्य कौटुबिक सोहळा होता.

' कटयार ' चा पहिला अंक संपला आणि वसंतरावाच्या सत्काराचा कार्यक्रम सुरू झाला. पुरुषोत्तम दारव्हेकर, जयंतराव टिळक, पं. महादेवशास्त्री जोशी यानी वसंतरावाच्या गौरवपर भाषणे केल्यानंतर प्रसिद्ध विनोदी नट शरद तळवलकर यांनी सर्व कलाकार व रसिकाच्या वतीनं घसघशीत पुष्पहार घालून वसंतरावाचा सत्कार केला. ' कटयार ' मध्ये काम करणाऱ्या रंगमचावरील व पडद्यामागील कलाकार-तंत्रज्ञांचाही सत्कार करण्यात आला.

वसंतरावांचा गुणगौरव करणाऱ्या तिन्ही वक्त्यांच्या बोलण्याचा मुख्य सूरे एकच होता— ' वसतराव, निवृत्त होऊ नका ! '

वक्त्याची ही भीती बरीचशी साधार होती, पण त्यावरच तिघानीही भर दिल्यामुळं वसंतरावाचं गायक–नट म्हणून आणि हिंदुस्थानी संगीतात मोठं स्थान मिळवलेला बुद्धिमान गायक म्हणून असलेलं स्थान रसिकासमोर फारसं आलंच नाही.

हा आग्रह बराचसा निव्वळ प्रेमापोटी असतो, हे गृहीत धरलं तरी समारंभात तोच मुख्य चर्चेचा विषय व्हावा, असं काही नाही. उलट, ज्यान संगीताच्या क्षेत्रात आपली सारी हयात घालवली आहे त्यातून तो निवृत्त व्हायचं म्हटलं तरी होऊ शकणार नाही, हे लक्षात घेता या हयातीत त्याचं संगीतक्षेत्राला नेमकं Contribution काय यावर वक्त्यानी जास्त भर द्यायला हवा होता, असं सहज जाताजाता वाटलं.

वसंतरावानी सत्काराच्या उत्तरादाखल केलेलं भाषण मात्र ' सत्कारमूर्ती ' नं कसं भाषण करावं, याचं उत्कृष्ट उदाहरण होतं. ' एखादं चांगलं नाटक हाती आल्यास मी अजूनही त्यामध्ये भूमिका करण्याचा प्रयत्न करेन, ' असं आश्वासनही वसंतरावानी दिलं.

या सत्कारसमारंभाबरोबरच ' कटयार ' चा नेहमीप्रमाणेच रंगतदार प्रयोग झाला. प्रयोग सपेपर्यंत पहाटचे चार वाजून गेले; पण ' बालगंधर्व ' मधून बाहेर पडल्यावरच घडयाळाच्या काटयाकडे प्रेक्षकाचं लक्ष गेलं. ' कयार ' नं ५२५ व्या प्रयोगापर्यंत मजल मारण्यामागचं रहस्य यामध्येच होतं.

— प्रतिनिधी

# गैरकृत्यांची किंमत एक दिवस द्यावीच लागते !

वा. दा. रानडे

प्रा. स. शि. भावे याच्या बडतर्फी संबंधात पुणे विद्यापीठाच्या न्यायाधिकरणाचे न्यायमूर्ती सुराणा यानी जो निर्णय दिला त्यासंबंधी मी लिहिले, त्याच वेळी आणखी एका प्रकरणासंबंधी लिहिण्याचा माझा विचार होता; पण त्या वेळी पूर्ण निकालपत्र माझ्या हाती आलेले नव्हते. आताही प्रकरण हायकोर्टाकडे गेलेले असल्याने मतप्रदर्शन करता येणार नाही; पण या विषयाकडे लक्ष वेधण्यासाठी सिव्हिल जज्जाच्या निकालपत्रातील मुद्दे देत आहे.

प्रकरण आहे नंदुरबारच्या गजमल तुळशीराम पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य अण्णासाहेब नारायणराव जोधळे याच्या नेमणुकीसंबंधी. या प्रकरणासंबंधी पूर्वी काही वृत्तपत्रात बातम्या येऊन गेल्या आहेत; पण सविस्तर निकालपत्र स्थानिक वृत्तपत्रे सोडल्यास कोठे आल्याचे माझ्या पाहण्यात नाही. नंदुरबारचे सिव्हिलजज्ज ( ज्युनिअर डिव्हिजन ) श्री. डी. एच्. पराजपे यांच्यापुढे हा दावा होता. नंदुरबार तालुका विधायक समितीतर्फे हे महाविद्यालय चालविले जाते. संस्थेचे चेअरमन गजमल तुळशीराम पाटील यानी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी जोधळे याची केलेली नेमणूक बेकायदा आहे, असा दावा महाविद्यालयाचे दोन प्राध्यापक श्री.

आनंदराव सोपानराव देशमुख आणि श्री. वीरेन्द्र नथूभाई शहा यांनी केलेला होता. सिव्हिल जज्जांनी १६।३।८१ च्या निकालपत्रात तो मान्य करून जोंधळे यांना प्राचार्य म्हणून काम करण्यास कायमची मनाई केलेली आहे. प्रा. देशमुख व प्रा. शहा यांनी प्राध्यापकांतर्फे हा प्रातिनिधिक दावा केलेला होता.

या प्रकरणाची पूर्वपीठिका निकालपत्रात जेवढी आली तेवढीच येथे देत आहे. श्री. जोधळे १९६८ पासून २० ऑगस्ट १९७९ ला त्यांनी राजिनामा देईपर्यंत महाविद्यालयाचे प्राचार्य होते. त्याना प्राचार्यपदावरून दूर करावे असे आदोलन विद्यार्थी, पालक, प्राध्यापक व नागरिक यांनी केले होते आणि त्यात त्यांच्या चारित्र्याबद्दल आरोप केले होते. महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी ॲन्ड कॉलेज टीचर्स ऑर्गनायझेशन आणि संस्था याच्यात वाद निर्माण होऊन तो हायकोर्टात गेला होता. तेथे तडजोड झाली. त्यानुसार प्राचार्य, प्राध्यापक यांच्या नेमणुका, पगार वगैरेबाबत सरकारने २५ ऑक्टोबर १९७७ ला एक ठराव केला. निवडसमिती नेमून प्राचार्यांची नेमणूक करावी, निवड समितीवर गव्हर्निंग बोर्डाचे चेअरमन, गव्हर्निंग बोर्डाचा एक सभासद, कुलगुरूंनी नेमलेले दोन सभासद, आणि शिक्षणसंचालक (उच्चशिक्षण) यांनी नेमलेला एक सभासद असावा, नेमणुकीस कुलगुरूंची मान्यता हवी, गुणवत्तेवर व सर्व भारतात जाहिरात देऊन नेमणूक व्हावी, एम्. ए. परीक्षेत उच्च द्वितीय श्रेणी (बी+), एम्फिल पदवी किंवा एम्. ए. च्या पातळीवरची पदवी ही त्याची शैक्षणिक पात्रता असावी इत्यादी मुद्दे मान्य करण्यात आले; पण जोधळे याची प्राचार्य म्हणून नेमणूक करताना ही पद्धती अवलंबिली गेली नाही; कुलगुरूंनी यासंबंधात ७ जानेवारी १९७८ ला एक आदेश काढला. तो आपल्याला मिळालेला नाही, कॉलेजच्या ऑफिसात तो मिळत नाही, असे संस्थेतर्फे सांगण्यात आले. हे कारण खोटे आहे, असे मत सिव्हिलजज्जानी निकालपत्रात दिले आहे. कुलगुरूंनी पुणे विद्यापीठ कायद्याच्या कलम ६ (ब) अनुसार हा आदेश काढला होता. हा आदेश म्हणजे कायदाच आहे, असे सिव्हिलजज्जानी म्हटले आहे; त्यासाठी श्री. मलिक यांच्या 'लॉ ऑफ एव्हिडन्स' खंड २ चा आधार त्यानी घेतला आहे. त्यात पा. ७४५ वर म्हटले आहे, 'विधिमंडळाच्या कायद्यानुसारच सरकारने किंवा सरकारने अधिकार दिलेल्या व्यक्तींनी आदेश काढले तर तो कायद्याचाच भाग समजून त्याची तशी दखल घेतली गेली पाहिजे.' प्राचार्य कोणत्या पद्धतीने नेमावा, त्याची शैक्षणिक पात्रता काय असावी हे या आदेशात दिले आहे; पण जोधळे याची प्राचार्य म्हणून नेमणूक करताना त्यातल्या अटी संस्थेच्या चेअरमननी पाळल्या नाहीत, त्यांनी निवड समिती नेमली नाही, अर्ज मागविले नाहीत. श्री. जोधळे यानी प्राचार्यांच्या जागेसाठी अर्ज दिलेला नव्हता. आदेशात दिलेल्या अटीनुसार त्यांची शैक्षणिक पात्रताही नाही. योग्य पात्रतेचे उमेदवार उपलब्ध नसतील तरच कमी पात्रतेच्या उमेदवाराची नेमणूक करता येईल. या जागेसाठी तेवीस व्यक्तींचे अर्ज असताही त्यांपैकी एकालाही मुलाखतीसाठी बोलावले नाही. त्यांपैकी काही डॉक्टरेट पदवी असलेले आणि दीर्घानुभव असलेले होते.

सरकारचा २५।१०।७७ चा ठराव आमच्यावर बंधनकारक नाही, असे संस्थेतर्फेच्या वकिलांनी सांगितले. कायदा न पाळण्याची वृत्ती त्यात दिसते. मी गुन्हा करीन, पण इंडियन पिनल कोडच्या तरतुदी मला लागू नाहीत, असे म्हणण्यासारखाच हा युक्तिवाद आहे, असे निकालपत्रात म्हटले आहे.

जोधळे यांची नेमणूक गुणवत्ता विचारात घेऊन झाली का, या मुद्द्याची चर्चा करताना सिव्हिल जज्ज म्हणतात, 'जोधळे मद्यपी आहेत. ते जुगार खेळतात, ते भ्रष्टाचारी आहेत, अनेक गैरव्यवहार त्यांनी केले आहेत, असे आरोप वादींनी केले असून त्याच्या समर्थनार्थ तोंडी व कागदपत्राचा पुरावा सादर केला आहे' श्री. सुभाष चोधरी याच्या साक्षीचा उल्लेख निकालपत्रात केला आहे. आपण जोधळे यांना कॉलेजआवारात चार-पाच वेळा दारू पिताना पाहिले, पंचवीस-तीस वेळा झिंगलेल्या स्थितीत पाहिले, चार-पाच वेळा कॉलेजात जुगार खेळताना पाहिले, सुवर्णचषकविजेता विद्यार्थी सलीम कुरेशी कॉलेजात पुस्तके घेण्यासाठी गेला असता जोधळे यांनी मद्याच्या अंमलाखाली त्याच्यावर हल्ला केला, परीक्षा चालू असता कॉलेजच्या ऑफिसमध्ये त्यांनी दोन वेश्या आणल्या, त्या वेळी ते पूर्णपणे मद्याच्या अंमलाखाली होते, वेश्यांना घेऊन येणाऱ्या दोन इसमाचे पोलिसांशी भाडण झाले, पण पोलिस-केस दडपून टाकण्यात आली इत्यादी आरोप साक्षीमध्ये करण्यात आले होते. या घटनांमुळे विद्यार्थ्यांत तीव्र असंतोष निर्माण झाला, त्यांनी श्री.जोधळे यांच्यासंबंधी शहरात पोस्टर्स लावली. विद्यार्थी कृती समिती स्थापन केली. समितीने ९ मार्च १९७९ ला व्यवस्थापनास निवेदन दिले, मोर्चा काढला. विद्यार्थ्यांनी अन्नसत्याग्रह केला. १४ मार्चला नंदुरबार बंद पाळला. जाहीर सभा झाल्या. प्रांतअधिकाऱ्यांनी हस्तक्षेप केल्यावर व्यवस्थापनाने जोंधळे यांना तीन महिने रजेवर जाण्यास सांगितले व चौकशी समिती नेमली. राज्यपालांना निवेदन सादर करण्यात आले. चौकशी समितीने आपले निष्कर्ष सादर केले नाहीत, त्यामुळे ते एक नाटकच होते अशी लोकांना शंका वाटते, असे निकालपत्रात म्हटले आहे. चौकशी समितीचे काय झाले, असे सिव्हिल जज्जानी दोन्ही बाजूंच्या वकिलांना विचारले तेव्हा आपणास काही माहीत नसल्याचे त्यांनी सांगितले. चौकशीचे काय झाले हे प्रतिवादीना माहीत असले पाहिजे, पण ते त्यांना सांगावयाचे नाही असे आपले मत झाल्याचे सिव्हिल जज्जानी नमूद केले आहे. विद्यार्थ्यांनी पुन्हा आंदोलन सुरू केली आणि अखेर २० ऑगस्ट १९७९ ला श्री जोधळे यानी राजिनामा दिला ! ४ जून १९८० ला प्राचार्य म्हणून त्यांची पुन्हा नेमणूक करण्यात आली.

श्री. चौधरी याच्या साक्षीशिवाय इतर काहीसा क्षीचाही उल्लेख निकालपत्रात केला आहे.

श्री. जोधळे यांची नेमणूक तात्पुरती असल्याचा युक्तिवाद प्रतिवादीतर्फे करण्यात आला; पण सिव्हिल जज्जांनी तो ग्राह्य धरला नाही. कारण नेमणुकीच्या पत्रात तात्पुरता हा शब्द नाही. विद्यापीठालाही ही नेमणूक तात्पुरती असल्याचे कळविलेले नाही.

'कॉलेजासारख्या शिक्षणसंस्थाची सध्याची' स्थिती काय आहे आणि विद्यापीठाचे त्याच्यावर कितपत नियंत्रण आहे

धोवर या दाव्याने प्रकाश पडतो, ' असे मत व्यक्त करून सिव्हिल जज्ज निकालपत्रात म्हणतात, ' कायद्यातून पळवाट काढण्याचा तुम्ही कितीही प्रयत्न केला तरी एक दिवस तुम्हाला तुम्ही केलेल्या गैरकृत्यांची किंमत द्यावी लागेल. या दाव्यावरून असे दिसते की, जेव्हा अन्याय कळसाला पोहोचतो तेव्हा सामान्य माणूसही जिवाला धोका पत्करून त्याविरुद्ध लढण्यासाठी रस्त्यावर येतो. हा साराच प्रकार असा आहे की, एखाद्या हुकूमशहालासुद्धा क्षणभर वाटेल की, हुकूमशाही वाईट आहे. प्रतिवादींनी कायद्याबद्दल पूर्ण अनादर दर्शविला आहे. ' □

मुक्ताफळे

# विलायतेतले सुख

आम्ही रोज सकाळी प्रथम वर्तमानपत्र वाचतो. सगळेच वाचतात म्हणा. एखादे दिवशी वर्तमानपत्र बंद असले तर चुकल्या-चुकल्यासारखे वाटत रहाते. व्यसन तसे दांडगेच; परंतु या व्यसनानं माणूस सुखी होतो का ? वृत्तपत्रे निघून शंभरावर वर्षे झाली. ' केसरी ' पत्राची नुकतीच शताब्दी झाली. ' केसरी ' च्या पहिल्या अंकात ' केसरी 'कर्त्यांनी प्रलोभन दाखवले होते–

' विलायतेत खुद्द महाराणीसाहेबापासून व मुख्य प्रधानापासून तो अगदी छोटया सरकारी कामगारांपर्यंत, , राणीच्या कारभाराकडे लोकाची नजर वर्तमानपत्राच्या द्वारे सारखी लागून राहिलेली असते. यामुळे कोणताही अन्याय प्रायः छपला जात नाही. (जाड ठसा आमच्या छापखान्याचा) व यामुळे तेथील लोक सुखी आहेत ही गोष्ट सर्व प्रसिद्धच आहे ! '

म्हणजे भारतात वृत्तपत्रे सुरू झाल्यापासून जे सुख निर्माण होऊन सारखे आले वाढ तेच आहे ते हिशेबात धरता, हल्ली सगळीकडे सुखी माणसाचे तांडेच्या तांडे सर्वत्र दिसायला हवे होते; पण तसे काहीच झाले नाही. भारतात तूर्त महाराणी व पंतप्रधान ही पदे एकरूप आहेत. मुख्यमंत्री अनेक आहेत. कोणताही अन्याय प्रायः छपला जात नाही तर छापला जातो. सगळे खरे हो; पण छापता येत नाहीत असे काही अन्याय नसतात का ?

आमच्या शेजारचे प्रा. अगडबंबवार रोज सकाळी मिळतील तेवढी वर्तमानपत्रे वाचतात. ज्ञानाच्या या पवित्र गंगा–यमुना प्राशन केल्याखेरीज ते चहाचा कप खाली ठेवीत नाहीत ! नुकताच मी सकाळीच त्याच्याकडे गेलो असता ते पलंगावर वर्तमानपत्राच्या गराडयात बसले होते. पत्नीने चहा आणला व मी आलेलो पाहून त्या म्हणाल्या–

' अहो...अहो ऽऽ ! तुम्ही ही वर्तमानपत्रं वाचू नका बाई सकाळी सकाळीच ! '

मी सौ. अगडबंबवारांकडे आश्चर्याने ' का वाचू नका बुवा ! ' या अर्थाने पाहताच त्या म्हणाल्या–

' अहो, हे वर्तमानपत्रं नुसते वाचत नाहीत-सारख्या तोडाने शिव्या चालू असतात. ' पाजी कुठले ! हरामखोर आहेत ! वाटेल ते बोलतात. चाबकाने फोडून काढले पाहिजेत ! '–असं चालू असतं. मी म्हणते वाचावं काय वाचायचं ते आणि आपलं गप्प बसावं ! हो की नाही ? '

शेवटचा प्रश्न मला असूनही प्राध्यापक उसळले.

' गप्प बसावं– कसं गप्प बसावं ? अहो, काय वाटेल ते छापतात, कुणी मूर्खासारखे बहकला–छापतात, कुणी राजकारण-संन्यास घेतोय प्रत्येक हंगामाला ! छापली वातमी कुणाला: सक्तीचे आतरजातीय विवाह हवेत. अरे, कुणी लावायचे ? कसे लावायचे ? छापली वातमी. मागे छापलान संजय गांधीच्या जीपवर गोळीबार ! एवढा मथळा ! सगळं खोटं. आता म्हणतात, पंधरा दिवस आधीच कुणी तरी विमानाला घातपात केला–आज वाचावं ते उद्या खोटं ! उद्या छापतील ते परवा खोटं–'

प्रा. अगडबंबवारांचा वैताग सर्वांनाच भोगावा लागतो, भोगला पाहिजे. वृत्तपत्रे हे समाजाचे डोळे आहेत. डोळे म्हटले की, भलभलतं दिसायचं. मोतीबिंदू व्हायचा. सहन करायला हव. आता आपलंच पहा ना.

झोपडपट्टया दुरून पाहिल्या तरी आपल्या पोटात खड्डा पडतो. पहिला पाऊस पडताना पाहिला की मन क्षणभर थरारून उठतं. वाटतं ही बरसात थाबूच नये. मग झोपडपट्टया आठवतात. पाण्यात तरंगणाऱ्या झोपडया दिसू लागतात. आनंद संपतो. महाराष्ट्राचे नगरविकासमंत्री रामराव आदिक यांनी यावर तोडगा काढला की, रहात्या जागेचा चटईनिर्देशाक वाढवून द्यायचा. ते म्हणाले, 'वर्षानुवर्षे झोपडपट्टीत जिणे कंठणाऱ्यांना चागला आसरा मिळवून द्यायचा असेल तर सरकारला हे पाऊल उचलल्यावाचून गत्यंतर नाही ! '

किती छान होते हे पाऊल ! म्हणजे शंभर झोपडपट्टयातून राहणाऱ्या माणसाना, त्या ठिकाणी एक गगनचुंबी इमारत बांधून तिच्यातच त्यांना जागा द्यायच्या. झोपडपट्टीतील लोकाना मग स्वतंत्र संडास, बाथरूम, वर–खाली जायला यायला लिफ्ट, घरात इलेक्ट्रिसिटी. त्यामुळे मजल्यामजल्यावर टी. व्ही. आम्ही ही योजना वर्तमानपत्रात वाचली त्या दिवशी दिवस कसा छान गेला ! कुठेही झोपडपट्टी नाही ! रामरावाचे रामराज्य डोळयापुढे आपलं चटईसारखं उलगडत होतं. इकडे चटई, तिकडे चटई. एकदोन झोपडयात जाऊन चौकशी करून आलो की आमच्या चिरंजिवाना काही दिवस तिथे जागा मिळेल का ? लग्न थाबलय हो त्याच जागेकरता ! जागा मिळाली तर चार-दोन महिने तिथे काढील. मग डायरेक्ट स्कायस्क्रेपरमध्येच !

दुसऱ्या दिवशी ख्यातनाम वास्तुशास्त्रज्ञ ज ग बोधे याची मुलाखत !

'रोज मुंबईत सुमारे तीन हजार लोक बाहेरून येतात. हा लोंढा तुम्ही थांबवणार आहात काय ? लोक येणार. झोपड्या बांधणार. नंतर त्याला शासन मान्यता देणार. जमीन कुणाची ? बुडाले कोण ? काही पाहणार नाही. झोपडपट्टी हे जोपर्यंत राजकीय बळ आहे, तोपर्यंत चटईनिर्देशांक वाढवून काहीही होणार नाही... या लोकांचा मतांचा अधिकार काढून घ्या आणि मग पहा झोपडपट्टी वाढते का ?... यापूर्वी झोपडपट्टीवासीयांना चांगल्या जागा देण्याचा प्रयोग झाला नाही की काय ? त्याचे काय झाले ? त्यांनी त्या जागा इतरांना भरमसाठ पैसे घेऊन विकल्या आणि ते नवीन झोपडपट्टीत रहायला गेले की नाही ? मग आपण अनुभवावरून शहाणे होणार की नाही ?'

श्री. बोधे हे काही मंत्री नाहीत. वास्तुशास्त्रज्ञ आहेत. म्हणजे त्यांनी काही अभ्यास केलेला आहे. काही परीक्षा दिल्या आहेत. घरबांधणी या विषयातले ते तज्ज्ञ आहेत. यामुळे बोध्यांचा हा बोध वाचून, चटई वाढवून निर्माण होणाऱ्या आमच्या सुखकल्पनेचा २४ तासांत पार बोजवारा उडाला! झोपडपट्टी निर्मूलन ही भ्रामक कल्पना पार पळाली. उलट मुंबईत रोज तीन हजार लोक घुसतात, हे वाचून रात्रभर झोप लागली नाही. मुळात रामरावांची शेखमहंमदी वर्तमानपत्रांनी छापली नसती, किंवा आम्ही ती निदान वाचली नसती तर बोध्यांची लाथ आमच्या मडक्याला बसली नसती; पण हे वाचन नडतं बघा !

एप्रिलच्या १९ तारखेला महाराणी मुंबईत आल्या. खिलाफत हाऊसच्या उद्घाटनाला. वर्तमानपत्रांनी त्यांच्या भाषणाचा अहवाल दिला—

' हिंदू–मुस्लिम ऐक्य राहाणे व हिंदुस्तानी जीवनात मुस्लिमांचे अभिसरण घडवणे यासाठी जी खिलाफत चळवळ गांधींनी उभारली त्यामुळे आपला देश अनेक संकटांचा मुकाबला करून कायम राहिला !'

बोडक्याचे अभिसरण ! यातले एक वाक्य तरी खरं आहे का ? खिलाफतीमुळं मुस्लिम जातीयवाद बोकाळला. मोपल्यांनी हिंदूंच्या आया–बहिणींची अब्रू लुटली, खून पाडले. या खिलाफतीमुळे देशावर संकटांची परंपरा कोसळली. समाजवादी कोंबडे आरवत होते. पण हिंदू–मुस्लिम ऐक्य उजाडलेच नाही! दंगे करून मुसलमानांनी अखेर देशाचे तुकडे केले ! महाराणींनी केला असा सत्याचा अपलाप. इतर कुणी केला असता, तर वर्तमानपत्रवाले म्हणाले असते— ' आचरट आहे झालं... डोकं फिरलेले दिसतेय !'

दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रवाल्यांनी महाराणींच्या बोलण्यातला इतिहासाचा अपलाप खिलाफतींची सर्व हकिगत सांगून स्पष्ट केला; पण आम्ही म्हणतो आधी अहवाल छापलाच का ? छापायचे होते तर खाली लगेच टीप द्यायची ' यातले अक्षर खरे नाही !' आम्ही तर म्हणतो, वर्तमानपत्रांनी आचरट बोललेले छापण्यासाठी एक स्वतंत्र पान ठेवावे ! म्हणजे आम्ही कुणी त्या पानावरचे वाचणारच नाही. डोक्याला त्रास होणार नाही.

विलायतेत वर्तमानपत्रांमुळे लोकांच्या सुखाची काय वृद्धी होत असेल तर ती होवो, आपल्याकडे फक्त मनस्तापाची वृद्धी होते. मनाला सारखे धक्के बसतात. वाटतं भवानी तलवार येणार, ती येतच नाही ! वाटतं गरिबी हटणार, ती हटतच नाही !


पण सगळे सोसले पाहिजे. कारण वर्तमानपत्राचे वाचन करण्याचे व्यसन सुटणे कठीण आहे...आणि अशा पुढाऱ्यांची गर्दी आहे की ज्याचे वर्णन विलायतेतल्या एका कवीने केले आहे—

Stiff in opinions, always in the wrong.
Was everything by start and nothing long.
But in the course of one revolving moon
Was a chemist, fiddler, statesman and buffoon.

मतात दृढ, पण मते चुकीची. सगळे तडकाफडकी, पण चिरस्थायी काही नाही. आणि चंद्राच्या एक परिभ्रमणात बेटे रोगतज्ञ, वादक, मुत्सद्दी आणि विदुषक !

—ग्यानबा.


# तिसरी आवृत्ती



# सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र
किमत: बारा रुपये

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

## उत्तरमीमांसा : ४ :

स. शि. भावे

# माझी भाषिक उपचारपद्धती

आज माझ्या एका अभिनव उपचारपद्धतीबद्दल सांगायचे आहे. ही उपचारपद्धती तशी प्राचीन आहे; पण गेल्या काही वर्षांत तिचा लोप झाला होता. तिचा नव्याने शोध लावण्याचे श्रेय योगायोगाने मला लाभले. गेली दोन-तीन वर्षे या उपचारपद्धतीचा मी उपयोग केला. मला तिचा चांगलाच गुण आला. तेव्हा म्हटले आता ती इतरांनाही सांगावी.

क्षणार्धात भडकून डोके दुखायला लागणे, दीर्घकाळ पोटात मुरडा होऊन दुखणे, पाहता पाहता रक्तदाब वाढून डोके आता फुटते की काय असे वाटणे, कधीकधी अकस्मात् डोक्याला मुग्या येणे या आणि अशांसारख्या शारीरिक व्याधींवर ही पद्धती फार नामी आहे असे आढळून आले आहे. जशा शारीरिक, तशाच मानसिक व्याधींवरही या पद्धतीचा इलाज लागू पडतो, असाही अनुभव अनेकाना आला आहे.

आज ही उपचारपद्धती आठवायला एक कारण घडले. माझा एक मित्र चार दिवसांपूर्वी मुंबईहून आला आणि प्रत्येक दिवशी जास्त जास्तच वैतागत गेला.

म्हणाला, 'काय ही तुमच्या पुण्याची हवा! पुणे थंड म्हणून मुद्दाम आलो तर काय? सकाळपासून वारा पडलेला. ढग जमलेले. घामाच्या धारा दिवसभर अंगातून. यापेक्षा मुंबई बरी!'

त्याचे म्हणणे खोटे नव्हते. पंधरा दिवसांपूर्वी मी त्याच्याकडे मुंबईला गेलो होतो. त्या वेळी मुंबईच्या चिकचिकीपेक्षा पुण्याची हवा किती चांगली असे मीच त्याला सांगितले होते. सायंकाळी आठनंतर गार वाऱ्याच्या झुळका सुटतात. पहाटे तर अंगावर पातळसे का होईना, पण पांघरूण घ्यावे लागते. अशा एक ना दोन गोष्टी सांगून पुण्याच्या हवेविषयी मी त्याच्या मनात आवड आणि असूया निर्माण केली होती.

तर आता त्याने मला धारेवर धरावे हे ठीकच होते.

पण मी तरी काय करू शकणार होतो? चार दिवस पुण्याची हवा बिघडली होती. ती काही मी दुरुस्त करून चागली करू शकत नव्हतो.

तो तर वैतागला होता. सारखी कुरकूर, सारखी जिवाची तकतक चालू होती. झोप नीट लागत नव्हती. कुठला एक कपडा मनाला येत नव्हता. अंग उकडून निघत होते. त्या उकाडयाच्या वाफा त्याच्या मुखातून तक्रारीच्या रूपाने बाहेर पडत होत्या.

मला काहीच करता येत नसल्याने मी गप्प होतो.

शेवटी न राहवून तो अतोनात चिडला. मला गदागदा हलवून म्हणाला, 'तुला नाही का या उन्हाळयाचा त्रास होत? मग तू स्वस्थ का?'

मी म्हटले, 'तू तकतकतो आहेस ना? ही तकतक आपणा दोघाना पुरेशी आहे!'

या चेष्टेने तो अधिकच चिडला. आता मात्र त्याच्या चिडण्याचा गंभीरपणे विचार करायला हवा हे माझ्या ध्यानात आले.

मी गंभीर झालो आणि मला मा उपचारपद्धती आठवली.

मी त्याला म्हटले, 'मी सागतो तसं कर म्हणजे त्रास आणि तगमग कमी होईल.'

'काय करू?'

'करायचं तसं विशेष काही नाही. फक्त म्हणायचं.'

'काय म्हणायच?'

'स्वत.शीच पण जरा मोठ्यानं म्हणायचं, उन्हाळा काय मस्त तापून राहिलाय कसं सुरेख उकडतंय. कशी सणमणीत चिकचीक होतेय. खरंच यंदाचा उन्हाळा म्हणजे अगदी फर्स्ट क्लास उन्हाळा आहे, हं. लाग म्हणायला!'

मी बोलताना त्याने मला अडवले नव्हते; पण कमालीच्या चकित चेहऱ्याने तो माझ्याकडे जरा कणवेने पाहत आहे असा मला भास झाला.

तो भास नव्हता. तो माझ्याकडे कणवेनेच पाहत होता. मला वेड लागले असावे अशी काळजी त्याच्या नजरेत होती. मात्र माझा मान राखावा म्हणून त्याने स्वत.च्या संशयाचा किंवा काळजीचा उच्चार मात्र केला नाही. उलट जरा जादा गंभीरपणाने त्याने विचारले,

'यानं काय होणार?'

'असा आरंभीच संशय घेऊ नको. प्रथम श्रद्धेनं करून बघ.' मी आश्वासक आवाजात ऐकवले.

'पण असं नुसतं म्हणून काय होणार आहे?' त्याचा अविश्वास कायम होता.

मग मात्र मला रागच आला. मी सटासट सुरुवात केली. 'डोकं दुखल्यावर कोणी एखादी गोळी दिली तर घेऊन बघतोस की नाही तू? नामस्मरणाचा मार्ग कंठ गहिवरून सांगितला की करून बघतोस ना? तेव्हा नाही कुठे विचारीत, यानं खराच उपयोग होईल का म्हणून? जाहिरातीवर लगेच विश्वास ठेवा. केशरी रंगाच्या डब्यावर क्षणार्धात भाळा; पण आमच्यासारख्या कुणी साध्या भाषेत एखादा उपाय सागितला की, घ्या सशय.'

माझे म्हणणे त्याला कितपत पटले कोण जाणे; पण माझ्या भडिमाराने तो थोडा चमकला. म्हणाला, 'बरं. तू म्हणतोयसच तर दहा मिटं म्हणून बघतो.'

'दहा मिटं, पधरा मिटं असं नाही चालणार. जेव्हा म्हणून तू उन्हाळयासंबंधी बोलशील तेव्हा अशीच अनुकूल विशेषणं वापरून बोलायचं.'

'पण या उपचारपद्धतीची प्रक्रिया सांगशील की नाही? मायक्रोफाइन्ड ॲप्रोचं कसं सागतात?' त्याच्या अतीव बारीक पुडीमुळे तो शरीरात सर्वत्र जलद पसरतो.' तसं काही तरी साग.'

त्याच्या या विधायक प्रतिक्रियेने मला बरे वाटले, आता हा उपाय याला लागू

पडणार अशी खात्रीच वाटली.

'हे बघ', मी म्हणालो, 'अशा शास्त्रीय जिज्ञासेने विचार. ऐक तर. या उपचारपद्धतीला भाषिक उपचारपद्धती म्हणायचं. कारण यात भाषेच्या घटकांचा उपयोग केलेला असतो. भाषेच्या घटकांचा म्हणजे मुख्यतः विशेषणांचा, आणि क्रियाविशेषणाचा.'

'त्यांचं काय करायचं?'

'भाषेतली प्रतिकूल अर्थाची विशेषणं कधीही वापरायची नाहीत. फक्त अनुकूल अर्थाची विशेषणंच काय ती वापरायची.'

'म्हणजे अनुभव प्रतिकूल किंवा त्रासदायक असला तरी?'

'अनुभव त्रासदायक असला तरी नव्हे, अनुभव प्रतिकूल असतो म्हणूनच, विशेषणं अनुकूल छटेची वापरायची.'

'म्हणजे नेमकं कसं?'

'म्हणजे आता मी तुला सांगितलं तसं. काय मस्त उन्हाळा तापून राहिलाय किंवा कसा झकास वरवरून घाम येतोय किंवा कशी फर्स्टक्लास चिकचीक वाटतेय. म्हणून बघ ना तू. अशी आणखीही वाक्यं तुला नमुन्यादाखल तयार करता येतील.'

मित्राला बहुधा उपायाचे मर्म कळले असावे. त्याने तिथल्या तिथे काही वाक्ये तयार केली. 'कसा सुरेख घसरून पडलो. अशी मजा आली–दोन तास क्यूमध्ये उभा होतो. शेवटी माझ्यापुढे फक्त एक माणूस उरला आणि काय गंमत खिडकी फट्टकन बंद झाली आणि हाउसफुल्लची पाटी लागली.'

'तुला टेक्निक जमायला लागलं' मी त्याला प्रोत्साहन दिलं, 'आणखी असेच नमुने तयार करून ठेव. ऐन वेळी मग शोधाशोध करायला नको.'

मग त्याला नादच लागला. उन्हाळ्याची मी सांगितलेली वाक्ये तो म्हणू लागलाच, पण नवी नवी वाक्ये काढून माझी विद्या मलाच परत करू लागला.

दुसऱ्याच दिवशी सकाळी नळाला ठणठणाट! मी एकदम तारसप्तकात शिरलो. तेव्हा मित्रच म्हणाला, 'अरे असं काय करतोस स्वतःच. म्हण ना, नळाला कसा आकर्षक कोरडेपणा आलाय. नेहमी ओला ओला असतो. आज कसा शुचिर्भूत, नुकताच अंग पुसल्यासारखा दिसतोय!'

मी उमजलो. मित्रात्-शिष्यात्-पराजयः मग मनाशी माझ्या पद्धतीने म्हणालो, 'किती सुंदर पटवून दिले मी याला आणि त्यालाही किती अचूक समजले. त्यामुळेच तर त्याला माझी कशी अगदी प्रसंगोचित फजिती करता आली.'

तोच त्याने विचारले, 'तंत्र तर कळलं. आता काल मंत्र सांगायचा राहिला. तो सांग. प्रक्रिया सांग.'

आता मी सावध झालो होतो. पुन्हा फजिती नको म्हणून गंभीरपणा कायम ठेवून विचारता झालो, 'अरे. तंत्र जर तुला इतकं अप्रतिम जमलंय तर मंत्रही उमजला असणारच. तर तूच सांग कसा!'

यावर तो चतुर मित्र म्हणतो कसा, 'अरे, तसा तो मंत्र मला समजल्यासारखा वाटतो आहे. पण ही सर्वच उपचारपद्धती तुला ज्ञात असल्यानं तूच ती प्रक्रिया सविस्तर सांगावीस हे बरं.'

त्याचे चातुर्य मला समजले. माझीच पद्धती तो मजवर चालवून पाहतो आहे हेही माझ्या ध्यानात आले. पण म्हटले, 'ही पद्धती तो जर नुकताच शिकला आहे तर ती चालवून पाहण्याची इच्छा त्याला होणारच.' म्हणून मी शांतपणाने ती प्रक्रिया त्याला कथन केली.

मी म्हणालो, 'कोणतीही प्रस्तुत प्रतिकूलता दूर करून शारीरिक व/वा मानसिक अनुकूलता निर्माण करणे हे, अन्य उपचारपद्धतीप्रमाणे या उपचारपद्धतीचेही उद्दिष्ट आहे. मात्र महत्त्वाचा फरक असा की इतर पद्धती परिस्थिती बदलू पाहतात, माझी पद्धती अनुभूती बदलू पाहते.'

'पण भाषेतल्या बदलानं अनुभूती कशी बदलणार?'

'तिथेच तर या उपचारपद्धतीचं मर्म आहे. अनुकूलता काय किंवा प्रतिकूलता काय, तीव्र झाली की ती भाषेतून आपण व्यक्त करतोच. कोणी ओरडतात. कोणी पुटपुटतात कोणी मनातल्या मनात शिव्या देतात. कोणी डायरीत ही तीव्रता ओततात, एकूण तीव्रता भाषेत व्यक्त होणं ही आता माणसाची पक्की सवय झाली आहे. – –'हूं' म्हण.' त्याला कंटाळा आला नाही ना, याची खात्री करून घेण्यासाठी मी विचारले आणि उत्तराची वाट न पाहता पुढे सुरू झालो.

'तर या भाषिक सवयीला उलटवून या सवयीचा फायदा घ्यायचा. अनुभूती प्रतिकूल असली तरी विशेषणं, क्रियाविशेषणं अनुकूल पद्धतीची वापरायची. असा वापर काही काळ झाला की अनुभूतीची प्रतिकूलता कमी होते, नाहीशी देखील होते. आणि कालांतरानं एक प्रकारची (मी विद्वानांचं, प्रभाव पाडण्यासाठी वापरण्यात येणारे हुकमी शस्त्र वापरले.) खिलाडू अनुकूलता देखील निर्माण होते.'

'अशी खिलाडू अनुकूल वृत्ती म्हणजे प्रतिकूल अनुभूतीविरुद्ध निर्माण झालेली प्रतिकारक्षमता म्हणजे इम्यूनिटीच समज.' मी उत्साहाने माझ्या पद्धतीची therapeutic value समजावून सांगायला लागलो. इम्यूनिटी हा पारिभाषिक आंग्ल शब्द वेळेवर सुचल्याने मला वाटलेले समाधान, अर्थातच, वर्णनातीत होते.

पण मित्राने, (पुन्हा अर्थातच), या समाधानाचा भंग केला. 'हे बघ, वृत्तीचा जसा भाषेवर तसाच भाषेचा वृत्तीवर उलटा परिणाम होतो, असं थोडक्यात सांग ना.' त्याने ब्रेक लावला.

पण मी मात्र, त्याने ब्रेक लावला, त्याचा मला राग आला, माझी लय बिघडली वगैरे काहीच बाहेर दर्शविले नाही. त्याच्या ब्रेक लावण्याचा उत्तम प्रतिकार म्हणून मी अधि-

कच शांतपणाने, अधिक खालच्या स्वरात आणि अधिक सावकाश असा माझा पीळ पुन्हा सुरू केला.

'तू म्हणतोस तेच बरोबर आहे. म्हणूनच, अनुभूती कशीही असो, अनुकूल शब्दांचा वापरच सदैव करायचा असतो. थोडे दिवस वापरली अन् नंतर सोडून दिली, अशी ही उपचारपद्धती नव्हे. एकदा स्वीकारली की पूर्णपणे अंगिकारायची ही पद्धती आहे. मात्र मघा मी म्हणत होतो त्याप्रमाणे ( मनात प्रतिकूलता येऊ न दिल्याने मला त्याचा ब्रेक असा नकळत उलटवता आला ). एकदा ती खिलाडू, अनुकूल वृत्तीची इम्यूनिटी निर्माण झाली की, मग अनुकूल शब्द वापरणे ही अगदी पक्की सवय होते. या पद्धतीसाठी मग वेगळा प्रयत्न करावा लागत नाही.'

मित्राला आता या उपचारात स्वारस्य वाटू लागले होते. म्हणून अशा प्रकारच्या कोणत्याही कथेत विचारायचा असतो, तोच प्रश्न त्याने विचारला. 'तुला ही उपचारपद्धती केव्हा न् कोणाकडून मिळाली ?'

मनूने विवस्वानाला ( की उलटे ? ) या थाटात प्रथम मी त्याच्या दुसऱ्या पृच्छेचे उत्तर दिले, 'माझ्या आजीकडून ही उपचारपद्धती मला मिळाली. खरं तर माझ्या लहानपणापासूनच तिचं एक सूत्र ती नेहमी घोकत असे. कामाचा मला कंटाळा असे. मग मी ते कसं तरी उरकू लागे. तेव्हा ती म्हणे, 'अरे, एकदा काम डोक्यावर बसलंच म्हटलं म्हणजे खत्रुडासारखा चेहरा कशाला ठेवायचा ? वाट्याला आलं ना, मग ते हसत तरी कर.'

'हसण्याऐवजी भाषिक भाग आजीनं सांगितला तो तीन वर्षांपूर्वी.' मी मागचे आठवीत सांगू लागलो.

'तीन वर्षांपूर्वी दोस्तांच्या विश्वासघातानं मी अगदी उलून गेलो होतो, तुला माहीतच आहे.'

'मित्र म्हणजे ते विठ्ठल, गणपत आणि कृष्णा हेच ना ?'

'हो तेच. तर त्यांनी एक दिवस विश्वासघाताचा असा धोबीपछाड डाव केला आणि माझी झोपच उडाली. म्हणजे माझं नुकसान वगैरे खूप झालं ते अलाहिदा, पण मनाला आपला असा सारखा भुंगा. हे लोक इतक्या क्षुद्रपणानं, इतक्या फसवेखोर धोरणानं का वागले ? मनात चीड शिरायची नि मी रागानं थरथरून जायचो.'

'तर बरेच दिवस आजीनं हे पाहिलं आणि विचारलं, 'असा किती दिवस कुढणार आहेस बाबा ?'

'पण त्यानी तरी असं का वागावं ?'–मी.

'हे बघ, त्यांचे ते कसेही वागायला मुखत्यार आहेत ना ?'–आजी. मी मुंडी हलवली.

'झालं तर मग', आजी सांगू लागली, 'ते जसे आहेत, तसे ते वागले. आता, ते क्षुद्र आहेत याला त्यांचा तरी काय इलाज ? उलट ते क्षुद्रपणानं वागले तर आपण म्हणावं, त्यांनी स्व-प्रकृतीशी इमान राखलं, मोठ्या शर्थीनं क्षुद्रपणा गाजविला. असं आपण त्यांच्या आत्मसुसंगतीचं कौतुक करावं. आजी म्हणाली, आणि तिने नेहमीचा प्रश्न विचारला. 'समजलं का ?'

'तर असं ते तीन वर्षांपूर्वी समजलं. मग मी त्या म्हणण्याचा शास्त्रपूत विचार केला. त्या विचारात ही भाषिक उपचारपद्धती साकार होत गेली. समजलं का ?' आजीसारखी मलाही हा प्रश्न शेवटी टाकायची सवय लागली होती.

तर, प्रिय वाचकहो, माझ्या मुंबईकर मित्राला जसा या पद्धतीचा लाभ झाला तसा तुम्हालाही होवो. स्वतःची स्वतःला करता येण्याजोगी, बिनखर्चाची अशी ही उपचारपद्धती सध्याच्या वेगाच्या, गोंगाटाच्या, प्रदूषणाच्या आणि 'मानतोड' स्पर्धेच्या जगात क्रमांक एकची गुणकारी पद्धती म्हणावी लागेल. ( खास व्यक्तिगत समस्यांसाठी उपचारपद्धतीचा तपशील हवा असल्यास, पुरेशा टपालहशिलासह, द्वारा 'माणूस' पत्रव्यवहार करावा. ) □




'केप्र' मसाल्यापासून बनविलेली कैरी, लिंबू मिक्स लोणची त्या बाटलीतून फस्त होत असतांना बाटलीची अवस्था किती कठीण बाई...

केप्र

केशवलक्ष्मी प्रसाधन

कन्या शाळेजवळ. शनिवार. पुणे-३०

R. A. Advt/02.

अवती-भवती । शरद कृष्णन्

# □ संसद की राजदरबार ?

लोकाचे, लोकासाठी आणि लोकानी चालवलेले शासन कार्यरत रहाण्यासाठी लोकशाही असलेल्या देशामध्ये संसद नावाचा प्रकार असतो. आपल्याकडेही तो आहे. लोकसभा म्हणजे आजच्या जमान्यामधील राजदरबार ! लोकसभेचे कामकाज जसे चालावे तसे ते चालत नाही. या संदर्भात दिल्लीच्या 'स्टेटसमन'मध्ये एक प्रदीर्घ लेख आला आहे. दिल्ली दूरदर्शनवर झालेल्या एका परिसंवादापासून प्रेरणा घेऊन 'स्टेटस्मन'साठी लोकसभेच्या कामकाजाचे वृत्त देणाऱ्या बातमीदाराने हा लेख लिहिला आहे.

'लोकशाही आणि संसदीय संस्थाचे कामकाज' या विषयावर दूरदर्शनवर झालेल्या परिसंवादामध्ये लोकसभेचे सभापती, तसेच संसदीय कामकाजाचे मंत्री भीष्मनारायण सिंग, माजी केंद्रीय मंत्री सी. सुब्राह्मण्यम, ब्रिटनचे माजी पंतप्रधान जेम्स कॅलहन आणि लोकसभेचे माजी महासचिव आणि सध्याचे निवडणूकआयुक्त एस. एल. शकधर यानी भाग घेतला. ज्या प्रकारे चर्चा झाली त्यातून दोन प्रकारचे प्रश्न उभे राहिले. लोकसभेच्या कामकाजाबद्दल लोक नाराज का आहेत ? जे प्रश्न संसदीय मार्गाने सोडवता येतील असे प्रश्न सोडविण्यासाठी लोक रस्त्यावर येतात, याचा अर्थ त्याचा संसदीय लोकशाहीवर विश्वास नाही असाच होतो ना ? अनेक महत्त्वाच्या प्रश्नावर लोकसभेमध्ये अपेक्षेप्रमाणे चर्चा होत नाही त्याचे कारण काय ? या प्रश्नांवर परिसंवादात भाग घेणारानी बिनतोड उत्तरे जरी दिली नाहीत तरी संसदीय पद्धतीमध्ये काही वावगे नाही असेच बहुतेकाचे मत पडले. प्रश्न सोडवण्यासाठी लोक रस्त्यावर आले याचा अर्थ त्याचा संसदीय लोकशाहीवर विश्वास नाही असा करणे म्हणजे प्रकरण अवाजवी ताणण्यासारखे आहे. या संदर्भात भाषण करताना ब्रिटनचे माजी पंतप्रधान म्हणाले, 'संसदीय लोकशाही म्हणजे रुपया टाकला की डोळघाचे पाते लवते ना लवते तोपर्यंत तुमच्या समोर प्रश्नाचे उत्तर टाकणारे मशीन नाही.' मात्र त्याचबरोबर संसदेच्या कामकाजात बऱ्याच सुधारणा करण्यास वाव आहे असे बहुतेकाचे मत पडले.

या संदर्भात झालेल्या चर्चेतूनच कामकाजाबाबतच्या प्रश्नाना तोंड फुटले. लोकसभेचे कामकाज सुधारण्यासाठी काय करता येईल ? संसद-सदस्याची गुणवत्ता आणि त्याचे वर्तन याबाबतही काही तरी हालचाल होणे आवश्यक आहे, असे सध्याचे कामकाज पाहून वाटते. त्याबाबत काय करता येईल ? ससद-सदस्यानी लोकासमोर आदर्श कामकाजपद्धती ठेवली पाहिजे तरच लोकाना लोकसभेबद्दल आत्मीयता वाटेल; पण आज प्रत्यक्षात तर आरडाओरडा आणि प्रसंगी हाणामारीपर्यंत प्रकरणे येताना दिसतात. याबाबत काही करता येणार नाही का ? या चर्चेचा आधार घेऊन लिहिलेल्या लेखात भारतीय लोकसभेच्या कामकाजपद्धतीचा तपशील देऊन त्यावर भाषण करण्यात आले आहे. लोकसभेचे कामकाज परिणामकारक व्हायचे असेल तर सभासदानी नियमित हजर राहणे अत्यंत आवश्यक आहे. लोकसभेचे संख्याबल आहे ५४४. आज या ५४४ पैकी रिकाम्या जागा सोडल्या तर ५२१ सभासद विद्यमान लोकसभेचे सदस्य आहेत; परंतु अनुभवावरून असे दिसून येते की, बहुसंख्य मंडळी संसदेच्या कामकाजात सहभागी होत नाहीत. अधिवेशन चालू असताना हजर राहणे ही प्रत्येक सदस्याची नैतिक जबाबदारी असली तरी त्याकडे इतके दुर्लक्ष होताना दिसते की आज लोकसभेमधील उपस्थिती ही चिंतेची बाब झाली आहे. चर्चेमधील सहभाग हा पुढचा भाग झाला. प्रत्यक्षामध्ये उपस्थिती वाढल्याखेरीज या चर्चेच्या भागाला महत्त्व येणार कसे ? आज असे दिसून येते की, विरोधी पक्षाच्या सदस्यांपैकी यशवंतराव चव्हाण, मधू दंडवते, अटलबिहारी बाजपेयी, इंद्रजित गुप्ता, सोमनाथ चटर्जी, ज्योतिर्मय बसू, चित्ता बसू, जॉर्ज फर्नांडिस, जगजीवनराम, त्रिदीब चौधरी,समर मुखर्जी इत्यादि नेते, लोकदलाचे काही तरुण सदस्य, भारतीय जनता पक्षाचे सदस्य आणि मुस्लिम लिगचे बनातवाला अशी मोजकी मंडळी हजर असतात. सरकारी पक्षाची उपस्थिती तर केविलवाणी असते. गरजेप्रमाणे उपस्थित रहाणारे मंत्रिगण सोडले तर कमलापती त्रिपाठी, प्रो. एन. जी. रंगा, शंकर दयाल शर्मा, श्री. के. एल भगत, काही तरुण सदस्य आणि जवळजवळ सर्व महिला सदस्य लोकसभेच्या दैनंदिन कामामध्ये सहभागी होताना दिसतात. प्रश्नोत्तराच्या तासाला गर्दी उसळते; परंतु अन्य नियमित कामकाजाचे वेळी फक्त वरील वेचीव मंडळी हजर असतात. या सर्वांची गोळाबेरीज केली तर गणसंख्येच्या पूर्तीसाठी आवश्यक असलेला ५४ हा आकडा कसाबसा पूर्ण होतो. अनेक महत्त्वाच्या चर्चेच्या वेळी किमान संख्येबाबत असलेल्या मर्यादाही संभाळल्या जात नाहीत. या वर्षी अंदाजपत्रकावर चर्चा चालू असताना जेमतेम ५० सदस्य हजर होते. अनेक महत्त्वाच्या चर्चेच्या वेळीही हीच परिस्थिती पहावयास मिळते. केविलवाणी उपस्थिती हा चिंताजनक प्रकार जवळजवळ स्थायी भाव बनू पहात आहे. पुरेशी गणसख्या नाही हे माहीत असूनही उपस्थित सदस्य गणसंख्येचा प्रश्न उपस्थित करत नाहीत. कित्येक वेळा प्रश्न विचारले जातात आणि जेव्हा प्रश्न संसदेसमोर येतात तेव्हा ते विचारणारांचाच पत्ता नसतो ! संसदसदस्य आपल्या कामाबाबत उदासीन वृत्ती दाखवतात की, आपण नसलो तर फारसे अडत नाही इतक्या सहजपणे, ते ज्या कामासाठी दिल्लीत निवडून गेलेले असतात त्या कामाकडे पहातात ? या प्रश्नाचे उत्तर आज तरी होकारार्थी द्यावे लागेल. सदस्यांना नियमित पगाराखेरीज उपस्थितीबद्दल भत्ता दिला जातो; त्याचा निर्देश करणे हा जरा सस्ता मामला वाटेल; पण बहुतेक वेळा केविलवाणी उपस्थिती असल्याने मुद्दाम याचा उल्लेख करतो; ससद-सदस्यानी भत्ता मिळण्यासाठी रोजच्या रोज सही केली पाहिजे असे नाही; सलग १५ दिवसापेक्षा जास्त अनुपस्थिती असेल तरच भत्ता कापण्याचा वगैरे प्रश्न येत असल्याने, आठ-बारा दिवसात एखादी सही ठोकली तरी चालते !

पृष्ठ २० वर

## मागण्या मान्य झाल्या, पण त्यापूर्वी शेतकऱ्यांकडून एक नवी ‘ सूट ’ घेतली गेली....

लेखक : विजय परुळकर

लेखांक : पहिला



५ एप्रिल १९८१. पुणे-बंगलूर राष्ट्रीय महामार्ग नंबर चार ह्या नावानं ओळखल्या जाणाऱ्या सडकेवर निपाणीनजदीक तेवीस दिवसांपूर्वी उभारण्यात आलेल्या आंदोलननगरीतील एक भारावलेली रात्र.

सकाळी गुढीपाडव्याचा सण साजरा करून सारा शेतकरी सडकेवर उभारण्यात आलेल्या तंबूवजा राहुटयांतून निर्धास्तपणे झोपी गेला होता. संध्याकाळी आंदोलनमाळावर भरलेल्या तप्त सभेत बोलताना शेतकरीनेत्यानं आश्वासन दिलं होतं–‘ आपला विजय आता निश्चित आहे ! ’ गुढीपाडव्याच्या शुभदिनी नेत्यानं दिलेल्या ह्या आश्वासनामुळं मनामध्ये भविष्यकाळाबद्दल सुखद स्वप्नं रंगवताना शेतकरी क्षणभर सुखावला असणार. क्षणभरच ! कारण तंबाखूचा लढा अत्यंत कठीण आहे ह्याची पुरेपूर जाणीव शेतकऱ्याला असल्यामुळं तो केवळ स्वप्नरंजनात दीर्घकाळ रमणं सर्वस्वी अशक्य !

गेले तेवीस दिवस अंदाजे तीस ते चाळीस हजार शेतकरी ह्या सडकेवर ‘ रस्ता रोको ’ आंदोलन उभारून तळ ठोकून होते. तंबाखू आंदोलनात निपाणी परिसरातील एक्याऐंशी लहान-मोठ्या गावांनी भाग घेतला होता. चार नंबरच्या राष्ट्रीय महामार्गावर तंबू, मंडप, राहुटया उभ्या करून प्रत्येक गावानं आपली छावणी टाकली होती. निपाणीचा टोलनाका ते यमगर्णी ह्या अंदाजे तीन किलोमीटर लांबीच्या सडकेचा ताबा घेऊन, १४ मार्च १९८१ च्या दुपारपासून शेतकऱ्यानं जी तात्पुरती वस्ती उभारली होती त्या वसाहतीचं नाव ‘ आंदोलननगर ’.

५ एप्रिल १९८१ रोजीची आंदोलननगरातील ही काहीशी गूढ आणि भयसूचक रात्र काळरात्र ठरणार होती. ह्या रात्रीच्या गर्भात उगवत्या दिवसाच्या भीषण हत्याकांडाचं कुटिल कारस्थान आकाराला येत होतं. रात्र वैऱ्याची होती; पण ‘ आता आपला विजय निश्चित ’ ह्या मंत्रवाणीनं मन मोहरल्यामुळं शेतकरी निर्धास्तपणे झोपी गेला होता. उद्या ह्याच परिसरात मृत्यू बेभान तांडव घालणार आहे ह्याची शेतकऱ्याला यत्किंचितही जाणीव नव्हती. उद्या माध्यान्हीची भाकरी खाण्याअगोदरच तो किंवा त्याचा साथीदार पोलिसांच्या अमानुष गोळीबारात मरण पावणार आहे, ह्याची त्याला पुसटशी कल्पना असणंदेखील शक्य नव्हतं. हजारो किसान उद्या पोलिसांच्या उन्मत्त बुटांनी तुडवले जाणार, रक्तासाठी चटावलेल्या लाठ्यांनी झोडपले जाणार, हजारो वृद्ध आणि तरुण शेतकरी ह्या पाशवी अत्याचारानंतर जन्माचे अपंग होणार ह्या कशाचीही काडीमात्र कल्पना त्याला नव्हती. गुढीपाडव्याचा सण साजरा करून, तेवीस दिवस शांततेनं आंदोलन चालवणारा शेतकरी उरामध्ये भविष्याबद्दल काही नव्या आशा बाळगून रोकलेल्या सडकेवर निर्धास्तपणे झोपी गेला होता.

वास्तविक निर्धास्तपणे झोपलेल्या ह्या शेतकऱ्याला इशारा देऊन जागं ठेवणं सहज शक्य होतं ! पण तो जागा राहिल्यामुळं फार मोठा फरक खरोखरीच पडला असता का ? हे हत्याकांड घडलंच असतं. ते तसं घडावं अशीच योजना गुंडूरावच्या सरकारनं आखली होती. गुंडूरावच्या ह्या दडपशाहीला इंदिराजींचा कितपत पाठिंबा होता हे फक्त संजयचा आत्माच जाणत असणार !

तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांचं हे शांततामय आंदोलन अमानुष ताकद वापरून हिंसक मार्गानं उधळून लावायचं, असाच जणू मायबाप सरकारचा इरादा असावा ! शांततापूर्ण आणि अहिंसात्मक आंदोलनावर सरकारचाच विश्वास नसेल तर इथून पुढं आंदोलक तरी असा वेडा विश्वास उराशी बाळगतील का ? ‘ महात्मा गांधी की जय ’ असा नारा सदान् कदा देणारं शासनच ऊठसूठ बेछूट गोळीबार करून निरपराध शतकऱ्यांचे बळी घेऊ लागल्यानंतर शिवरायाचा अभिमान बाळगणाऱ्या शेतकऱ्यांनी ‘ बोला हर हर महादेव ’ ह्या वीरगर्जनेनं प्रतिसाद देण्याचं ठरवलं तर ?

दिल्लीमध्ये कोटयवधी रुपये खर्चून भरविलेल्या भाडोत्री किसान मेळाव्यात आमच्या लाडक्या पंतप्रधान इंदिराजी घशाच्या शिरा ताण ताण ताणून म्हणाल्या होत्या, ‘ चाहे इसके लिये हमे खून की नदिया बहानी पडे–’ त्या वेळी बिचाऱ्या शेतकऱ्याला वाटलं असणार की, जरूर पडल्यास आपल्या कल्याणासाठी स्वतः इंदिराबाई नेहरू घराण्याच्या रक्ताचे पाट वाहवण्यास तयार आहेत ! त्याला अजून नेहरू घराण्याची खरी ओळख पटलेली नसावी ! ह्या घराण्याच्या कल्याणासाठी नेहमी दुसऱ्यांनी घामाचे पाट आणि रक्ताच्या नद्या वाहवायच्या असतात आणि आजदेखील ह्या घराण्याच्या वारसदारांसाठी त्यांच्या अवतीभोवती नाचणाऱ्या चमच्यांच्या स्वार्थासाठी, पगारदार नोकरशहा शेतकऱ्यांच्या रक्ताचे पाट वाहवण्याची तत्परता दाखवताना दिसतात. निरपराधांचं रक्त सांडण्यासाठी चटावलेल्या शासनकर्त्यांचा अंतिम पराभव निश्चित असतो, हे इतिहाससिद्ध सत्य

ह्या सत्ताधाना कधी उमगणार परमेश्वर जाणे !

आज हे सर्व लिहीत असताना असह्य यातना होतात. आज शाहे २४ एप्रिल १९८१. दुपारी निपाणीचा फोन लागला आणि समजलं की, शरद जोशी, सुभाष जोशी आणि इतर नेत्यांची चिकोडीच्या मॅजिस्ट्रेटनं जामिनावर सुटका केली. शरद जोशी निपाणीहून निघालेत आणि रात्री दहा वाजेपर्यंत पुण्याला पोहोचणार आहेत. तब्बल पंचेचाळीस दिवसानी हा शेतकरी नेता आपल्या घरी परतणार होता.

मी हे इथं लिहीत बसलोय; पण मनामध्ये विचाराचा नुसता कल्लोळ माजलाय. तंबाखू आंदोलनात जे पाहिलं, ऐकलं आणि अनुभवलं ते सगळं जसंच्या तसं कागदावर उतरून काढावं अशी इच्छा आहे. त्याचबरोबर हे लिहिण्यात फारसा काही अर्थ नाही असाही सूर अधूनमधून मनामध्ये उमटतोय ! हे सगळं लिहिण्यात वेळ घालविण्यापेक्षा शेतकरी संघटनेनं जाहीर केलेल्या, २५ मे १९८१ पासून सुरू होणाऱ्या दूध-भात आंदोलनाचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर निघावं असं वारंवार वाटतंय ! कारण ह्या लिहिण्याचा उपयोग काय ? कशासाठी लिहायचं ? चार सुशिक्षित आणि 'विद्वान' समाजकार्यकर्त्यांची स्तुतिपर पत्रं यावीत म्हणून ? का चार सुशिक्षित बेकार आणि 'डाव्या' विचार सरणीच्या मध्यमवर्गीय तरुणानी कॉफी हाउसमध्ये ह्यावर चर्चा करावी म्हणून ?

निपाणीच्या रक्तपाताची सुरस आणि चमत्कारिक कथा वाचून 'आम्ही' जर कसल्या तरी निरर्थक बारकाल्या शंकाकुशंका काढून, त्यावरच वितंडवाद घालून, पुन्हा जैसे थे अवस्थेप्रत येणार असलो तर लिहिण्याचा हा खटाटोप कराच कशाला ? विचारवंतांच्या शंकाकुशंका फिटेपर्यंत शेतकरी तिथं भरडलाच जाणार, एसआरपीच्या बुटाखाली निर्दयपणे चिरडलाच जाणार, बेछूट गोळीबारात रक्त ओकून मरतच राहणार ! आणि 'आम्ही ?'—'आम्ही' त्याबद्दल नुसती उलटसुलट चर्चा करत बसणार ! पण हे असं किती दिवस चालणार ? 'आम्ही' किती दिवस त्रयस्थाप्रमाणे ह्या घटनाकडे पाहात, आपआपल्या मध्यमवर्गीय खुराड्यात विजेच्या पंख्याचा वारा खात, अजीर्णदर्शक करपट ढेकर देत, प्रचारकी 'बातम्या' ऐकून झाल्यावर, 'चलत्‌चित्रपटका अर्धांश' पाहण्यासाठी मरणार ? आज शेतकरी आपल्या न्याय्य मागण्यासाठी गाधीप्रणीत सत्याग्रहात उतरला आहे, घामाचा दाम मागू लागला आहे ! 'आम्ही' त्याची बाजू समजावून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत की नाही ? काही आठवड्यातच दूधआदोलन सुरू होणार ! 'आम्हाला' दूध महाग मिळणार म्हणून आम्ही शेतकऱ्याविरुद्ध बोंब ठोकणार, की इतके दिवस आपण जो गरमागरम बेड-टी पीत होतो, त्या चहामधील दुधात शेतकऱ्याचं बळजबरीनं शोषलेलं रक्त मिसळलेलं असायचं आणि ते 'आम्ही' मिटक्या मारत प्यायचो, ह्या जाणिवेनं शरमिंदे होणार ? शेतकरी जागा झालाय; पण 'आम्ही' किती दिवस असं झोपेचं सोंग घेऊन त्याला जमेल तेवढं लुबाडत राहणार ?

'आमच्या' पिढ्यान्‌पिढ्या 'त्याच्या' घामावर पोसल्या. 'त्याला' लुटून 'आपण' चैनमौजा केल्या. आज 'तो' आपल्या घामाच दाम मागतोय ! ही मागणी अजूनपर्यंत तरी तो अहिंसक आणि शांततापूर्ण सत्याग्रहाच्या मार्गानं मागतोय ! 'आम्ही' त्याचा अंत का पाहणार आहोत ? इथूनही पुढं 'आम्ही' निर्लज्जपणं त्याचं, त्याच्या बायकोचं, मुलाबाळांचं, म्हाताऱ्या आई-वडिलाचं रक्त पीत आपआपल्या ढेऱ्या वाढवतच राहणार आहोत का ? वाचाळ शब्दज्ञानाच्या मोहनिद्रेतून 'आम्ही' कधी काळी जागे होणार की नाही ? भारतीय किसानाला नम्रपणे अभिवादन करून 'आम्ही' सांगणार आहोत का—'हे शेतकरीराजा, आम्ही कळत-नकळत किंवा स्वार्थी, हलकट बुद्धीनं तुला पिढ्यान्‌पिढ्या लुटलं. तुझ्या घामाला दाम न देता ऐषआरामात लोळत राहिलो. आज आमचे डोळे उघडलेत ! तुझ्या न्याय्य मागण्या आम्ही समजावून घेणार आणि तुझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार कारण तूच आमचा खराखुरा अन्नदाता आहेस !'

शेतकरीराजा उदार आहे. तो आमचे पूर्वीचे अपराध पोटात घालील; पण त्याला विनम्रपणे हात जोडण्याइतकं 'आमचं' दिल मोठं आहे का ? आत्मरत मध्यमवर्गीयाला साखरपाकी गुळमुळीत बातम्या पुरविणाऱ्या वृत्तवितरणसंस्था आणि भांडवलशहाना, राज्यकर्त्यांना मस्का लावणाऱ्या संपादकाद्वारे 'चालविली' जाणारी तथाकथित बडी वृत्तपत्रं, सुशिक्षित मध्यमवर्गाला बळीराजाच्या पाठीशी उभं राहण्याची प्रेरणा देणार आहेत का ? समजा, त्यानी तसा प्रयत्न केला तरी ज्याला आपण 'देशाचा कणा' मानतो तो सुस्तावलेला मध्यमवर्ग शेतकऱ्याच्या सहाय्यार्थ काही करण्यासाठी प्रेरित होऊन उठणार आहे का ?

—म्हणूनच वाटतं की, तंबाखू आदोलनात जे पाहिलं, ऐकलं, अनुभवलं ते सगळं स्वत.पाशी ठेवावं आणि मौन पाळाव ! काय उपयोग दुसऱ्या कोणाला सागून ?—आणि मग दुसरं मन म्हणतं तू लिहून मोकळा हो, त्याचा उपयोग काय ह्याची चिंता तुला कशाला ?—म्हणून हे लिहीत बसलोय.

¤

आज एका घटनेची आठवण येणं अपरिहार्य आहे. ३१ ऑगस्ट १९६५. पाकिस्तानशी आपलं युद्ध सुरू होतं. मेजर रणजितसिंग दयाल ह्या धाडसी अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली आपल्या बहाद्दूर जवानांच्या पलटणीनं अत्यंत दुष्कर अशी हाजीपीर टेकडी पाकिस्तान्यांच्या हातून काबीज केली होती. ह्या महत्त्वाच्या आणि मोक्याच्या टेकडीचा ताबा मिळताच आपल्या जवानांनी पहाडी तोफा डागायला सुरुवात केली आणि सीमेपलीकडे दडलेल्या पाकिस्तान्याची दाणादाण उडविली. त्या वेळी जर्मन टेलिव्हिजनसाठी हा अपूर्व विजय चित्रित करण्याचं भाग्य मला लाभलं. संपूर्ण दिवसभर आपल्या शूरवीर जवानाबरोबर खाद्याला खादा लावून फिरताना उचंबळून येणारा स्वाभिमान महत्प्रयासानं उरामध्ये दाबत मी 'हाजीपीर अॅक्शन' माझ्या दोन्ही कॅमेऱ्यानं टिपत होतो. हाजीपीरवरची पहिली रात्र जवानांच्याबरोबर गप्पा मारत खंदकात काढली पहाटे आपल्या जवानांची एक तुकडी हाजीपीरच्या पलीकडे असलेल्या 'पांडू हिल्' ह्या आणखी एका मोक्याच्या टेकडीवर हमला करण्यासाठी बाहेर पडली. हमल्यावर जाणाऱ्या जवानांना नम्रपणे अभिवादन करून, सुयश चिंतीत मी चित्रीकरण करीत होतो.

—पांडू हिलवरचा हमला अयशस्वी ठरला ! सकाळी बहा-अकराच्या सुमारास, प्राणातिक वेदना होत असूनही ताठ मानेनं

घालत माघार घेणारे जखमी जवान हाजीपीरवर परतू लागले. कुणाचा पाय निकामी, कुणाचा हात जायबंदी, तर कुणाचा संपूर्ण चेहरा फुटलेला, एखाद्याच्या देहाची चाळण झालेली.

काही तासांपूर्वी मी ज्याच्याशी सुखदु:खाच्या गोष्टी केल्या होत्या ते शूरवीर रक्ताळलेल्या आणि तुटलेल्या शरीरानं आपआपल्या खंदकाचा आश्रय शोधत असलेले पाहून मी मनोमन फुटलो.

माणसाचं रक्त पाहण्याचा हा काही माझा पहिलाच प्रसंग नव्हता. व्हिएतनामच्या युद्धाच्या चित्रीकरणाच्या वेळी मी रक्ताचा सडा नव्हे तर चिखल बघितला आहे. तुडवला आहे. हजारो मुडद्यांची रास बघितली आहे; पण इतक्या मोठ्या प्रमाणात सांडलेलं भारतीय रक्त बघण्याचा हा पहिलाच प्रसंग !—तेव्हा वाटलं होतं हातामधील टीव्हीचा कॅमेरा फेकून द्यावा आणि एक मशीनगन घेऊन शत्रूचे चार तरी मुडदे पाडावेत !

हाजीपीरच्या घटनेनंतर आज जवळजवळ सोळा वर्षांनी, ज्यांच्या-बरोबर सतत तेवीस दिवस अत्यंत निकटच्या सहवासात घालवले त्या भारतीय किसानाचं रक्त मोठ्या प्रमाणात हमरस्त्यावर सांड-लेलं पाहण्याचं दुर्भाग्य माझ्या नशिबी होतं. भारतीय किसानाचं हे रक्त 'इंडिया'च्या पोलिसांनी सांडलं होतं !

आज हातात टीव्हीचा कॅमेरा नाही. असूनही उपयोग झाला नसता. हा हिंसाचार चित्रित करायला 'इंडिया'च्या पोलिसांनी कधीच परवानगी दिली नसती. वार्ताहराच्या कॅमेऱ्यासमोर असा अत्याचार कधीच घडणार नाही—प्रथम वार्ताहराला हाकलण्यात येईल आणि मगच पोलीस खातं बंदुका सरसावून 'स्वसंरक्षणार्थ' गोळी-बाराच्या फैरी झाडायला सुरुवात करील.

निपाणीच्या हत्याकांडानंतर पाकिस्तानचे सध्याचे राष्ट्रपती जनरल झिया ह्यांच्याविषयी माझ्या मनात एक वेगळाच आदर निर्माण झाला आहे. इस्लामी कायद्यानुसार राज्यकारभार चालवि-णारे हे राष्ट्रपती एखाद्याचा हात किंवा पाय तोडायचा असेल, एखाद्याला फटक्यांची शिक्षा द्यावयाची असेल किंवा गोळी घालून ठार मारायचं असेल तर शिक्षेची अंमलबजावणी भरचौकात, दिवसा-ढवळ्या सर्वांसमक्ष करतात ! वृत्तपत्रांच्या फोटोग्राफर्संना फोटो घेण्याची मनाई नसते ! पण आमच्या स्वतंत्र लोकशाही राज्यात शेतकऱ्यांचे हात-पाय मोडायचे झाले, त्यांना गुरासारखं बडवायचं झालं किंवा निर्दयपणे गोळ्या घालून ठार करायचं झालं तर सर्वप्रथम वार्ताहरांचे कॅमेरे हिसकावून घेण्यात येतात, त्यांना दमदाटी देऊन आंदोलनाच्या जागेवरून हुसकावून देण्यात येतं आणि कुणीही साक्षीदार नाही ह्याची खातरजमा झाल्यावर मनमानी अत्याचार करण्यात येतो. डिक्टेटर जनरल झियांचा सर्व मामला खुल्लमखुल्ला, तर लोकशाहीवादी गुंडूराव आणि त्यांच्या इतर भाईबंदांचा कारभार मात्र नेहमी चोरी चोरी ! अशा वेळी मनात एक प्रश्न निर्माण होतो, खाकी गणवेष धारण करणाऱ्यांना सरकार आत्मसंरक्षणार्थ बंदुका देतं आणि 'आत्मसंरक्षणाचा' अधिकार हे गणवेषधारी वारंवार वापरतात—सर्वसामान्य नागरिकांनी 'आत्मसंरक्षण' कसं करायचं ? ◘

५ एप्रिल १९८१. रात्रीचे साडेदहा-अकरा वाजत आले होते. तंबाखू आंदोलनाची तेवीसावी रात्र. आंदोलननगरात सर्वत्र सामसूम झाली होती. रवंथ करणाऱ्या शेकडो बैलांच्या गळ्यांतील घंटांचा लयबद्ध किणकिणाट तेवढा वातावरणात भरून राहिला होता. हजार-पंधराशे बैल गेले तेवीस दिवस काहीही काम न करता खुशाल बसून मजेत कडबा चघळत होते. ह्या आंदोलनात शेतकऱ्याला तेवीस दिवस शारीरिक विश्रांती मिळालीच; पण त्याच्या बैलालाही कधी नव्हे तो आराम मिळाला. काम न करता फुकटची वैरण खाऊन मजेत रवंथ करत बसायचं, अशी संधी बैलांना प्रथमच मिळाली असणार. सगळे बैल प्रथमच शेतकऱ्याला मनोमन दुवा देत असणार !

सडकेवर बसलेल्या आंदोलननगरीच्या एका बाजूला, न नांगर-लेल्या काळ्या मातीच्या शेतामध्ये, एका बाभळीशेजारी शेतकरी-संघटनेचा तंबू. तंबूवर पश्चिमेच्या वाऱ्यावर फडफडणारा शेतकरी-संघटनेचा लाल ध्वज सर्वत्र बैलांच्या मल-मूत्राचा, शिळ्या भाकरीचा, सुकलेल्या वैरणीचा आणि हजारो शेतकऱ्यांच्या घामाचा मातीशी एकजीव झालेला वास. शेतकऱ्यांच्या छावणीला साजेसा. सैन्याच्या छावणीनं युद्धभूमीवर एखाद्या ठिकाणी वीस-पंचवीस दिवस तळ ठोकला तर तिथं दारूगोळ्याच्या जळकट वासामध्ये, मृत्यूची सूचना देणारा, सडक्या मांसाचा आणि वाळलेल्या रक्ताचा वास मिसळलेला असतो.

आंदोलननगर म्हणजे शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्य संग्रामाचीच छावणी; पण शेतकऱ्यांचं हे स्वातंत्र्ययुद्ध महात्मा गांधींनी दाखवून दिलेल्या सत्याग्रहाच्या शांततापूर्ण मार्गानं चालणारं. इथं संख्या हीच ताकद आणि अहिंसा हीच खरी शक्ती. त्यामुळं शेतकरी आंदोल-नाच्या ह्या स्वातंत्र्ययुद्धभूमीवर मृत्यूची सूचना देणाऱ्या वासाचा मागमूसही नव्हता—पण मृत्यू मात्र रात्रीच्या उदरात दबा धरून बसला होता !

शेतकरी संघटनेच्या तंबूशेजारील बाभळीखाली कार्यकर्त्यांची बैठक भरली होती. शेतकरीनेते शरद जोशी निपाणीमध्ये युवक-नेते मोहन बुडके ह्यांच्याशी चर्चा करण्यात अडकले होते. बाभळी-खाली जमलेल्या शेतकरी कार्यकर्त्यांना प्राध्यापक सुभाष जोशी काहीसा भारावल्याप्रमाणं आवर्जून सांगत होता—

'उद्या सोमवारी सकाळी आपल्याला निपाणीत मोर्चा काढून, बँकांना घेराओ घालून, त्यांचं काम बंद पाडायचं आहे. सत्याग्रहींची संख्या कमी पडून उपयोगी नाही. बँका बेमुदत बंद पाडणं म्हणजं चेष्टा नाही. निपाणीची आर्थिक नाडी आपण आवळणार आहोत. सत्याग्रहींच्या संख्येला उद्या फार महत्त्व आहे. संपूर्ण अशोकनगर आपल्याला वेढायचं आहे. नेहरूचौकापर्यंत सत्याग्रहींची रांग शिल्लक असली पाहिजे.

उद्याच्या मोर्चात सर्वांनी अत्यंत शांततेनं आणि जबाबदारीनं वागायचं आहे. आपण शेतकरी संघटनेचे सत्याग्रही आहोत ही गोष्ट कुणीही विसरता कामा नये. तीन एप्रिल रोजी आपल्या आंदोलनात सहभागी झालेल्या पन्नास हजार शेतकऱ्यांनी एक अभूतपूर्व मिरवणूक

## आंदोलननगर म्हणजे शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्य-संग्रामाचीच छावणी !

काढून निपाणीतील नागरिकांना दिपवून टाकलं त्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे शनिवारी फक्त तीन गावच्या सत्याग्रहींनी मोर्चा काढून निपाणी बंद केली. उद्या सगळ्या गावच्या शेतकऱ्यांनी मिळून विराट मोर्चा काढून निपाणीमधील बँकांचं कामकाज बंद पाडायचं आहे. हे करताना कुठंही शांततेचा भंग होणार नाही ह्याची खबरदारी प्रत्येक सत्याग्रहीने घ्यायची आहे. आपल्या शांततामय आंदोलनाला डाग लागेल असं कृत्य कुणाच्याही हातून घडता कामा नये !

' निपाणीमधून सध्या बेळगावच्या दिशेनं सुरू असलेली एस्.टी.ची वाहतूक बंद पाडण्यासाठी आपण वेगळा शांततामय मार्ग अवलंबणार आहोत. त्याची चर्चा योग्य वेळी करण्यात येईल. आज त्या चर्चेत वेळ घालविण्याचं कारण नाही. उद्या सोमवारपासून एस्. एस्. एल्. सी.च्या परीक्षा सुरू होणार, त्यासाठी बाहेरगावाहून अनेक विद्यार्थी येणार. त्याची अडचण आपण करायची नाही. त्यामुळं आपल्याला विनाकारण विरोध निर्माण होईल. हा विरोध आपण टाळणं आवश्यक आहे.

' कार्यकर्त्यांनी आता सायकली घेऊन ताबडतोब आपआपलं गाव गाठायचं आहे. उद्या दिवस उजाडायच्या आत इथं आंदोलननगरात जास्तीत जास्त सत्याग्रही जमतील अशी व्यवस्था करायची आहे. उद्याची पहाट अत्यंत महत्त्वाची आहे ! आज रात्रीदेखील सत्याग्रहींची संख्या कुठल्याही परिस्थितीत पंधरा हजारापेक्षा कमी असता कामा नये. आता प्रश्न केवळ तंबाखूच्या भावाचा नसून शेतकऱ्याच्या प्रतिष्ठेचा आहे हे लक्षात ठेवा ! आपली ताकद संख्येमध्ये आहे आणि उद्याचा दिवस निर्णायक ठरण्याची जबरदस्त शक्यता आहे !

' उद्याचा बँका बंदचा कार्यक्रम आपण अतिशय शिस्तीनं पार पाडून दाखवायचा आहे. व्यापाऱ्यानी आज सकाळी निपाणीतून प्रतिमोर्चा काढला आणि भाडोत्री गुंडांकरवी गावात दगडफेक केली. ह्या भाडोत्री गुंडाच्या मोर्चात आणि शेतकरी संघटनेच्या खऱ्या सत्याग्रहींच्या मोर्च्यात जमीनअस्मानाचा फरक असतो हे आपल्याला निपाणीतील नागरिकांना आणि शासनाला दाखवून द्यायचं आहे !

शनिवारी निपाणी बंदच्या वेळी बँकांचे व्यवहार पण बंद पाडण्यात आले. आज रविवार. उद्या सोमवारी आपण पुन्हा बँका बंद पाडणार! निपाणीमधील नागरिकांची त्यामुळं थोडी अडचण होणार. त्यांना त्रास व्हावा अशी आमची इच्छा नाही. निपाणीमधील नागरिकांनी गेले तेवीस दिवस आपल्या आंदोलनाला सहानुभूती आणि पाठिंबा दिला आहे. प्रत्यक्ष मदत केली आहे. बँका बंद पाडून आपण तंबाखू व्यापारी आणि दलालांना अडचणीत टाकणार आहोत, त्यामुळं सामान्य नागरिकाचा आपल्याला पाठिंबाच राहील. तेव्हा सर्व सूचना लक्षात ठेवा आणि कामाला लागा !'

कार्यकर्त्यांची बैठक संपली. सुभाष जोशी माझ्या शेजारी येऊन गुडघ्याला मिठी मारून बसले. गुडघ्याला मिठी मारून बसणे ही सुभाष जोशींची खास लकब. ते असे बसले म्हणजे समजावं, त्यांची ध्यानसमाधी लागली !

सुभाष जोशी समाधिस्थ होण्याअगोदर त्यांना हलकेच हलवत मी म्हणालो— ' सर, जरा तंबाखू देता ?' हा प्राध्यापक सुभाष जोशी विडी आणि तंबाखू कामगार स्त्रिया व तंबाखूउत्पादक शेतकरी ह्यांच्यामध्ये ' सर ' ह्या नावानं प्रसिद्ध ! ह्या सरांवर सर्वांचं अतोनात प्रेम ! तंबाखू आणि विडी कामगार स्त्रियांचं ' सर ' म्हणजे विसाव्या शतकातील नवीन दैवतच ! निपाणीत आल्यानंतर काही दिवसांतच माझ्याही तोंडी ' सर ' हा शब्द रुळला.

गुडघ्याची मिठी सोडत सरांनी माझ्या हाती चंची दिली आणि जागरणानं लालबुंद झालेले डोळे माझ्यावर रोखत तारवटलेल्या चेहऱ्यानं ते म्हणाले, ' विजयराव, उद्याचा दिवस कठीण आहे !'

मी न बोलता चुना लावून तंबाखू मळत राहिलो. तंबाखूआंदोलनाची ही तेविसावी रात्र ! गेल्या बावीस रात्री झोपण्यासाठी मी नेहमी प्राध्यपक सुभाष जोशींच्या घरी जात असे. १४ मार्चला तंबाखूआंदोलन सुरू झाल्यापासून शेतकरी संघटनेचे प्रणेते शरद जोशी, सुभाष जोशी, प्रा. रमेश शिप्पूरकर, बेग, गनी पटेल, सातप्पा शेटके, जकाप्पा, एस्. टी. चौगुले इत्यादी कार्यकर्ते आणि बेळगाव-कोल्हापूरहून येणारे वार्ताहर आंदोलननगरीतील शेतकरी संघटनेच्या तंबूतच झोपत. मी आणि शंकर वाघ मात्र न चुकता झोपण्यासाठी रात्री सुभाष जोशींच्या घरी जात असू.

५ एप्रिल १९८१ च्या रात्री मात्र मी शेतकरी संघटनेच्या बाजूला बाभळीखाली उघड्यावर झोपायचं ठरवलं. शंकर वाघ काही कामानिमित्त चाकणला गेले होते. माझी बायको सरोजा सर्वांची जेवणं आटोपल्यावर सुभाष जोशींच्या पत्नीबरोबर घरी परतली होती. गेले तेवीस दिवस आंदोलननगरात सतत वावरणारे वार्ताहर नेमके आजच कुठं तरी गुल् झाले होते. अपवाद फक्त अलिबागच्या अरविंद वामन कुलकर्णींचा. ते आणि त्यांचे सहकारी श्री. म्हात्रे पाचशे किलोमीटर मोटारसायकलचा प्रवास करून निपाणीत दाखल झाले होते.

रात्री साडेअकराच्या सुमारास शरद जोशी युवक नेत्यांबरोबरची चर्चा आटोपून आंदोलननगरीत परतले. आज दिवसभर त्यांना खूपच दगदग झाली होती. रात्रीच्या गप्पांचा मोह टाळून ते सरळ झोपी गेले. शेतकरी संघटनेच्या तंबूशेजारील बाभळीखाली मी आणि सुभाष जोशी न बोलता पुतळ्यासारखे बसून होतो. काही वेळ तसाच गेला आणि हलक्या आवाजात सुभाष जोशी म्हणाले,

' बेळगावहून एस्आरपीच्या गाड्या आणि पन्नास बसेस सुटल्या आहेत. पहाटे तीन–साडेतीनला अटक सुरू करणार अशी खात्रीलायक खबर मिळाली आहे. '

मी काहीच बोललो नाही. हाताखाली तंबाखू धरून निवात बसून राहिलो. थोड्या वेळानं सुभाष जोशी म्हणाले,

' शरदरावांना कल्पना दिली पाहिजे ! '

तंबाखूची पिंक टाकत, मान उडवत मी म्हणालो, ' वीस–पंचवीस हजार शेतकऱ्यांना सरकार अटक करणं शक्य नाही, सर ! शरदरावांना सांगण्याची गरज आहे असं मला वाटत नाही. अजिबात अटक होणार नाही. मी तुमच्याबरोबर पैज घेतो. अटक करणं सरकारला परवडणार नाही. अटकेची नुसती हूल उठविली असणार ! शेतकऱ्यांच्यात घबराट पसरविण्यासाठी ! तुम्ही आरामात झोपा. शरदरावांना सांगण्याची काही गरज नाही. '

' मला वाटतं त्यांच्या कानावर घातलेलं बरं !' सुभाष जोशी अस्वस्थ होत म्हणाले.

मोठ्या भावाचा आव आणत त्याची पाठ थोपटत काहीशा आढ्यतेनं मी म्हणालो,

'अहो, कशाला उगाच काळजी करता ! सरकारनं अटक करावी म्हणून तुम्ही तर १४ मार्चपासून वाट पहात आहात. मग चिंता कसली ? झोपा आराम ! अटक–बिटक काही होत नाही. सरकार काय वेडं आहे काय इतक्याजणाना अटक करायला ? मी तुमच्या बरोबर पैंज घेतो. झोपा !!'

¤

६ एप्रिल १९८१. पहाटे तीनच्या सुमारास गाड्यांची घरघर ऐकून माझी झोप चाळवली. डोळे किलकिले करून आवाजाच्या दिशनं पाहिलं. दिव्याची दुपेडी माळ निपाणीच्या बाजूनं आंदोलन-नगरच्या दिशेनं संथपणे सरकत होती. गाड्याचा भलामोठा ताफा खर्जामध्ये मृत्युघोष करीत जवळ जवळ सरकत होता. काळजात एकदम चर्र झालं. एस्‌आरपीवाले पहाटे हमला करून झोपेत असलेल्या शेतकऱ्यांना उधळून तर लावणार नाहीत ना ? ह्या एस्‌आरपीवाल्यांचा काही भरवसा देता येत नाही !

– पण इन्स्पेक्टर इरेगौडा आणि सबइन्स्पेक्टर प्रकाश मुरगुड ह्यांनी शरद जोशीना वारंवार आश्वासन दिलं होतं– 'अटक करायची झाल्यास कमीत कमी बारा तास अगोदर पूर्वसूचना देऊ !' हे अधिकारी आतापर्यंत तरी सभ्यतेनं वागले होते. मग त्यांचं आश्वासन खरं की खोटं ?

मन सांगत होतं की असं तडकाफडकी पहाटेचं अटकसत्र सुरू होणं सर्वस्वी अशक्य ! अंधारात अचानक धाड घातल्याप्रमाणे अटक करण्याची जरूरच काय ? इथं कोणी भयंकर गुन्हेगार टोळीवाले किंवा दरवडेखोर नव्हते. गरीब बिचारे भारतीय शेतकरी शांतपणे सत्याग्रहाला बसले होते. त्यांना अतिशय शिस्तीनं आणि शांततेनं दिवसाउजेडी अटक करणं शक्य होतं. मग पहाटेची ही अंधाराच्या सहाय्यानं घातलेली धाड कशासाठी ? कदाचित ही पूर्वतयारी असेल ! प्रत्यक्ष अटकेला सुरुवात दिवस उजाडल्यावरच होईल !

सत्याग्रही शेतकऱ्याना अटक करण्यासाठी इन्स्पेक्टर इरेगौडा आणि सबइन्स्पेक्टर प्रकाश मुरगुड असे अंधारातून लपतछपत चोरासारखे कधीच येणार नाहीत ! गेले तेवीस दिवस हे अधिकारी आणि त्याचे पोलीस सत्याग्रही शेतकऱ्यांच्याबरोबर गुण्यागोविंदाने वावरले आहेत, शेतकऱ्यांबरोबर त्यांनी भाकरी खाल्ली आहे, भजनं म्हटली आहेत. शरद जोशी, सुभाष जोशी आणि इतर कार्यकर्त्यांबरोबर मनमोकळ्या गप्पा मारल्या आहेत. माझ्याशी, सरोजाशी दादा-वहिनी म्हणून हास्यविनोद केले आहेत. 'अटक करण्यापूर्वी बारा तास अगोदर पूर्वसूचना देऊ' असं वारंवार आश्वासन देणारे हे तरुण आणि तडफदार पोलीसअधिकारी तेवीस दिवस ज्या सभ्यतेनं सर्वांशी वागले होते, त्यावरून ते असे अंधारात धाड घालून अटकसत्र सुरू करतील, हे कदापी शक्य वाटत नव्हतं.

पडल्या पडल्या गाड्यांच्या ताफ्याकडं पहात मनातील उलटसुलट विचारांचा गुंता सोडविण्याच्या प्रयत्नात असतानाच मला हलवून उठवत सुभाष जोशी म्हणाले–

'गाड्या आल्यात, शरदरावांना उठवायच काय ?' जांभई देत मी मूर्खासारखं म्हणालो–

'झोपा हो सर ! आल्या असतील गाड्या ! शरदरावांना उठवायची काही गरज नाही. तुम्हाला आणि त्यांना अटक करायची असेल तर पोलीस येऊन आपणहोऊन उठवतील. तुम्ही कशाला तसदी घेता ? उजाडायला अजून बराच अवकाश आहे. मस्तपैकी झोप काढा !'

माझं वाक्य पुरं होण्याअगोदरच हातामध्ये दंडुके घेतलेल्या पंचवीस-तीस एस. आर. पी नी येऊन शेतकरी संघटनेच्या तंबूला गराडा घातला. एका पोलिसानं मग्रूरपणे काठीनं ढोसून मला उठवलं. सुभाष जोशीनं जाऊन शरद जोशीना जागं केलं आणि माझ्याकडे आरपार पहात 'सर' म्हणाले,

'तुम्ही हरलात, मी पैंज जिंकली !'

¤

६ एप्रिलची पहाट एक अनपेक्षित विधिलिखित घेऊन जन्मास आली होती. शरद आणि सुभाष जोशी झपाझप पावलं टाकीत पोलिसाच्या गाड्या जिथं थांबल्या होत्या त्या दिशेनं निघाले. अंगावरचं कांबळं फेकून देत मी धडपडून उठलो आणि अंधारात ठेचकाळत, धडपडत पळत पळत जाऊन त्यांना गाठलं.

पुणे-बंगलूर राष्ट्रीय महामार्ग नंबर चारवरील रास्ता रोको आंदोलनातील सत्याग्रहीचा पहिला तंबू पोलीस उध्वस्त करीत होते. रस्ता अडविण्यासाठी शेतकऱ्यानी बैलगाड्या आणि सायकलीचा वापर केला होता. इन्स्पेक्टर इरेगौडाच्या देखरेखीखाली पोलीस आणि एस्‌. आर. पी. सायकली इतस्तत: फेकत, बैलगाड्याची मोडतोड करीत रस्ता 'साफ' करण्याच्या कामाला लागले होते. तंबूमधील सत्याग्रहीना बुटाच्या ठोकरीनी तुडवत त्यांच्या सामानाची नासधूस पोलिसानी आरंभली होती. रमेश शिप्पूरकर जिवाच्या आकांतान ओरडत पोलिसांना रोकण्याचा निष्फळ प्रयत्न करत होते. आडदांड पोलिसाच्यामध्ये घुसून त्याना आवरण्याचा निकराचा प्रयत्न सुभाष जोशी करीत होते. हा सर्व प्रकार कमरेवर हात ठेवून निर्विकारपण पहात होते इन्स्पेक्टर इरेगौडा !

पोलिसानी नासधूस आरंभलेल्या ठिकाणी शरद जोशी पोहचताच इन्स्पेक्टर इरेगौडा म्हणाले– 'शरद, तुला आम्ही अटक केली आहे !' दोन पोलिसानी शरद जोशीचा दंड धरण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांना झुरळाप्रमाणं झटकून टाकत शरद जोशी शांतपणे म्हणाले,

'जरूर अटक करा. त्यासाठी तर आम्ही सत्याग्रह करून सविनय कायदेभंग केला आहे. –पण ही मोडतोड ताबडतोब थांबवा ! अशानं अनर्थ माजेल ! सत्याग्रही खवळतील आणि मग त्याना आवरणं कठीण जाईल. तुम्ही तुमच्या सर्व पोलिसाना प्रथम बाजूला उभं रहायला सांगा !'

शरद जोशीच्या विनंतीकडे दुर्लक्ष करीत पोलिसानी पहिल्या तंबूची मोडतोड चालूच ठेवली. सत्याग्रहीना बुटांनी ठोकरत ते

**सहा एप्रिलची पहाट एक अनपेक्षित विधिलिखित घेऊन जन्माला आली होती.**

स्वैरपणे सामानाची नासधूस करत होते. सुभाष जोशी वारंवार मध्ये पडून त्याना थांबवण्याचा प्रयत्न करत होते, पण पोलिसांच्या आडदांडपणासमोर त्यांचे सर्व प्रयत्न फेल ठरत होते. सत्याग्रही शेतकरी हवालदील होऊन नेत्याकडे पहात होते आणि मी अवाक् होऊन खाकी गणवेशधाऱ्यांची ही दरवडेखोरी पहात होतो. वातावरण क्षणाक्षणाला तंग होत चाललं आणि कुठल्याही क्षणी भडका उडणार असा रंग दिसू लागताच शरद जोशींनी इन्स्पेक्टर इरेगौडाला पुन्हा एकदा विनंती केली–

'तुम्ही ही नासधूस ताबडतोब थांबवा, नाही तर जो अनर्थ ओढवेल त्याची सर्व जबाबदारी तुम्हाला स्वीकारावी लागेल !'

शरद जोशींच्या आवाजातील विलक्षण करारीपणा पोलिसाना जाणवला असावा. त्यानी मोडतोड थांबवली. एव्हाना अटकसत्र सुरू झाल्याची बातमी पुणे-बंगलूर हमरस्त्यावर निपाणीपासून यमगर्णीपर्यंत पसरलेल्या आंदोलननगरात वाऱ्यासारखी पसरली. राहुट्यामधून भराभर दिवे पेटले आणि पाठोपाठ शेतकरी संघटनेच्या घोषणाचे निनाद कानांवर पडू लागले. हाती दंडुके घेतलेली पोलिसमंडळी 'टेन्स' झाली. आता कुठल्याही क्षणी काहीही घडू शकलं असत. हजार-पाचशे पोलीस आणि पंधरा-वीस हजार शेतकरी सत्याग्रही ! चेहऱ्यावरची चलबिचल आवरण्याचा प्रयत्न करत खोटं खोटं हसत इन्स्पेक्टर इरेगौडा पोकळ दिमाखानं म्हणाले–

'शरद, आता तू आमच्या अटकेत आहेस. तू आम्हाला सूचना देऊ शकत नाहीस. तुला तुझ्या सत्याग्रहींना काही सूचना द्यावयाच्या असतील तर आम्ही तुला थोडा वेळ देऊ; पण जास्त नाही– झटपट काय ते ठरव !'

ह्या पोलीसअधिकारी ज्या उर्मटपणे आणि अरेरावीनं अरेतुरेची भाषा वापरत होता ती ऐकून विलक्षण चीड आली; पण ह्या चीड येण्याला काहीच अर्थ नव्हता. मी जरी स्वतंत्र भारताचा स्वतंत्र नागरिक असलो तरी कमरेला पिस्तूल आणि हातामध्ये दंडुका धारण केलेल्या 'इंडिया'च्या पोलिसासमोर माझं स्वातंत्र्य किती तकलादू आहे ह्याची त्या वेळी प्रकर्षानं जाणीव होत होती. ज्याच्या कमरेला पिस्तूल आहे, ज्याच्या हाती सोटे आणि रायफली आहेत, ही साधनं अनिर्बंधपणे वापरण्याची सत्ता ज्याच्यापाशी आहे, ज्याना राज्यकर्त्यांचा पाठिंबा आहे अशा 'सामर्थ्यवान' लोकानी अरेरावी आणि मग्रूरी दाखवायची नाही तर कुणी ? पोलीसअधिकाऱ्याच्या ह्या उद्दाम वागणुकीच शरद जोशीना अजिबात आश्चर्य वाटलं नसावं. आवाजातील शांतपणा किंचितही ढळू न देता ते पुन्हा पुन्हा विनंती करत होते–

'–तुम्ही विनाकारण घाई करू नका. मी सर्व सत्याग्रहीना योग्य त्या सूचना देतो. सगळेजण शांतपणे हाताची घडी घालून बसतील आणि अटक करवून घेतील. तुम्ही मात्र त्यांच्या सामानाची मोडतोड करू नका ! रस्ते अडविण्यासाठी त्यानी बैल आणि गाड्या वापरल्या आहेत, तेव्हा हा मुद्देमाल जप्त करून तुम्ही त्याच्या रीतसर पावत्या द्या !'

आपल्या झुपकेदार मिशाना पीळ भरत इन्स्पेक्टर इरेगौडा म्हणाले–

'शरद, तू एक गोष्ट सारखी विसरतो आहेस. तू आता आमच्या अटकेत आहेस. आम्ही काय करावं हे तू आम्हाला सांगू शकत नाहीस. आम्ही बैलगाड्या जप्त करणार नाही. त्यांची मोडतोड झाल्यास आमचा इलाज नाही–आम्हाला हा रस्ता आज मोकळा करायचा आहे !'

इन्स्पेक्टर इरेगौडा हे बोलत असतानाच जणू इशारा मिळाल्याप्रमाणे सात-आठ पोलिसानी एक बैलगाडी रस्त्याच्या कडेवरून खाली ढकलून दिली आणि रस्त्यावरील तंबूचे वासे मोडण्यास आरंभ केला, त्यांना आवरत शरद जोशी प्रथमच आवाज काहीसा चढवत म्हणाले–

"इन्स्पेक्टर इरेगौडा, तुम्ही मला एका सभ्य गृहस्थाप्रमाणं वचन दिलं होतंत की, अटक करावयाची झाल्यास तुम्ही आम्हाला कमीत कमी बारा तास अगोदर सूचना द्याल !"

"ते खरं आहे शरद–पण माझा नाइलाज आहे !" खांदे उडवत इन्स्पेक्टर इरेगौडा म्हणाले. "मला वरिष्ठाच्या सूचना पाळणं भाग आहे–आणि हे बघ शरद, मला चर्चा करायला आता अजिबात वेळ नाही. तुला तुझ्या कार्यकर्त्यांना ज्या सूचना द्यायच्या असतील त्या झटपट दे ! तू आमच्या अटकेत आहेस हे विसरू नकोस ! आम्हाला आमची ड्यूटी पार पाडली पाहिजे !"

"इतके दिवस आमच्याशी एक सभ्य गृहस्थ बोलत होता, आता खरेखुरे इन्स्पेक्टर इरेगौडा आमच्याशी बोलताहेत–" शरद जोशींचा आवाज धारदार झाला होता. इन्स्पेक्टरसाहेबांकडे एक जळजळीत दृष्टिक्षेप टाकून ते पुढं म्हणाले— "तुम्ही एक कर्तव्यदक्ष अधिकारी आहात असं दिसतय, तुम्ही तुमचं काम करा. मला माझं करू द्या ! एक गोष्ट कृपा करून विसरू नका, १४ मार्चला आम्ही रस्ता रोको आंदोलन सुरू केलं त्या वेळची परिस्थिती वेगळी होती. सगळे सत्याग्रही अटक होण्याच्या तयारीनंच आले होते, त्यानंतर गेले तेवीस दिवस हे सत्याग्रही रस्त्यावर बसून आहेत, प्रत्येक गावच्या शेतकऱ्यानी ह्या रस्त्यावर एक लहानसं खेडं, लहानसं घर उभं केलं आहे. त्या घरात त्याची भांडीकुंडी आहेत. कपडे आहेत. भक्तिगीत आणि भजनं म्हणण्यासाठी आवश्यक असलेले टाळमृदुंग, चिपळ्या, एकताऱ्या, हार्मोनियम वगैरे मौल्यवान् चीजवस्तू आहेत, तुम्ही कर्तव्याच्या नावाखाली धसमुसळेपणा केलात तर ह्या गरीब शेतकऱ्याच विनाकारण अतोनात नुकसान होईल !"

शरद जोशींच्या बोलण्याचा कर्तव्यदक्ष इन्स्पेक्टर इरेगौडाच्या चेहऱ्यावर यत्किंचितही परिणाम होत नव्हता; पण त्याच्यामागे उभं असलेले एक वयस्क पोलीसअधिकारी मात्र हेलावले होते. डोळ्यातील पाणी आवरत दाटलेल्या आवाजात ते म्हणाले–

"मिस्टर जोशी, आपण म्हणता ते खरं आहे. ह्या शेतकऱ्यानी मोठ्या आशेनं रस्त्यावर सत्याग्रह करून एक तात्पुरता निवारा, तात्पुरता संसार उभा केलाय. त्याच हे तात्पुरतं घर आम्ही उध्वस्त करणार नाही ! तुम्ही सत्याग्रहीना आवश्यक त्या सूचना द्या–आम्ही त्याच घर उध्वस्त करणार नाही– " पुढ बोलणं त्या अधिकाऱ्याला अशक्य झाल होत. त्याना हातान गप्प राहण्याची सूचना देत इन्स्पेक्टर इरेगौडा म्हणाले–" शरद, झटपट–मला जास्त वेळ नाही !"

शरद जोशी, सुभाष जोशी आणि रमेश शिप्पुरकर कार्यकर्त्यांना भराभर सूचना देऊ लागले.

'आपापल्या तबूतील सामान नीट एकत्र करून रस्त्याच्या

कडेला ठेवा! तंबू काढून, त्याची ताडपत्री, बारदान, बाबू वगैरे सामान नीट बांधून बाजूला करा. बैलगाड्या रस्त्यामधून काढून बाजूला घ्या आपल्या गावची चार-पाच जबाबदार माणसं ह्या सामानाची देखभाल करण्यासाठी मागे ठेवा आणि इतर सर्वजण अटक करून घेण्यासाठी शांतपणे, हाताच्या घड्या घालून ओळीनं बसून रहा! गाडी आली की शिस्तीनं आत जाऊन बसा. प्रत्येक गाडीमध्ये एक-दोन कार्यकर्ते असतील ह्याची दक्षता घ्या! 'शेतकरी संघटनेचा विजय असो!' आणि 'तंबाखूला भाव मिळालाच पाहिजे!' ह्याव्यतिरिक्त दुसऱ्या कुठल्याही घोषणा देऊ नका. शांततेचा भंग होईल असं कुठलंही कृत्य करू नका. तुम्हाला मॅजिस्ट्रेटसमोर हजर करण्याऐवजी पोलिसांनी मध्येच कुठं तरी सोडायचा प्रयत्न केला तर गाडीमधून खाली उतरू नका!"

नेत्यानी दिलेल्या सूचना सत्याग्रही तंतोतंत पाळू लागले. पधरा हजाराचा जमाव एखाद्या सैन्यानं शिस्तबद्ध कवायत करावी त्याप्रमाणं कामाला लागला. एकापाठोपाठ एक तंबू हटविण्यात येऊ लागले. सत्याग्रही आपआपल्या तंबूतील सामान रस्त्याच्या कडेला व्यवस्थित रचून, रस्त्यामधील गाड्या आणि बैल बाजूला सारून *अटकेच्या तयारीनं हाताच्या घड्या घालून शिस्तीनं बसून राहिले!*

साडेतीन-पावणेचारच्या सुमारास पहिल्या दोन खेड्यातील सत्याग्रहीना अटक करून बसेस सुरू झाल्या. तिसरी बस येऊन रस्त्याच्या मधोमध उभी राहिली. एव्हाना एक वरिष्ठ पोलीसअधिकारी अटकक्षेत्रावर येऊन पोहचले होते. त्यानी इतर दुय्यम अधिकाऱ्याना, फौजदारांना भराभर काही सूचना दिल्या. इन्स्पेक्टर इरेगौडा म्हणाले – "शरद, तू आणि तुझे साथीदार आता बसमध्ये चढा!"

पोलिसानी शरद जोशी, सुभाष जोशी, रमेश शिप्पुरकर आणि मला जवळजवळ ढकलत एका बसपाशी आणलं. शेजारी उभ्या असलेल्या एका पोलीसअधिकाऱ्याला मी म्हणालो–"तुम्ही मला का अटक करता? मी एक लेखक आणि वार्ताहर आहे–" त्या अधिकाऱ्यानं माझ्या बोलण्याकडं दुर्लक्ष केलं. दोन-तीन पोलिसांनी मला मागून बसच्या दिशेनं ढकललं तेव्हा शरद जोशीनी दुसऱ्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याला सांगितलं– "ह्याला अटक करू नका! हा वार्ताहर आहे." माझ्याकडे रागानं पहात तो अधिकारी म्हणाला– "वार्ताहर आहात तर शर्टावर त्याप्रमाणे बिल्ला का लावत नाही? तिथं बाजूला थाबा. इथं मधेमधे तडमडू नका!"

इन्स्पेक्टर इरेगौडा शरद जोशी, सुभाष जोशी आणि रमेश शिप्पूरकरना एका बसमध्ये जबरदस्तीने चढवत होते. शरद जोशी त्याना विनंती करत होते–"मला अटक करण्याची घाई करू नका– सर्व सत्याग्रहीना अटक झाल्यानंतर मला अटक करा! मी इथं थाबून सर्वांना शांततेनं अटक करवून देतो!"

बसचा दरवाजा बंद करून ड्रायव्हरला चलण्याचा इशारा देत पोलीसअधिकारी म्हणाले, "तुम्ही आता जा. इकडचं आम्ही सर्व बघून घेतो!" शरद जोशी, सुभाष जोशीना घेऊन बस निघून गेली आणि रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका फौजदाराला मी विचारलं –"सत्याग्रहीना कुठं नेण्यात आलंय काही कल्पना?" त्यानं उत्तरादाखल नुसतेच खादे उडवले आणि तोंड फिरवले. मघाशी ज्यानं मला दम दिला होता तो वरिष्ठ अधिकारी पुन्हा माझ्याजवळ येत म्हणाला, "वार्ताहरमहाशय, फार इकडं तिकडं करू नका. इथंच थाबा. इथून पुढं जाऊ नका!"

पहाटेचे साडेचार–पावणेपाच झाले होते. सिगरेट ओढत मी चिंचेच्या बुध्याला टेकून बसून राहिलो. सव्वापाचच्या सुमारास निपाणीमधून एक कार्यकर्ता मोटारसायकल घेऊन आला. त्याला मी सांगितलं–' असाच परत जा आणि सराच्या घरी निरोप दे– अटक झाल्याची बातमी सांग आणि माझ्या बायकोला कॅमेराबॅग घेऊन ताबडतोब इथं यायला सांग किंवा तूच आणून सोड!'

कार्यकर्ता मोटारसायकल वळवून निपाणीच्या दिशेनं गेला. मी सत्याग्रहीना घेऊन जाणाऱ्या बसेस मोजत बसलो. कानात सुभाष जोशीचं वाक्य घुमत होतं–' तुम्ही हरलात, मी पैज जिंकली!'

¤

आंदोलननगरीतील सहा एप्रिलची पहाट एक वेगळंच रूप घेऊन *आली होती. एरवी सौभाग्यलेणं मिरवत येणारी पहाट आज कपाळावरचं* कुंकू पुसून आली होती. पूर्वक्षितिजावर उदासकळा पसरली!

एरवी ह्या आंदोलननगराला जाग यायची ती नेहमी नवचैतन्यानं बहरलेली. आज मात्र चैतन्य हरवलं होतं. एकामागोमाग एक बस रस्त्याच्या मध्यावर येऊन थाबत होती. पन्नास–पचावन्न सत्याग्रही रांगेनं आत जाऊन बसत होते. बस सुरू झाली की, शेतकरी संघटनेचा जयजयकार करत होते.

दिवस उजाडायच्या सुमारास कामगारनेत्या अक्काताई कावळे झपझप चालत अटकक्षेत्रापाशी आल्या. आजूबाजूच्या खाकी गणवेषधाऱ्यांकडे जळजळत्या नजरेनं पहात त्यांनी कामगार स्त्रियांना काही सूचना दिल्या आणि चाळीस–पन्नास स्त्रियांच्या घोळक्याचं नेतृत्व करत त्या एका बसमध्ये जाऊन बसल्या. बस सुरू झाली तेव्हा 'शेतकरी कामगार एकजुटीचा विजय असो!' अशा घोषणांनी हायवे नंबर फोरच्या आसपासचा परिसर थरारून उठला. अक्काताई कावळे अटक होऊन गेल्या तेव्हा पोलीसअधिकाऱ्यानी सुटकेचा नि:श्वास टाकला असावा. पोलिसाना अक्काताई कावळेबद्दल आदरमिश्रित भीती वाटत होती.

सहाच्या सुमारास माझी बायको सरोजा कॅमेरे घेऊन आंदोलननगरात पोहोचली. वरिष्ठ पोलीसअधिकाऱ्याची परवानगी घेऊन तिनं फोटोग्राफीला सुरुवात केली. निपाणीच्या टोलनाक्यापासून आम्ही यमगर्णीपर्यंत फेरफटका मारला. रस्त्याच्या कडेला सामान गुंडाळून बसलेले वृद्ध सत्याग्रही, रस्त्यामधले अडथळे दूर करणारे पोलीस, अटक करून घेणारे सत्याग्रही, रस्त्याच्या दुतर्फा हातामध्ये लाठ्या घेऊन शांतपणे उभे असलेले एस. आर. पी. ह्याचे सरोजा फोटो घेत असताना मी जकाप्पा, सातप्पा, एस. टी. चौगुले ह्याच्याशी गप्पा मारत थट्टामस्करी करत होतो सबइन्स्पेक्टर प्रकाश मुरगुड

**पंधरा हजाराचा जमाव एखाद्या सैन्यानं शिस्तबद्ध कवायत करावी तसा कामाला लागला.**

सरोजाला फोटोग्राफीसाठी हवं ते सहाय्य दिल्यानंतर आमच्यात येऊन इकडच्या–तिकडच्या गप्पा मारत होते.

¤

पोलीस आणि त्याचे अधिकारी आता बऱ्याच 'रिलॅक्सड मूड' मध्ये दिसत होते, सकाळी तीन साडेतीन वाजता वातावरणात जो एक भयानक तंगपणा आला होता तो आता खूपसा निवळला होता, तेवीस दिवस दिमाखानं उभ्या असलेल्या आंदोलननगरीला मात्र एखाद्या चक्रीवादळाचा तडाखा बसलेल्या वसाहतीचं स्वरूप आलं होतं. जागोजागी उखडलेले तंबू, सत्याग्रहींच्या सामानाचे ढिगारे आणि उन्मनस्क अवस्थेत दिशा हरवल्यासारखे वावरणारे शेतकरी! आंदोलननगरी उध्वस्त झाली होती; पण शेतकऱ्यांच्या आशाआकांक्षाचं काय? अंकुरणार का धुळीला मिळणार? अटक सुरू झाली; पण हा शेतकऱ्यांचा जय की पराजय? ह्या क्षणी उत्तर देणं कठीण होतं.

साडेसात आठच्या सुमारास आंदोलननगरीच्या चारी दिशांनी दूरवरून घोषणांचे सादपडसाद कानी पडू लागले, तशी पोलीसखात्याची चलबिचल झाली. रस्त्यावर माडया घालून बसलेल्या हजारो शेतकऱ्यांचे चेहरे एकाएकी आनंदानं फुलून उठले. पहावं त्या बाजूला क्षितिजावर माणसाचे घोळके दिसू लागले.

सारी शेतं आणि माळरानं शेतकऱ्यांच्या जथ्यांनी भरून गेली. 'शेतकरी संघटनेचा विजय असो!' अशा घोषणा देत शेतकऱ्यांचे लोंढेच्या लोंढे आंदोलननगराच्या दिशेनं येऊ लागले. आतापर्यंत पस्तीस गाडया भरून फक्त आठ–दहा गावचे सत्याग्रही अटक झाले असावेत. पाचशे मीटर रस्ता खुला झाला असावा. यमगर्णीपर्यंत अजून तीन किलोमीटर रस्ता 'साफ' करायचा होता. रस्त्यावर अंदाजे दहा–बारा हजार शेतकरी गटागटानं माडया घालून हाताची घडी घालून बसलेले आणि आता पहावं तर चोहोबाजूनी हजारो शेतकऱ्यांचा लोंढा आंदोलननगराच्या दिशेनं घोषणा देत येत असलेला! ह्या सर्वांना सरकार अटक करणार? अटक आजच्या दिवसात पुरी होणार? मग हे रस्ता मोकळा कसा करणार? हजारो शेतकऱ्याना अटक करून सरकार ठेवणार कुठे? दहा मिनिटाला एक बस आणि पन्नास शेतकरी सत्याग्रहींना अटक, या हिशेबानं पन्नास हजार शेतकऱ्याना अटक करायला किती वेळ लागेल?

सकाळी नऊच्या सुमारास बेचाळिसावी बस सत्याग्रहींची तुकडी घेऊन गेली, ती शेवटची बस! रस्त्यावर पंधरा ते वीस हजार सत्याग्रही शांतपणे बसून होते. मिनिटागणिक त्यांच्या संख्येत भर पडत होती. मी आणि सरोजा सत्याग्रहींच्या एका तुकडीबरोबर गप्पा मारत पान जमवत होतो. इतक्यात सबइन्स्पेक्टर मुरगुड प्रसन्नपणे हसत आमच्याजवळ आले. डोळ्यावरचा सोनेरी फ्रेमचा काळा चष्मा काढून रुमालानं काचेवरची धूळ पुसत सरोजाला म्हणाले, 'वहिनी, झाले का फोटो काढून? आमच्या बसेस संपल्या–पुन्हा बसेस यायला दीड-दोन तास लागणार. तुम्ही पाहिजे असल्यास घरी जाऊन जेवण वगैरे उरकून बारानंतर या! हे अटकप्रकरण उद्यापर्यंत असंच चालू रहाणार असं दिसतय!' सब्-इन्स्पेक्टर मुरगुडना मी म्हणालो, 'इतक्या शांतपणे तुम्ही अटक करताय हे काही तुम्हाला शोभत नाही! तुम्ही हातात एक काठी घेऊन शेतकऱ्याच्या पाठीत हाणता अशी पोज घ्या. तेवढा फोटो घेतला की आम्ही निघतो!' मुरगुड म्हणाले, 'दादा, कशाला आम्हाला उगीच बदनाम करता?' त्याच वेळी एक फौजदार कपाळावर हात मारून येत म्हणाला–'शेतकऱ्यांचे हे लोंढे कुणी तरी थांबवले पाहिजेत. हे असेच येत राहिले तर अटक करण्याचं काम कधीच संपणार नाही! कठीण प्रसंग ओढवेल!'

सत्याग्रहींचा आणि पोलीसअधिकाऱ्यांचा निरोप घेऊन मी आणि सरोजा साडेनऊच्या सुमारास सुभाष जोशीच्या घरी परतलो. डॉ. ध्रुव मंकड सतत खणखणणाऱ्या फोनची राखण करत बसले होते. त्याना आंदोलननगरातील अटकसत्राचा वृत्तांत सांगून मी दाढी, आंघोळ उरकली. कपडे बदलले आणि सुभाषच्या पत्नीनं-सुनीताअक्कानं-दिलेला चहा पीत पुण्याला परतण्याच्या विचारात गढलो. ह्या तंबाखू–आंदोलनाच्या अभ्यासानिमित्त मी जवळजवळ जानेवारी महिन्यापासून पुणं सोडून ह्या परिसरात फिरत होतो. आंदोलनाचं एक पर्व संपत होतं आणि आता घरी परतायला हरकत नव्हती.

९ वाजून पंचावन्न मिनिटांनी फोन खणखणला. गोकाकहून शरद जोशी बोलत होते. त्याना, सुभाष, शिप्पुरकर आणि इतर सत्याग्रहींना बारा दिवसांचा रिमांड देऊन बेल्लारीच्या तुरुंगात नेण्यात येत होतं. आंदोलननगरातील अटक शांततेनं चालू असल्याची, आणलेल्या बसेस संपल्यामुळे पोलीस आणखी बसेसची वाट पहात असल्याची खबर सांगून मी शरद जोशींचं अभिनंदन केलं. त्यांच्याकडून लगेच प्रतिसाद न आल्यामुळं क्षणभर फोन शांत राहिला. मी हॅलो–हॅलो करून विचारणा करत असताना शरद जोशींचा आवाज कानावर पडला. काहीशा चिंतेनं ते विचारत होते– 'कमीत कमी तीस हजार शेतकरी अटक करून घ्यायला तयार असतील ह्याची पुरेपूर कल्पना असताना पोलिसांनी फक्त चाळीस-पन्नास बसेसची सोय करावी हे आश्चर्य आहे. फक्त दोन-अडीच हजार जणांना अटक केल्यानंतर उरलेल्यांचं ते काय करणार?... पण तुम्ही म्हणता त्याप्रमाणे शांततेनं अटक होत असेल तर आपण जिंकली असं समजायला हरकत नाही!'

तीस हजार शेतकरी अटक करून घ्यायला तयार असताना पोलीस फक्त पन्नास गाडया घेऊन का आले? त्यांनी तीसच्या तीस हजार अटक केले असते तर आणखी कमीत कमी वीस हजार शेतकरी सत्याग्रही पुन्हा शांतपणे रस्ता अडवून बसले असते! मग पोलिसांनी काय केलं असतं?– साडेअकरा वाजता ह्याचं उत्तर पुरात्यासकट मिळालं.

सकाळी सत्याग्रहींच्या पहिल्या तुकडीबरोबर अटक झालेल्या सौ. मालतीबाई शिंदेंचे यजमान रक्तबंबाळ अवस्थेत सुभाष जोशीच्या घरी दाखल झाले. घरात शिरता शिरता ते म्हणाले– 'तिथं भयानक लाठीमार आणि बेछूट गोळीबार चाललाय, हजारो जण जखमी झालेत, अनेक जण जागच्या जागी मेलेत!'

श्रीयुत शिंदेंचा शर्ट रक्तानं भरला होता. डोक्याच्या मागच्या बाजूला बोटभर जखम झाली होती. भळाभळा रक्त वाहात होतं. डॉ. ध्रुव मंकड फोनशेजारून ताडकन उठले, शिंदेना त्यांनी आतील खोलीत नेलं आणि झपाट्यानं प्राथमिक उपचार करून

रक्तस्राव थांबवला, ड्रेसिंग केलं. एस. आर. पीनी शिंदेचं डोकं तर फोडलंच होत; पण लाठीमारान पाठ अक्षरशः सोलून काढली होती! नऊ वळ पाठीवर स्पष्टपणे दिसत होते. मानेवर दोन वळ. दंडावर दोन–पण हा मानी माणूस हूं का चू करत नव्हता! त्यांच्याजागी दुसरा असता तर जागीच कोसळला असता!

शिंदेंना त्या अवस्थेत बघून माझं मन दुभंगलं. कर्नाटकच्या पोलिसांनी शेवटी आपलं खरं रूप प्रकट केलं होतं–खाकी वेष धारण करणारे दरवडेखोर! डॉ. ध्रुव मंकडनी श्री. शिंदे ह्यांचेवर आवश्यक ते उपचार केल्यानंतर त्यांच्या परवानगीनं मी मुलाखत टेप केली. शिंदे सांगत होते–

'माझं नाव राजाराम दत्ताजी शिंदे. वय पंचावन्न. पहाटेपासून आंदोलननगरात सत्याग्रहींची धरपकड सुरू झाली. माझ्या पत्नी मालतीबाई शिंदे ह्याना सकाळीच अटक करण्यात आली. मला अटकेची बातमी मिळताच ल्यूना घेऊन मी आंदोलननगराकडे गेलो. तिथे प्रत्येक गावचे सत्याग्रही आपआपलं सामान व्यवस्थित आवरून शांतपणे बसून होते. एका पाठोपाठ एक गाड्यातून सत्याग्रहीना अटक करून नेण्यात येत होतं. सगळं व्यवस्थित चालू होतं. नऊच्या सुमारास शेवटच्या दोन बसेस सत्याग्रहीना भरून घेऊन निघून गेल्या. मी घरी येऊन माझ्या मुलीला काही सूचना दिल्या आणि दहाच्या सुमारास पुन्हा आंदोलननगरात आलो.

'अटक न झालेले हजारो सत्याग्रही गटागटानं रस्त्यावर बसून होते. आजुबाजूच्या गावांतून हजारो शेतकरी अटक करवून घेण्यासाठी आंदोलननगरच्या दिशेनं येत होते. ज्या उत्साहानं चारी दिशांनी शेतकरी येत होते त्यावरून दुपारपर्यंत तीस–चाळीस हजार शेतकरी सहज जमणार असा रंग दिसत होता.

'–सातप्पा शेटके, जकाप्पा वगैरे कार्यकर्ते शेतकऱ्यांना व्यवस्थित रांगेमध्ये बसवत होते. आंदोलकाच्या पहिल्या गटासमोर दहा बारा एस्. आर. पी. कडं करून उभे होते. एस्. आर. पीच्या बऱ्याच गाड्या यावयास सुरुवात झाली होती. त्यातून उतरलेले पाच-पन्नास एस्. आर. पी. सत्याग्रहींच्या एका बाजूला येऊन उभे राहिले. काही एस्. आर. पी. निपाणीचा 'बायपास' आहे त्या बाजूनं उभे राहिले. त्यांच्यापैकी एकानं काही तरी खूण केली आणि दोन्ही बाजूनी आणि समोरून एस्. आर. पी. एकाएकी आंदोलकांवर तुटून पडले! त्यांनी एकदम लाठीहल्ला सुरू केला. त्यात मी सापडलो. माझ्या खांद्यावर, मानेवर, डोक्यात, पाठीत दणादण लाठ्या बसू लागल्या. काही एस्. आर. पी. बंदुकीच्या दस्त्यानं सत्याग्रहीना मारू लागले. त्या वेळी बायपासवर अर्धा डझन जीप्सच्या बाजूला उभ्या असलेल्या पोलीस-अधिकाऱ्यांनी गोळीबार केला!

'शेतकरी चिडले आणि त्यानी दगडफेक सुरू केली, गोळीबार सुरू झाला तेव्हा सत्याग्रही आजुबाजूच्या शेतात पळाले. एस. आर. पी. त्यांच्या पाठीशी लागून लाठीहल्ला करतच होते.

'माझ्या डोक्याला लाठीहल्ल्यात जखम झाली, शर्ट सगळा रक्तानं भिजून गेला. मी त्या गोंधळातून कसबसा बाहेर पडलो. माझी ल्यूना घेतली आणि सरळ इथं सुभाष जोशींच्या घरी आलो. मी ल्यूनावरून निघालो तेव्हाही एस् आर. पी नं माझ्या पाठीत लाठ्या घातल्या!

'साधारण अकराच्या सुमारास ही घटना घडली. मी निघालो तेव्हा लाठीमार, गोळीबार सुरू झाला होता. मार खावा लागल्यामुळं शेतकऱ्याचा संयम सुटत चालला होता. ते पोलिसांवर दगडफेक करत होते!'

पोलिसांच्या लाठीमारानं डोक्याला झालेल्या जखमेतून भळाभळा वाहणारं रक्त डॉक्टरी उपचारानंतर थांबल्यावर घेतलेली ही एका सद्गृहस्थाची मुलाखत आहे.

हे इरेगौडा, हे मुरगुड आणि त्यांच्या हाताखाली असलेले पोलीस हे सरकारी नोकर तेवीस दिवस शेतकरी सत्याग्रहाच्या सहवासात राहिले, शेतकऱ्यांशी हसत खेळत बोलले, शेतकऱ्याची झुणका-भाकर ह्यानी खाल्ली; पण शेवटी हे जागले तंबाखू व्यापारी आणि दलालाच्या तूप-रोटीला!

आजपर्यंत अनेक दशकं निपाणीतील हरामखोर तंबाखू व्यापारी आणि दलालानी, तंबाखू उत्पादक शेतकऱ्याला काटा सूट, गाडी-सूट, काडीमाती सूट, हवासूट अशा रिवाजाखाली, तंबाखूचं वजन करताना, पन्नास किलोमागे पंधरावीस किलो 'सूट' घेऊन लुटलं! तंबाखूचं दाम देताना पुन्हा रिवाजाच्या नावाखाली लाभसूट, शेकडा सूट वगैरे गैरव्यवहारानं आणखी लुटलं. सर्वस्व नागवलेल्या ह्या शेतकऱ्यानं ह्या बेकायदेशीर 'सुटी' रद्द व्हाव्यात आणि त्याचा उत्पादनखर्च भरून निघेल असा भाव तंबाखूला मिळावा म्हणून १४ मार्च १९८१ रोजी 'रस्ता रोको' आंदोलन सुरू झालं. सरकारनं शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्याकडे दुर्लक्ष तर केलंच, पण तेवीस दिवसानंतर हे शांततामय आंदोलन चिरडून टाकताना अमानुष बळाचा वापर केला आणि शेतकऱ्याकडून, त्याच्या तंबाखूला रास्त भाव देण्याअगोदर एक नवीन 'सूट' घेतली–रक्तसूट!

हे असं का घडलं? कसं घडलं? सरकारनं व्यापारी दलालांचं खिदमतगार बनून खाकी गणवेषधारी दरवडेखोरामार्फत ही 'रक्त-सूट' कशी आणि का वसूल केली? हे सर्व समजण्यासाठी निपाणी-मधील तंबाखूसम्राट देवचंद शहा, वेणीचंद दोशी, कुरबेट्टी, कोठीवाले, सांबारवाले, मानवी, देशमाने ह्या नामवंत मंडळीविषयी तंबाखू उत्पादक शेतकरी आणि विडी आणि तंबाखू कामगार स्त्रिया काय सांगतात ह्याचा अभ्यास केला पाहिजे.

६ एप्रिल १९८१ रोजी निपाणी येथे राष्ट्रीय महामार्ग नंबर चारवर वसलेल्या आंदोलननगरातील सत्याग्रहीवर पोलिसांनी 'आत्मसरक्षणार्थ' गोळीबार' करून तेरा जणाचा बळी घेतला! तीस–पस्तीस शेतकरी गोळीबारात जखमी झाले. हजारो शेतकरी लाठीमारात जखमी झाले– शेकडो अपंग झाले! राजमान्य राजश्री मुख्यमंत्रीसाहेब गुंडूराव ह्या अत्याचाराची जबाबदारी स्वीकारतील काय? त्याना स्वीकारावीच लागेल!

(क्रमशः)

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन )

श्यामचा संसार (कथा ११ वा)

फिरोझ रानडे

# श्याम आणि त्याचे नशीब

'तुमच्या कुंडलीत पत्नी-सुख नाही.' ज्योतिषीबुवांनी श्यामच्या शंकरपाळ्यासारख्या डिझाइनच्या कुंडलीकडे पाहात स्पष्ट शब्दात व ठामपणे म्हटले.

श्यामचा ज्योतिष्याबद्दलचा जो काय थोडा-फार अनुभव होता त्यावरून त्याने सर्व तऱ्हेच्या ज्योतिष्याबाबत एक बधून ठेवले होते. कुडमुड्या असो वा राज असो, सगळे ज्योतिषी हे स्पष्ट व ठामपणे बोलणारे असतात. तोंडातल्या तोंडात वा तोतरत बोलणारा ज्योतिषी कधी कोणी पाहिला आहे काय? कदाचित हा व्यवसायाचा परिणाम असेल.

पण ह्या ज्योतिषीबुवानी वर्तवलेल्या ह्या भाकितान श्याम इतका काही हबकून गेला होता की, ज्योतिषीवर्गाचा कोणताही गुण appreciate करण्याच्या मूडमध्ये तो नव्हता. एक तर ज्योतिष्याकडे जायचं म्हणजे माणूस नव्हस झालेला असतो. जसा डॉक्टरकडे जाण्याचे वेळी माणूस झालेला असतो तसा. त्यातून ह्याबाबतीत अशिक्षित व मागास माणसाच बरे असते. त्याना ज्योतिष्याकडे जायला संकोच वा लाज वाटत नाही. जसे मनात आले व खिशात पैसे असले की, त्याना रस्त्यावर दाढी करायला संकोच वाटत नाही तसे. मनापुढे काही प्रश्न असला व पैसे असले की, त्याना रस्त्यावरच्या ज्योतिष्याकडे पण जायला संकोच वाटत नाही.

पंचाईत होते ती श्यामसारख्या सुशिक्षित माणसाची. खरे म्हणजे वाईट चालीच्या म्हणून गोष्टीची समाजात जी काय scheduled list आहे त्यात ज्योतिषाला हात वा कुंडली दाखवणे ही काही गोष्ट नाही आहे. तरी पण सुशिक्षित माणूस लाजतो व आपल्या भविष्यावर विश्वास आहे वा आपण ज्योतिष्याकडे जातो हे प्राजळपणे कबूल करायला कचरतो.

श्यामच्या ओळखीचे एक कोणी दामले वा गोखले नावाचे गृहस्थ होते. नावाप्रमाणेच ते गोरे, घारे व भुरे होते व नावाप्रमाणेच बुद्धिवादी होते. त्याना लिहिण्याची खूप हौस होती. बुद्धिवादी व लिहिण्याची हौस असूनसुद्धा त्यांच्या हातून म्हणावे तसे लिखाण होत नसे. कारण ह्या फक्त दोन गुणांवर चांगली साहित्य-निर्मिती थोडीच होत असते? मग बुद्धिवानाना व लिहिण्याची हौस असणाऱ्या लोकाना जो खुले-आम रस्ता असतो तोच त्यानी अवलंबला. थोडक्यात म्हणजे ते उत्तम प्रतीचे टीकाकार झाले.

आता टीकाकार झाले म्हणजे भोळ्याभाबड्या विश्वासावर, भावनामुळे येणाऱ्या मनाच्या कोमलतेवर त्याचा विश्वास नव्हता मग ज्योतिषशास्त्र-कुंडली वगैरेवर कसा असावा? ह्या सगळ्यामुळे श्यामला त्यांच्याबद्दल खूप आदर वाटत असे.

ह्या गोखले वा दामले ह्यांच्याकडे श्याम एक दिवस संध्याकाळचा गेला होता. बघतो तो काय? ते एका ज्योतिष्याला कुंडली दाखवत होते. श्यामला पाहताच त्यांचा चेहरा पडला; पण जास्त वेळ पडेल चेहरा ठेवील तो मराठी टीकाकार कसला? चेहऱ्यावर उसना आनंद व उत्साह दाखवून ते म्हणाले, 'या, या श्यामराव, अगदी योग्य वेळी आलात. मी नेहमी म्हणतो व मला वाटते मी कुठे तरी लिहिलंय की, ज्योतिष हे काही शास्त्र नाही. तर ते म्हणत होते की, ते शास्त्र आहे. मग मी त्याना म्हटले की, तसे आहे तर बघा माझी पत्रिका व सांगा चार-पाच वेळा विलायतला जाण्याचा प्रसंग येऊनसुद्धा मी अजून विलायतला जाणे का झाले नाही ते? माझा काही विश्वास नाही आहे हो फक्त आपली शास्त्रीय तपासणी.'

श्यामला ह्यावर काय बोलावे ते सुचेना म्हणून तो 'तुम्ही गडबडीत आहात तर परत केव्हा तरी येईन' म्हणत त्यांच्या घराबाहेर पडला. दामले वा गोखले आपण विलायतला कधी जाणार ह्याची ज्योतिषशास्त्रीय चिकित्सा करण्यात इतके गुंगले होते की, त्यानी श्यामला थांबण्याचा जास्त आग्रहच केला नाही.

पण हा अभ्यास दामले वा गोखले यांना खूप फायद्याचा पडला असे काही दिवसांनी दिसले. कारण सात-आठ महिन्यातच ते अमेरिकेला गेले. पण त्यानी ज्योतिषीबुवाबरोबर पुलंसारखे विनोदी पुस्तक लिहिले जाईल की नाही ह्याची शास्त्रीय चर्चा न केल्यामुळे त्यांचे हातून तसे काही पुस्तक लिहिले गेले नाही व सर्वसाधारण मराठी लेखकाला विलायत प्रवासानंतर पुलसारखे एक तरी विनोदी प्रवासवर्णन लिहिण्याची ambition असते ती असफल राहिल्यामुळे त्यांचा विलायतसफरीचा आनंद थोडा मारला गेला. असो. पण त्या नंतरच्या गोष्टी.

ज्योतिषी ज्या वेळी पितृसुख नाही वा मातृसुख नाही म्हणून सांगतात त्या वेळी त्याचा अर्थ वडील वा आई जास्त दिवस जगणार नाहीत असा घेतला जातो. त्यामुळे तुमच्या नशिबी पत्नीसुख नाही म्हटल्यावर श्याम हबकून जाणे सहाजिकच होते.

'काय म्हणताय काय ज्योतिषीबुवा? आमच्या लग्नाला जेमतेम दोन-अडीच वर्षे झाली आहेत. आमची अंजू एक-सव्वा वर्षाची आहे आणि तुम्ही म्हणता माझ्या नशिबी पत्नीसुख नाही म्हणून?' आता श्याम नुसताच हबकून गेला नव्हता, तर हबकण्याने परिणामी चाचरत चाचरत बोलू लागला होता.

सर्वसामान्य माणसाच्या आयुष्यात काही ठराविक टप्पे असतात. ते वयाच्या ठराविक वेळी येत असतात. त्या वयानुसार व टप्प्यानुसार माणसाच्या पुढे चिंता व काळज्या असतात व त्या काळज्या व चिंता दूर करण्याचे माणूस योग्य ते प्रयत्न करत असतो.

श्यामची अंजू आता एक-सव्वा वर्षाची झाली होती व अशा वेळी श्याम ज्योतिष्याकडे आला होता. ह्या ज्योतिषाचे भविष्य अगदी तंतोतंत बरोबर निघते अशी त्यांची प्रसिद्धी होती. तेव्हा अशा वेळी श्याम अशा तंतोतंत

बरोबर भविष्य सांगणाऱ्या ज्योतिष्याकडे काय विचारणा करण्याकरता आला असणार ह्याचा होरा ज्यांची–ज्याची अंजू एक-सव्वा वर्षाची असताना जे कोणी ज्योतिष्याकडे गेले होते त्यांना लागेलच, पण अंजू आठ वर्षांची, राणी साडेपाच वर्षांची व धाकटी दीड वर्षाची असताना जे ज्योतिष्यांकडे वेळोवेळी गेले होते त्यांची आठवण त्याना चांगल्याच झटकनतेने यावी.

मुलगा-का मुलगी हा प्रश्न असाच. पहिली मुलगी झाल्यानंतर आयुष्याच्या एका टप्प्यात फार महत्त्वाचे रूप धारण करतो व त्याचे उत्तर ज्योतिष हे शास्त्र म्हणा, ज्योतिष हा आधळा विश्वास म्हणा त्याशिवाय कोणी देत नसतो म्हणून ही ज्योतिष्याकडे धाव !

अशीच एका ज्योतिष्याची मुलगा होणार का मुलगी, ह्याबद्दल अगदी तंतोतंत बरोबर भाकित करण्याबाबत फार प्रसिद्धी झाली. गावोगावाहून लोक यावयाचे व त्याची ख्याती वाढत जावयाची.

एक दिवस त्याचा एक जुना मित्र भेटला व म्हणाला, 'गड्या, मुलगा की मुलगी ह्याचे भाकित तू शंभर टक्के बरोबर सांगतोस असे तुझे सगळीकडे नाव झाले आहे तर त्याचं गुपित काय आहे ?'

'अरे कसले आले आहे गुपित?' तो ततोतंत ज्योतिषी म्हणाला, 'मी काय करतो, कोणीही माझ्याकडे आला की सागतो मुलगी होणार म्हणून.'

'पण त्यांनी प्रश्न कसा मिटणार मुलगी झाली तर ठीक आहे पण मुलगा झाला तर?' मित्र.

'तीच तर मजा व तंतोतंतपणा आहे. बघ मुलगी झाली तर म्हणतात, तो ज्योतिषी साला म्हणाला होताच मुलगी होणार म्हणून. शुभ बोल रे नाऱ्याच तो !'

'आणि मुलगा झाला तर ?' मित्राच्या डोक्यात काही अजून प्रकाश पडेना.

'अरे, मुलगा झाल्यावर सगळे इतके आनंदात असतात की काय भविष्य सागितलंय ते सगळे विसरून जातात. फक्त ज्यांना मुलगी होते ते मात्र माझ्या भविष्याप्रमाणे मुलगी झाली हे सागत फिरतात, व माझी तंतोतंत भविष्य सागणारा म्हणून प्रसिद्धी होते !'

खरं म्हणजे श्यामसुद्धा सुशिक्षित मराठी माणूस असल्यामुळे त्याचा ज्योतिष–शास्त्र, गंडे–दोरे, उपास–तापास, देव–देवता ह्यांवर विश्वास नव्हता. तो सर्व गोष्टी बुद्धिप्रामाण्यावर घासून–पुसून घेत असे.

पण जसजसे वय वाढत गेले, लग्न झाले, पहिली मुलगी झाली, तसेतसे जीवनात सर्व गोष्टी घासून–पुसून घेणे फार अवघड आहे हे त्याला जाणवले.

पूर्वी अशा घासून–पुसून न घेता येणाऱ्या गोष्टीच्या यादीत फक्त दोनच गोष्टी होत्या. त्या म्हणजे एक, मुलगा होणे व दुसरी कष्ट न करता भरपूर पैसा मिळणे. आता स्वातंत्र्यानंतर त्या यादीत आणखी एका गोष्टीची भर पडली आहे ही म्हणजे फॉरिनला जाणे; पण त्या फार पुढच्या गोष्टी !

आजू एक-दीड वर्षांची असताना भरपूर पैसा मिळणे वा विलायतला जाणे ह्या गोष्टी गौण वाटाव्या अशा 'स्थिती'त राधा व श्याम, मुख्यत: राधा होती व त्या संदर्भातच श्याम ज्योतिषाकडे आला होता आणि ज्योतिषीबुवा आपले म्हणत होते की तुम्हाला पत्नीसुख नाही म्हणून !

श्यामने काय म्हणता काय, असा प्रश्न ज्योतिष्यानाच उद्देशून विचारला होता खरा; पण बुवा त्याचे उत्तर न देता श्यामच्या कुंडलीतल्या घराघरातून कोणते ग्रह भाडेकरू म्हणून ठिय्या देऊन बसले आहेत व कोण भाडेकरू घर कधी सोडणार आहे ते बघण्यात गुंग झाले होते. काही ग्रह कोणत्याही परिस्थितीत आपले घर सोडत नाहीत, असे बुवांनी सांगितल्यावर आधुनिक घर न सोडणाऱ्या भाडेकरूंचे हे आद्य पुरुष असावेत असा श्यामचा कयास बाधावयाचा विचार होता; पण मघा म्हटल्याप्रमाणे 'पत्नीसुख' नाही, ह्या भाकितामुळे श्याम इतका हबकून गेला होता की त्याचे मन कोणतेही extra caricular activity करायला तयार नव्हते.

'म्हणजे माझ्या नशिबात आहे तरी काय ? पत्नीसुख नाही म्हणता; पण तशी राधाची प्रकृती तर उत्तम आहे हो !' श्याम अगदी हवालदिल होऊन म्हणाला.

श्यामचा असा हवालदिल स्वराने भरलेला प्रश्न ऐकताच ज्योतिषीबुवानी ग्रह–दशातून आपली मान वर केली व श्यामचा भेदरलेला चेहरा बघून आपण सांगितलेल्या भाकिताचा हा काय परिणाम झाला असे त्यांना वाटले.

'श्यामराव, असे काय हो करता ? नशिबातल्या गोष्टी टळणार का आहेत ?'

'पण अजुनी राधा जेमतेम वीस-एकवीस वर्षांची आहे हो ! अजुनी आमच्या संसाराला खरी सुरुवात झाली नाही आणि अर्ध्या संसारातून राधा उठून जाणार ?'

आता ज्योतिषबुवांचा common–sense चा जो कोणता ग्रह असेल तो स्व-ग्रही आला होता. आपण वर्तवलेल्या भविष्याचा श्यामने गंभीर, नको तेवढा गंभीर अर्थ घेतला आहे हे त्यांच्या लक्षात आले.

'नाही, नाही, श्यामराव तुमचा काही तरी गैरसमज झाला आहे. अहो पत्नीसुख नाही म्हणजे पत्नी गमावाल असे नाही. म्हणजे पत्नी राहील पण तिच्यापासून सुख मिळणार नाही.' ज्योतिषीबुवा म्हणाले, 'नसते एकेकाच्या नशिबात त्याला कोण काय करणार ?'

श्यामला आता रडावे की हसावे हे कळेना. भविष्य वाटले होते तेवढे गंभीर नाही म्हणून हसावे की पत्नी आहे पण तिच्यापासून सुख नाही म्हणून रडावे ? हसावे की रडावे ह्या अत्रे-पिक्चरच्या बोधचिन्हाप्रमाणे मनांशी प्रश्न करत श्याम जो मुख्य प्रश्न विचारावयाचा म्हणून ज्योतिष्याकडे आला होता तो न विचारताच परत घरी आला.

काही दिवसानी त्याला कळले की हे ज्योतिषीबुवा सगळ्यांनाच हेच 'पत्नीसुख' नाही, हे भविष्य सागत असतात. ह्या ज्योतिष्याचे भविष्य अगदी शंभर टक्के खरे निघते अशी त्यांना प्रसिद्धी मिळाली याबद्दल आश्चर्य वाटायला नकोच.

□


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

# देवाघरचा पाऊस

लेखक : रवींद्र पिंगे
आवृत्ती : दुसरी
किंमत : दहा रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे

## अवतीभवती : पृष्ठ ८ वरून

### अवाढव्य खर्च

संसदेचे कामकाज चालवणे ही अवाढव्य खर्चाची बाब असल्याने ते व्यवस्थितपणे चालवण्याची जबाबदारी संसद-सदस्यावर निश्चित-पणे आहे. संसदेचा एका मिनिटाचा खर्च आहे ८०० रु म्हणजे तासाभरासाठी ४८ हजार रुपये खर्ची पडतात ! लोकसभेच्या निवड-णुकीसाठी जो खर्च होतो त्याची रक्कम प्रत्येक सदस्यामागे एक ते पाच लाख रुपयापर्यंत आहे. निवडणूकमंडळ या निवडणुकांवर जो कोटयावधी रुपयांचा खर्च करते तो तर आहेच; पण पडेल उमेद-वारही अवाढव्य खर्च करून बसलेले असतात ! एवढया अवाढव्य खर्चानंतर निवडून आलेल्या सदस्यावर लोकसभेच्या कामकाजामध्ये भाग घेण्याबाबत काही जबाबदाऱ्या आहेत की नाहीत ? या प्रश्नाचे उत्तर निश्चितपणे होकारार्थी द्यावे लागत असले तरी आपल्या या जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या बाबतीत संसद-सदस्य उदासीन असतात असाच अनुभव येतो !

भारतीय प्रजासत्ताकाच्या रौप्यमहोत्सवप्रसंगी म्हणजे १९७५ साली लिहिलेल्या एका लेखात मरहूम छागला म्हणतात, "लोकसभेचे बहुसंख्य सदस्य लोकसभेच्या दैनंदिन कामकाजाबाबत उदासीन असतात. याबाबत तोड म्हणून छागलानी असे सुचवले होते की, अत्यंत महत्त्वाचे निर्णय आणि धोरणात्मक प्रश्न सोडले तर संसद-सदस्यावर मतदानाबाबत बंधने असू नयेत आणि अशा परि-स्थितीमध्ये सभागृहाने शासनाच्या विरोधात मत नोंदवले तर तो सरकारवर अविश्वास असे समजण्याचेही कारण नाही.' छागला यांच्या या मताची कदर झाली नाही. इतका प्रगत विचार आपल्या-कडेच काय, परंतु लोकशाही जेथे शतकानुशतके मुरलेली आहे तेथेही स्वीकारला जाणार नाही. उपस्थितीबाबतची परिस्थिती गंभीर आहे याची पंतप्रधानांसकट सर्वांनाच जाणीव आहे. गेल्या फेब्रुवारी-मध्ये स्वपक्षाच्या सदस्यांसमोर भाषण करताना इंदिराजींनी उप-स्थितीबाबत सदस्यांनी जागरूक राहिलेच पाहिजे आणि सदस्याची संसदेमधील उपस्थिती ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे, असे आग्रहाने सांगितले.

लोकसभेचे सभापती म्हणाले की, लोकाना भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांचे प्रतिबिंब लोकसभेच्या कामकाजात उमटले पाहिजे. प्रश्न असा आहे की तीनचतुर्थांशपेक्षा जास्त सदस्य जर अनुपस्थित रहात असतील तर लोकांना भेडसावणाऱ्या प्रश्नाचे हे प्रतिबिंब उमटणार कसे ? पक्षीय राजकारणामुळे विशिष्ट पक्षाच्या संसदेमधील संख्या-बळाला जास्त महत्त्व असल्याने व्यक्तिगत सदस्याला फारशी किंमत राहिलेली नाही. महत्त्वाच्या प्रश्नावर मतदान असेल तेव्हा कोकरे पकडून आणावीत अशा पद्धतीने आदेशाचा आसूड फटकावून उपस्थिती वाढवण्यात येते. तीन ओळीच्या या पक्षीय आदेशाची धारही आता पहिल्यासारखी तिखट राहिलेली नाही. या वर्षी मार्चच्या ९ तारखेला आयुर्विमा महामंडळाबाबतच्या सुधारित कायद्यावर मतदान झाले. उपस्थिती होती केवळ १६० ! त्याआधी एक आठ-वडा, ज्याचा बराच गाजावाजा झाला होता त्या, काळा पैसा बाहेर काढण्यासाठी सादर करण्यात येणाऱ्या नामविरहित कर्जरोख्याबाबत मतदान झाले. उपस्थिती होती १५० च्या जवळपास ! ज्या सभा-गृहाची सदस्यसंख्या ५२१ आहे, अशा गृहामधील ही उपस्थिती पाहिली म्हणजे संसदसदस्य लोकसभेच्या कामकाजाबाबत किती उदासीन आहेत याची झलक पहावयास मिळते. या दोन्ही प्रसंगी पक्षीय आदेश काढण्यात आले होते हे लक्षात घेतले म्हणजे वर म्हटल्याप्रमाणे या आदेशाची धारही आता बोथट झाली आहे असेच अनुभवास येते.

सरकारी पक्षाचे सदस्य सोडा पण मंत्रीपदे भूषवणाऱ्या मान्यवर व्यक्ती लोकसभेमधील उपस्थितीबाबत कितिशा जागरूक असतात ? भारतीय लोकसभेच्या कामकाजाचे २५ वर्षे निरीक्षण करणाऱ्या डॉ. एम्. रुथनास्वामी यांच्या मते प्रश्नोत्तराच्या तासाला ज्यांना उत्तरे द्यावयाची असतात ते मंत्रिगण उपस्थित असतात. इतरवेळी अनुपस्थित मंत्र्यांचे प्रमाण जास्त असते. चर्चेच्या वेळीही फक्त संबंधित खात्याचे मंत्रीच उपस्थित असतात. सर्वसाधारण संसद सदस्यांपेक्षा मंत्र्यांवर लोकसभेमधील उपस्थितीबाबत जास्त जबाबदारी असूनही त्याचे परिपालन अपेक्षेप्रमाणे होताना दिसत नाही.

या लेखाच्या प्रारंभी दूरदर्शनवरील ज्या चर्चेचा उल्लेख केला आहे त्या चर्चेमध्ये सदस्यांच्या गुणवत्तेबाबत आणि पात्रतेबाबत थोडी-फार चर्चा झाली. तथापी संसदसदस्यत्व प्राप्त व्हावे म्हणून इच्छुक असलेल्या व्यक्तींच्या बाबतीत पात्रतेबाबतचे मतप्रदर्शन मात्र फारसे झाले नाही. पात्रतेचा हा प्रश्न संसदीय लोकशाहीचा पाया घालणाऱ्यांच्या मनात आला होता; परंतु त्याबाबत सोयिस्कर पळवाट काढण्यात आली. घटनेच्या ८४ व्या कलमाप्रमाणे लोकसभेचे सदस्यत्व मिळावे यासाठी इच्छुक असलेल्या व्यक्तीचे नागरिकत्व भारतीय असावे व अशा व्यक्तीचे वय २५ असावे आणि राज्यसभेच्या बाबतीत ही वयोमर्यादा ३० असावी असे म्हटले आहे. पात्रता आणि अन्य स्वरूपाची गुणवत्ता याबाबत मात्र काहीही अटी नाहीत. याबाबतची सारी जबाबदारी लोकसभेवर टाकण्यात आली आहे. लोकसभेने याबाबत काही कायदा केला तरच सुधारणा होऊ शकेल; परंतु आजवर लोकसभेने याबाबत काहीही हालचाल केलेली नाही; याच संदर्भात १८ मे १९४९ रोजी कै. बाबासाहेब आंबेडकर यांनी असे मत प्रदर्शन केले की– "संसदसदस्य होऊ इच्छिणारी व्यक्ती भारतीय नागरिक असावी. नोंदलेली मतदार असावी. त्याचप्रमाणे या व्यक्तीच्या पात्रतेबाबतही काही किमान अपेक्षा आहेतच. संसदसदस्य म्हणून आपली जबाबदारी पार पाडताना अशा व्यक्तीला घडामोडींची, तसेच देशामधील राजकीय परिस्थितीची काही किमान माहिती असणे आवश्यक आहे आणि याबाबतचे संकेत आपण मानले तर योग्य उमेदवार मिळून संसदेचे कामकाज व्यवस्थित चालू शकेल." असे मतप्रदर्शन केले तरी त्याबाबत निश्चित स्वरूपाच्या अटी घालण्यास अनेक सदस्यानी विरोध केला. याबाबत ज्या वेळी मतदान झाले त्या वेळी डॉ. राजेंद्रप्रसाद म्हणाले, "एखाद्याची न्यायमूर्ती म्हणून नेमणूक करायची असेल तर आपण उच्च शैक्षणिक पात्रता आणि प्रदीर्घ अनुभव असल्याची खात्री करून घेऊनच नेमणुका करतो. कायद्याचा अर्थ लावताना न्यायमूर्तींना जी मंडळी मदत करतात. त्याची शैक्षणिक पात्रता व गुणवत्ता याबाबत भरपूर काळजी घेतलेली असते; परंतु येथे उपस्थित असलेल्या अनेक सदस्याचे असे

मत दिसते की, कायदा बनवण्याची जबाबदारी ज्यांच्यावर टाकण्यात येणार आहे त्यांच्या शैक्षणिक पात्रतेबाबत आणि गुणवत्तेबाबत मात्र कोणतेही बंधन नसावे आणि क्षणभर आपण टोकाची परिस्थिती मान्य केली तर अशी कोणतीही गुणवत्ता नसलेल्या बहुसंख्य मंडळीची संसदेवर निवड झाली तर अशा मंडळींनी केलेल्या कायद्यांचा अर्थ लावण्याची जबाबदारी शहाण्यासुरत्या न्यायमूर्तींना उचलावी लागेल." त्यानंतरही चर्चा झाली. तथापि गुणवत्तेबाबतचे कोणतेही निकष लावण्यात आले नाहीत. १९४९ मधील तीच परिस्थिती आजही कायम आहे. कारण लोकसभेवर याबाबतची जबाबदारी असली तरी कोणत्याही लोकसभेने हा त्रासदायक ठरणारा प्रश्न पुन्हा कधीच उकरून काढला नाही.

गुणवत्तेबाबतचा प्रश्न बाजूला ठेवला तरी कामकाजामध्ये भाग घेण्याचा प्रामाणिकपणाही पहावयास मिळत नाही, ही खेदाची बाब आहे. लोकसभेचे कामकाज चालू असताना विविध प्रश्नावरील शासकीय भूमिकेचा ऊहापोह करणारी असंख्य परिपत्रके सदस्यांमध्ये वाटण्यात येतात. किती सदस्य या परिपत्रकाचा अभ्यास करतात? हे एक सोडा, पण स्वतःच विचारलेल्या प्रश्नांचा पाठपुरावा करून आणि उपप्रश्नांची खैरात करून किती सदस्य आपल्या मनात निर्माण झालेल्या शंकाचे निरसन करून घेतात? लोकसभेमध्ये एखाद्या विषयावर भाषण करण्यापूर्वी पूर्वतयारीची नितांत आवश्यकता असते; परंतु फारच थोडे सदस्य याबाबत जागरूक असलेले दिसतात. त्यामुळे या भाषणांना जे वजन यायला पाहिजे ते येऊ शकत नाही.

दूरदर्शनवरील चर्चेमध्ये ज्या मान्यवरांनी भाग घेतला त्यांनी सभासदांच्या वर्तनाचीही थोडी-फार दखल घेतली. याबाबत चर्चा करताना दोन्ही सभागृहात अलीकडील काळात जो गोंधळ पहावयास मिळतो त्याचा संदर्भ या मंडळींच्या बोलण्यात जरूर डोकावला. या गोंधळाला अन्य काय कारणे असतील ती असोत, परंतु महत्त्वाचे प्रश्न जितक्या प्रकर्षाने लोकसभेसमोर यायला पाहिजेत तितक्या प्रकर्षाने ते येऊ शकत नाहीत म्हणून विरोधी पक्षांना निराशा आली आहे. तसेच आपले संख्याबळ फारच तोकडे पडल्यामुळे जी एक विचित्र नकारात्मक भावना तयार झाली आहे त्यामुळे विरोधी पक्षामधील मंडळी आरडा-ओरडा आणि गोंधळ करून लक्ष वेधून घेऊ इच्छितात, असेही दिसते. याउलट सर्व आलबेल आहे व आपल्यामागे प्रचंड सामर्थ्य असल्याचे राज्यकर्त्या पक्षाचे मत आहे, त्यामुळे त्या पक्षामधील तरुण मंडळी विरोधी पक्षाचे काहीही ऐकून घेण्यासच तयार नसतात. दोन्ही बाजू अशा तऱ्हेने पेटल्यामुळे वाद-विवादापेक्षा आरडा-ओरडा आणि गोंधळ यामध्येच संसदेचे दिवसच्या दिवस खर्ची पडतात आणि संसदीय लोकशाहीचा हा राजदरबार कोटयवधी रुपयाची उधळण करत असाच चालू राहतो.

## □ बसू सरकार विरुद्ध निवडणूक आयोग

प. बंगाल विधानसभेच्या रिकाम्या जागांच्या पोटनिवडणुकावरून प. बंगाल सरकार व निवडणूक आयोग यांच्यामध्ये जोरदार चकमक उडाली असून मुख्य निवडणूक आयुक्त शकधर हे इंदिरा कॉंग्रेसचे हस्तक आहेत, असा उघड आरोप प. बंगालचे मुख्यमंत्री ज्योती बसू यांनी केला आहे. तसेच या संदर्भात राज्यशासन न्यायालयाचा सल्ला घेणार आहे, असेही त्यांनी अलीकडेच एका मुलाखतीमध्ये सांगितले. राज्याच्या निवडणूक आयुक्तांनी राज्यामधील कायदा व सुव्यवस्था यांची परिस्थिती समाधानकारक असल्याचे, इतकेच नव्हे तर ती अन्य काही राज्याहून चागली असल्याचे कळवले असले तरीही मुख्य निवडणूक आयुक्त निवडणुका घेण्याबाबत चालढकलीचे धोरण स्वीकारतात, याबाबत ज्योती बसू यांनी नाराजी व्यक्त केली आहे. राज्यसरकारचा सल्ला न घेता निवडणूक आयोग आपल्या मताप्रमाणे पोटनिवडणुकांचा कार्यक्रम पुढे ढकलत आहे याबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली.

प. बंगालच्या मुख्यमंत्र्यांच्या संतापाची दखल निवडणूक आयोगाने घेतल्याचे दिसते. कारण या मुलाखतीपाठोपाठ श्री. शकधर यांची मुलाखतही प्रसिद्ध झाली आहे. राज्य निवडणूक आयुक्तांनी आपल्याला लिहिलेल्या पत्राचा तपशील जाहीर करून राज्यसरकारने संकेत मोडला, असा आरोप शकधर यांनी केला आहे. ते म्हणाले- विविध राज्यांमधील विधानसभेच्या एकूण ३९ जागा खाली असून त्यापैकी २८ जागांसाठी येत्या जूनमध्ये निवडणुका होतील. या २८ जागांमध्ये प. बंगालमधील ८ जागाचा समावेश आहे आठ राज्यांत मिळून लोकसभेच्या एकूण २३ जागा खाली आहेत त्यामध्ये आसमच्या १२ जागा आहेत. त्या तूर्तास तशाच रिकाम्या रहातील. अन्य जागांपैकी ८ जागांच्या निवडणुका येत्या जूनच्या पंधरवड्यामध्ये होतील.

### पोटनिवडणुका ही संधी

लोकमताचे वारे कोणत्या दिशेने वाहात आहे याची झलक पोटनिवडणुकाच्या निकालाद्वारे पहावयास मिळत असल्याने या निवडणुकांवर विरोधी पक्षाचेही लक्ष आहे. प. बंगाल विधानसभेच्या पोटनिवडणुकांना विशेष अर्थ आहे. तेथील विद्यमान सरकारविरुद्ध बरीच ओरड होते. त्या विधानसभेची उरलेली मुदतही जेमतेम एक वर्षाची आहे. स्वाभाविकपणे जनमानसामध्ये आपले नेमके स्थान काय आहे हे चाचपून पहावयास ज्योती बसू उत्सुक आहेत आणि म्हणून विधानसभा पोटनिवडणुकांपैकी प. बंगाल विधानसभेच्या पोटनिवडणुकाना विशेष अर्थ आहे. या निवडणुका विद्यमान सरकारमधील दोस्तपक्षांनी-अथवा डाव्या कम्युनिस्ट पक्षाने जिंकल्या तर वर्षभरात येणाऱ्या सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीला हे पक्ष जास्त आत्मविश्वासाने सामोरे जातील. या विरुद्ध विरोधी पक्ष, विशेषत: इंदिरा कॉंग्रेस या जागा डाव्या कम्युनिस्टांना अथवा त्यांच्या मित्रपक्षांना मिळू नयेत यासाठी आटोकाट प्रयत्न करील. या प्रयत्नात जर यश आले तर लोकांचा या सरकारवर विश्वास नाही, असे कारण पुढे करून विधानसभा विसर्जित करण्यास केंद्र सरकार मागेपुढे पहाणार नाही आणि निकाल प्रतिकूल लागला तर निवडणुका खुल्या वातावरणात झाल्या नाहीत असा नेहमीचा आरोप करून डाव्या कम्युनिस्टाच्या नावाने बोटे मोडली जातील. □

फिनिक्स निवड

# Memoirs of Richard Nixon

( pages 1090 )

हा एक किसिंजर ( White House years) सारखाच ठोकळा आहे. उचलायला अती जड. झोपून न वाचण्यासारखा. जेम्स हॅडले चेस आमच्या ग्रंथालयाच्या स्थापनेपासून (१९५९ दसरा) आम्ही घेत असू. त्या वेळेला एक चोखंदळ वाचक श्री. अभ्यंकर आमच्या ग्रंथालयात येत असत. हा सद्गृहस्थ आम्ही चेसची पुस्तके घ्यावी अशी शिफारस त्या वेळेला करीत असे. तेव्हा चेसचं नांवही फारस कुणाला माहीत नव्हतं. ती जुन्या काळची एक वेळ अशी होती की, चेसचा पुस्तक विकत घेण म्हणजे एखाद्या अगदी नवीन कंपनीचे शेअर्स विकत घेण्यासारख धाडस होत ! पण हा गृहस्थ भारी कलंदर ! बिलंदरसुद्धा ! इतका की शिक येण्याच्या आधीच्या काळाला तो 'Seven minutes' (का सेकंडस ?) म्हणत असे. यात सव्हन मिनिटस मीच घुसडले आहे. पण त्याच्या म्हणण्याचा आशय तोच होता. हे फक्त आर्यविंग वॉलेसच्या वाचकानाच कळेल. आता आम्ही विचार केला की असल्या नमुनदार माणसावर का विश्वास ठेवू नये ? त्या वेळी चेसची बाजारात पुस्तके जेवढी होती तेवढी सर्व एका दमात घेऊन टाकली. आणि शेअर्स अॅप्रीशिएट झाले. काही वर्षांनी लोक बोलायला लागले, 'फिनिक्सकडे चेसची सर्वच्या सर्व पुस्तके आहेत बरं का ! आपण तर बाबा आता फिनिक्सचे सभासद होणार !'

चेस आठवायच कारण निक्सन क्रूक होता; पण आपल्या पुस्तकात क्रूकसना अशी काही ट्रीटमेंट देत असं की आपल्याला त्या गुन्हेगाराविषयी सहानुभूती वाटत रहावी.चेसच्या पुस्तकात शेवटीशेवटी तर आपल्याला असे वाटते की आता क्रूकचा जय झाला तर बरे होईल ! पण चेस त्याला हमखास शिक्षा करतो म्हणूनच आपली सहानुभूती शिगेला पोहोचते. वाचकहो ! चेसच्या पुस्तकाचा अपील हा इथे दडलेला आहे !

या निक्सन क्रूकनेही त्याच्या आठवणी अशा लिहिल्या आहेत की, त्याच्याविषयी आपल्याला सहानुभूती निर्माण होत जाते आणि ती शिगेला पोचते तेव्हा तर त्या सहानुभूतीचे रूपांतर प्रेमात होते की काय, अशी धास्ती वाटायला लागते; पण सुदैवाने तोपर्यंत आपण पुस्तक संपवतो व एक दीर्घ सुस्कारा टाकून पुस्तक खाली ठेवायला जातो. पण त्याच्या वजनामुळे ते जवळजवळ आदळतेच ! जेम्स हॅडले चेस अजून जिवंत आहे म्हणतात. फक्त थोडयाच वाचकानी सांगितले की, तो मेला आहे. त्यानी जर वॉटरगेटवर कादंबरी लिहिली तर Memoirs of Nixon-RN सारखी तीस-पस्तीस टक्के अवश्य होईल. (साईजमध्ये सुद्धा ! )

वॉटरगेटसंबंधी ट्रकच्या ट्रक्स कागद भरले होते. त्या विषयावर डझनानी पुस्तके निघत होती. नियतकालिकात रकानेच्या रकाने भरत होते. वॉटरगेट वाचून डोळ्यातून वॉटर निघायची पाळी आली होती ! विषय संपृक्त झाला होता ! त्या विषयावर आणखी काही वाचवेनासे झाले होते, म्हणून पुढे पुढे तो विषय वाचण्याचे बंद केले. मध्ये एक डोळस विश्रांती ( decent interval) झाली. मन ताजे झाले आणि बाजारात निक्सनचे पुस्तक आले. आम्हाला ते हार्वर्डच्या प्रा. हनुवटीढ्य किंजिरच्या पुस्तकापेक्षा आवडले. आपणही हे अवश्य वाचावे. कुठलही पान उघडून केव्हाही !

I hereby resign the office of president of the United States.

९ ऑगस्ट १९७४. अमेरिकेचे अध्यक्ष रिचर्ड निक्सन यानी सकाळी या एका ओळीच्या राजीनाम्यावर सही केली आणि त्याची २०२६ दिवसाची अध्यक्षीय कारकीर्द समाप्त झाली. अमेरिकेचा हा सदतिसावा अध्यक्ष राजीनामा देणारा पहिला अध्यक्ष ठरला !

वॉटरगेट-प्रकरण चालू झालं आणि पाहता पाहता अमेरिकेच्या अध्यक्षपदी असलेला निक्सन त्यात गुंतला गेला. अमेरिकन इतिहासात १०६ वर्षांत Impeachment करावी अशी ज्या अध्यक्षांच्याबाबत शिफारस करण्यात आली असा हा पहिला अध्यक्ष. वॉटरगेट केस चालू होती आणि २३ जूनला टेप्स न्यायालयात दाखल करायच्या होत्या. त्याअगोदर Impeachment करायची अशी शिफारस तीन कारणासाठी House Judiciary Committee ने केली होती. United States Vs. Nixon या केसचा निकाल अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने निक्सनच्या विरुद्ध दिला होता. या निकालाला ऐतिहासिक महत्त्व आहे, असं सर्वत्र मानलं जात होतं. या निकालानं अमेरिकन राष्ट्राचा विजय झाला असं एका टीकाकारानं या निकालाबाबत म्हटलं हातं; पण निक्सनला मात्र असं वाटत होतं की, अमेरिकन राष्ट्र तर वाचलं नाहीच परंतु अमेरिकेचं अध्यक्षपद ही संस्थाच या वादात बळी पडली. या साऱ्या परिस्थितीत निक्सनची प्रतिक्रिया मात्र आक्रमक होती. सहजासहजी हार मानण्याची त्याची वृत्ती नव्हती. ३० जुलै १९७४ च्या रात्री निक्सन झोपेशिवाय तळमळत होता. जुलै ३१ च्या पहाटे ३·५० वाजता तो उठून बसला आणि राजीनामा द्यावा की न द्यावा याच्या दोन्ही बाजू त्याने कागदावर मांडल्या. पर्याय तीनच होते– राजीनामा देणे, इंपीचमेंटवर मतदान होईपर्यंत थांबणे आणि इंपीचमेंट झालीच तर राजीनामा देणे किंवा त्यानंतरही सिनेटमध्ये लढत रहाणे ! जवळजवळ तीन तास निक्सनने सगळे मुद्दे कागदावर मांडले. अगदी कडेच्या क्षणापर्यंत लढत रहायचे ही त्याची भावना होती. या सगळ्या कागदावर शेवटी त्याने लिहिले 'End career as fighter' पण २३ जूनच्या टेपबद्दल त्याच्या तीन सहकाऱ्यांची मतं लक्षात घेता निक्सनला राजीनामा देण्याखेरीज दुसरा मार्गच राहिला नाही आणि १ ऑगस्ट १९७४ ला निक्सनने राजीनाम्याचा निर्णय घेतला.

निक्सनचं व्यक्तिमत्त्व फारसं आदर्श नव्हतच मुळी. राजीनामा देतानाही आपलं काही तरी चुकलं ही भावना नाही. उलट आपण शेवटपर्यंत भांडू शकत नाही याचं वाईटच वाटतं. तुरुंगात जावं लागलं तरी त्याची पर्वा नाही. उलट तुरुंगाच्या भिंतीआड जगातलं उत्कृष्ट वाङ्मय अनेकदा निर्माण होतं हे सांगून निक्सन लेनिन आणि गांधीचं

उदाहरणही देतो. भविष्य का अंत ? इतिहास निक्सनला अमेरिकेचा एक श्रेष्ठ अध्यक्ष मानेल हे सांगणाऱ्या किसिंजरला ' ते कोण इतिहास लिहील त्याच्यावर अवलंबून आहे ' हे उत्तर त्या परिस्थितीतही निक्सन देऊ शकतो ! निक्सनकडे लिंकन, रूझवेल्ट याचा आदर्शवाद नव्हता. आयसेनहॉवर भोवती होते तसे पराक्रमाचे वलयही नव्हते. केनेडीचं प्रसन्न व्यक्तिमत्त्व नव्हतं. तरीही पक्का व्यवहारवाद होता, हुषारी होती, इच्छित साध्य करून घेण्यासाठी जे जे करणं आवश्यक आहे ते ते करण्याची जिद्द होती. प्रामाणिकपणाचं, सचोटीचं फारसं स्तोम त्यानं कधी माजवलं नाही; पण राजीनामा देतानाही आपल्या मनाविरुद्धची गोष्ट आपण करत आहो आणि ती राष्ट्रहिताच्या दृष्टीनं आवश्यक आहे हा विचार होता. तसं पाहिलं तर अगदी जवळच्या माणसांनाही निक्सन खरोखरी कसा होता ते कळलं नाही. आपल्या भावना त्यांनी फारशा कधीच दाखवून दिल्या नाहीत.

अशा या निक्सननं आपल्या या आठवणी लिहिल्या आहेत. चांगला १०९० पानांचा जाडजूड ग्रंथ–याच परीक्षण दोन-चार पानात करणं हे तसं कठीणच ! या ग्रंथाची भाषा ओघवती, प्रासादिक, अलंकारिक वगैरे काही नाही. साधं सरळ निवेदन आहे हे. निक्सनचे सर्व दोष जमेला धरूनही या निवेदनात एक प्रामाणिकपणा जाणवतो. त्यानं सांगितलेल्या गोष्टी खऱ्या किती, त्यात सत्य असलं तरी ते सपूर्ण सत्य आहे का ? हा भाग निराळा. यात क्षुद्र आणि महत्त्वाच्या गोष्टींची सरमिसळ आहे. स्वतःबद्दलचा अहंकार आहे. स्वत.चं समर्थन आहे.

यातला आम्हाला जो आवडला तो भाग म्हणजे निक्सनचे शेवटच्या दिवसाचे वर्णन. मानहानी, अपमान ! शेवटपर्यंत मनातली लढण्याची इच्छा असून परिस्थितीच्या दबावामुळं येणारी अगतिकता ! अमेरिकेच्या अध्यक्षपदासारख्या मोठ्या स्थानावरनं खाली उतरणं यातच असलेली सगळी मनोव्यथा, त्या वेळचे विचार, घरच्या माणसांच्या प्रतिक्रिया सगळंसगळं भावना हेलावणारं आहे. व्हाइटहाउसमधून निघालेलं हेलीकॉप्टर वर जात असता निक्सन लिहितो, ' कुणीही काही बोललं नाही, आता अश्रूही आटले होते. मी माझं डोकं मागं टेकलं आणि डोळे मिटले. पॅट म्हणत होती, हे सारं किती दुर्दैवी–किती दुर्दैवी ! ' निक्सन दोषी असेल पण व्यक्ती या दृष्टीनं या साऱ्या घटनेत सत्य आहे, वेदना आहे, कारुण्य आहे, नियतीच्या प्रभावाची प्रचीती आहे आणि ती थोडयाफार प्रमाणात वाचकालाही जाणवते.

–ॲड. बी. आर्. रानडे
–जे. एन्. पोंडा

चित्रपट

# तोतया आमदार – फक्त बाटली नवीन आहे !

अनंत माने–व्यावसायिक मराठी चित्रपट सृष्टीतलं (खरं तर प्रायोगिक मराठी चित्रपट आहे कुठं ?) एक हुकमी नाव. ' प्रभात ' काळापासून चित्रपटात वावरणाऱ्या मान्यांनी आतापर्यंत पन्नासच्या वर मराठी चित्रपट निर्माण केले आहेत. ' सांगत्ये ऐका ' पासून यशस्वितेची किल्ली सापडलेल्या या दिग्दर्शकानं नुकतेच लागलेले ' लक्ष्मी ' आणि ' सुशीला ' हे चित्रपट यशस्वी करून मराठी प्रेक्षकांवरील आपली पकड सिद्ध केली आहे.

मान्यानी ' ओवाळणी ', ' मानिनी 'सारखे किंवा अलीकडच्या काळात ' हळदी-कुंकू ' सारखे उंबऱ्याआतल्या गुंतागुंतीवर आधारित चित्रपट काढले असले तरी त्याचा खरा पिंड ग्रामीण ' परिसरातच रेंगाळणारा आहे. ' एक गाव बारा भानगडी 'सारखा मराठीत यशस्वितेचा उच्चांक गाठणारा चित्रपट सादर करून मान्यांनी इथल्या डफ आणि तुणतुण्याची साथ मिळालेल्या गावच्या पाटील-विरोधी कथेला राजकारणाची पार्श्वभूमी दिली. गाधीवादाच्या नावाखाली चाललेला गाधी-तत्त्वज्ञानाचा वध त्यांनी चित्रपटातून स्पष्ट दाखविला पाटलाचा रगेल आणि रंगेल मस्तवालपणा सादर करताना त्यानी खेडयातील विकासाला खीळ घालणाऱ्या पाटलाच्या राजकीय भानगडीचे वाभाडेही चित्रपटाद्वारे वेशीवर टांगले. ' एक गाव '-मधला झेलेअण्णा निळू फुल्यांनी अजरामर केला खरा; पण निळू फुल्यांना ते वरदान ठरण्याऐवजी तोच त्याचा साचा बनविला गेला. निळू फुल्याच्याबाबतीत जे घडल तेच अनंत मान्याच्याबाबतीतही घडलं आणि मराठी चित्रपटही या तमाशा कम् ग्रामीण कथेत कायमचा अडकला.

सध्या तरी ९० टक्के मराठी चित्रपट या कथेपाशीच स्थिरावलेला दिसतो दर पाच वर्षांनी ट्रेंड बदलणाऱ्या हिंदी चित्रपटाला आव्हान देण्याच सामर्थ्य नसलेल्या मराठी चित्रपटानं या ग्रामीण ढाच्याची सातत्यानं नक्कल करूनच पुणे-मुबई शहराबाहेर असलेल्या ग्रामीण महाराष्ट्रातील प्रेक्षकाला पकडून ठेवल आहे

हृया प्रेक्षकाला पकडून ठेवण्याची किमया स्वातंत्र्य मिळालं त्याच वर्षी प्रदर्शित झालेल्या ' जय मल्हार ' या चित्रपटानं करून दाखविली जय मल्हारनं ट्रेंड निर्माण केला. आमचे चित्रनिर्माते, दिग्दर्शक आणि प्रेक्षकही याच ठिकाणी थाबले आहेत. भले मग गेल्या तीस वर्षांत मराठी चित्रपट रंगीत झाला असो अथवा त्याला तांत्रिक सफाई आली असो, या चित्रपटाचा आशय मात्र अजूनही पाटलाच्या वाड्यातच पान खात बसला आहे.

' जय मल्हार 'च्या यशाने मराठी चित्रपटातल्या ग्रामीण वास्तवतेवर मर्यादा पडल्या. सत्ता आणि पैशाचा माज असलेल्या मुजोराच्या जमीन-जुमला, पैसा-अडका, बाई किंवा वाड-वडिलांची प्रतिष्ठा यावरून चाललेल्या तंटेबखेड्यानीच या चित्रपटांचा आशय व्यापला. पैशाच्या गुतवणुकीला ' हमी ' मिळण्यासाठी निर्मात्यांनी करमणुकीसाठी तमाशाची जोड दिली. तमाशाची अट घातल्यामुळं चित्रपट चालण्याची हमी मिळाली. यातून जे व्हायचं तेच झालं. डफ तुणतुण्यान इथले चित्रपट संगीत लावणीच्या अंगानं बहरले; पण चित्रपट-माध्यमाचा मात्र ' सेल्युलाइड तमाशा '

झाला. कॅमेऱ्यानं चित्रित केलेला 'कंपनी नाटकाचा' तो एक भाग ठरला. मराठी चित्रपट आहे तिथंच राहिला. अगदी अलीकडचा 'सामना' हा चित्रपट म्हणजे याच साच्याला नव्या स्वरूपात राजकारणाची दिलेली फोडणी. म्हणून तो तात्पुरता बरा वाटला; परंतु चित्रपटावरील 'कंपनी नाटकाचा' दोषमूलक असणारा परिणाम 'सामन्या'तही अटळपणे दिसला.

१९४७ साली प्रदर्शित झालेल्या 'जय मल्हार'चं कथासूत्र होतं एका गावचा नराधम पाटील (दुष्ट प्रवृत्तीची व्यक्ती) आणि विरोधात उभा राहिलेला कल्लू (सुष्ट प्रवृत्तीचे प्रतिनिधित्व करणारा धष्ट-पुष्ट माणूस). या दोघाना एकमेकांविरुद्ध पेटायला लावणारी 'बाई' तमाशातली. बरं, या व्यक्तीभोवती गुंफलेल्या आणि बेतलेल्या चित्रपटाचा शेवटही ठरलेलाच. शेवटी सुष्टांचा दुष्टांवर विजय आणि सारं काही शात शात !

तेव्हा हाच १९४७ साली प्रदर्शित झालेला 'जय मल्हार' आज १९८१ साली नव्या आधुनिक पेहरावात अनंत मान्यांनी सादर केलाय, 'तोतया आमदार' या नावानं.

सवंग लोकप्रियेतेसाठी विधानसभेत लोककल्याणकारी कायदे करणारा आमदार आपल्या स्वतःच्या मतदारसंघात मात्र (खेडयात) हाच कायदा मोडून सत्ता आणि पैसा यांच्या मस्तीत भोळ्या-भाबडया जनतेला चिरडतो, फसवितो आणि याच कायद्याचं पालन जनतेला करावयास भाग पाडणारा पोलीसइन्सपेक्टर 'कायदा करणाऱ्यांनाच कायद्याचं पालन कर', असं ठणकावतो; परंतु पोलीसइन्सपेक्टरला हाय खावी लागते. आमदार यशस्वी होतो तोच जनता त्याला धडा शिकवते. असंच काहीसं अनंत माने याना या चित्रपटातून सागायचं आहे.

भ्रष्टाचारानं बरबटलेला आणि एक खून लपविण्यासाठी अनेक खून करणारा भुजंगराव मोहिते हा तोतया आमदार आणि त्याच्या खुनाचा शोध घेऊन त्याला धडा शिकवायच्या ईर्षेनं पेटलेला पोलीसइन्सपेक्टर १९८१ तून १९४७ सालामध्ये पुन्हा गेलं तर आमदाराच्या जागी पाटील दिसतो आणि पोलीसइन्सपेक्टरच्या जागी कल्लू दिसतो. तीस वर्षांनंतरसुद्धा अनंत माने याची 'contribution' म्हणजे काळाच्या ओघात, सद्य.परिस्थितीच्या रेटयात ते साचा तोच ठेवून पात्रांची नावं बदलतात, थोडे-फार समकालीन राजकीय संदर्भ देतात, काही भावनात्मक दृश्ये टाकून प्रेक्षकाना गुंगवितात आणि सादर करतात एक तोतया ग्रामीण चित्रपट.

माने काय किंवा दिनकर द. पाटील काय, त्यांनी इथल्या पाटलाला, सरपंचाला किंवा आमदाराला व्हिलन करायचं धाडस केलं हे कौतुकास्पद आहे; परंतु एवढ्यानंच इथली ग्रामीण वास्तवता आकार घेत नाही. तालुका, जिल्हा किंवा गावपातळीवर चाललेलं पैशाचं, सत्तेचं आणि जातीचं राजकारण या चित्रपटातून कुठंच दिसत नाही. दिसतो तो फक्त पाटील, आमदारांचा मस्तवालू रंगेलपणा, की जो आम्ही व आमचा प्रेक्षकही चवीने बघतो. इथं नावापुरता अत्याचार आणि बाकी वेळ करमणुकीच्या नावाखाली केलेला व्यापारच दिसतो. त्यामुळं गावच्या पाटीलवाडयावर अथवा चावडीवरच थाबलेला कॅमेरा बाहेर जातो तो फक्त तमाशा बघायला; पण तो कधीच गावकुसाबाहेरचं चित्रण करत नाही, महारवाड्यापाशी थाबत नाही की इथल्या बदलत्या परिस्थितीत संघर्षात उतरलेल्या 'दलिता'ला नायक म्हणून स्वीकारत नाही. त्यामुळं ग्रामीण परिसरातल्या शेतकरी, शेतमजूर अथवा दलितांची समस्या इथं मांडलीच जात नाही. मांडली जाते ती फक्त पाटलाची कथा आणि त्याचीच व्यथा !

खऱ्याखुऱ्या खलनायकाला नायक करून नायकाला मात्र लपविण्याचाच प्रकार इथं अजूनही चालू आहे आणि आमदार तोतयाच ठरत आहे.

—कलंदर


**NEW TITLES RECEIVED**

1. **Who is on First**–(Espionage thriller)–William Buckley Rs. 30/-
2. **Thy Neighbours Wife**–(Bestseller American Sexual, Social life)–Gay Talese Rs. 45/-
3. **The Perfumed Garden** – Shaykh Nefzawi
4. **Born Again** – (Water gate) – Charles W. Colson
5. **The Top of The Hill** – Irwin Shaw
6. **In Search of Identity** – (Autobiography)–Anwar el Sadat
7. **The Creation of Wealth** – (About the TATAS) R. M. Lala Rs. 55/-
8. **My own Boswell** – (Memoirs) – M. Hidayatullah Rs. 95/-

* If you have distaste for reading, read breath – takingly beautiful, artistically preserved books at the Phoenix !

THE PHOENIX LIBRARY
Opp Sadashiv Post, PUNE 411 030.

चित्रपटाबाहेर

# नर्गिस....

## एक उदात्त शुभ्रपण !

१९४५ ते १९६० या काळात हिंदी रजतपटावर आपले अढळ, हुकमी स्थान निर्माण करणारी नर्गिस आज निघून गेली आहे ! याच काळात नर्गिसच काय, तिच्या समकालीन असलेल्या मीनाकुमारी, मधुबाला, वहीदा, नूतन, वैजयंतीमाला, गीतादत्त, सुरैय्या यांची ओली स्वप्नं आज वाळली आहेत. या सर्व नायिकावर समरसून प्रेम करणाऱ्या त्या वेळच्या चित्रपटषौकिनाचं वयही आज नर्गिसइतकंच झालं आहे. त्यामुळं त्यांच्याजवळ फक्त ' त्या ' धुदफुंद काळाच्या पाऊलखुणा उरल्या आहेत. उरला आहे फक्त भारावून टाकणारा 'नॉस्टेलजिया !'

तो जमाना होता दिलीप-राज–देव या पुरुष नटांचा. पुरुषाचं वर्चस्व प्रतिबिंबित करणाऱ्या हिंदी रजतपटावर पुरुषाच्या बरोबरीनंच उभ्या राहणाऱ्या काही नायिका होत्या आणि त्यात नर्गिस होती !

आजच्यासारखी 'वन मॅन इंडस्ट्री' त्या वेळी नव्हती. पडद्यावर प्रेम करणाऱ्या नायक-नायिका पडद्यामागेही तितकेच प्रेम एकमेकांवर करत होत्या, तितकाच एकमेकाचा आदर करत होत्या. त्या वेळी ते वावगं वाटत नव्हतं. कारण दिलीप–नलिनी, राज–नर्गिस, देव–सुरैय्या या जोड्या इथल्या चित्ररसिकावर गोंदल्या गेल्या होत्या, वसलेल्या होत्या. पडद्यावर एकमेकांना बिलगण्यातला त्याचा सहजपणा इतका नॅचरल होता की तो अभिनय आहे असं म्हणायलाही कोणी धजावत नव्हतं आणि हेच नेमकं त्या वेळच्या चित्रपटकारानी हेरलं होतं आणि तेच पुन्हा पुन्हा चित्रपटांतून जोपासलं होतं. राज-नर्गिस ही याच जमान्यातली यशस्वी जोडी ! १९४८ च्या ' आग ' पासून ते १९५६ च्या ' जागते रहो 'पर्यंत लागोपाठ तब्बल सोळा चित्रपटात ही अवतरली. यामुळेच राजकपूरच्या आर. के. फिल्मचे बोधचिन्हही ' राजच्या बाहुपाशात नर्गिस ' असंच होतं. पुढे या बोधचिन्हाच्या रेघोट्या झाल्या तरी लोकानी या रेघोट्यानाही ' राज–नर्गिस ' म्हणून स्वीकारलं, यातच या काळाचं बोधचिन्ह सामावलं आहे. निदान १९५६ पर्यंत तरी नर्गिस, राजकपूर आणि दिलिपकुमार या दोन अभिनेत्यांबरोबरीनेच रजतपटावर जगली. दिलीप–राजशिवाय नर्गिसला थारा नव्हता आणि नर्गिसशिवाय दिलीप–राजला रुबाब नव्हता.

नर्गिस दिसायला फार सुंदर होती असंही नाही. नकटं नाक, झुपकेदार बॉबकट आणि अवखळ उच्छृंखल अभिनय तिच्या ठायी सामावला होता आणि हीच वैशिष्ट्ये घेऊन ती अनेक नायकाच्या हातावर मुक्तपणे वावरली, त्याना अगदी सहजपणे बिलगली. इथंच नर्गिसला चित्ररसिकानी दाद दिली. तिच्या बिलगण्याला, मुक्तपणाला भारावूनच चित्ररसिकांनी चुळबूळ केली आणि त्या वेळच्या तारुण्यसुलभ मनात ' मुक्त ' स्त्रीची प्रतिमा जोपासली. नर्गिसला पदोपदी त्रास देणारा तो हरहुन्नरी प्रियकर आणि याच प्रियकराला प्रतिसाद देणारा तिचा ' प्रेमाचा रुसवा 'ही तितकाच लोभस होता. प्रेमातील छेड-छाड, रुसवे-फुगवे, विरह आणि सरतेशेवटी सर्व काही मिळाल्याचा आनंद नर्गिसने पडद्यावर बिनदिक्कत वाटला. मस्तीत–मिजाशीत तिनं ही खुशी लुटवली !

अल्ट्रा मॉडर्न अशी भारतीय स्त्री तिने १९५६ पर्यंत रजतपटावर साकार केली. घोड्यावर रपेट मारणारी, जलक्रीडेचा आनंद घेणारी आणि प्रेमापुढे पैका–अडका तुच्छ मानणारी उच्छृंखल ललना तिने साकार केली म्हणूनच चित्ररसिकांना ती हवीहवीशी वाटली. १९५७ साली 'मदर इंडिया' झळकला आणि नर्गिसने तिच्याच अल्ट्रा मॉडर्न प्रतिमेला धक्का दिला. ती प्रतिमा पार विस्कटून टाकली !

' मदर इंडिया 'तील राधा म्हणजे मेहबूबखान या दिग्दर्शकाने इथल्या भारतीय स्त्रीचे केलेले उदात्तीकरण. हे उदात्तीकरण नर्गिसने तितकाच उदात्त अभिनय करून पेलले. अनेक विसंगतीनी भरलेल्या या चित्रपटात ' पब्लिक 'ला मोहवून टाकणारी मेहबूबखान या दिग्दर्शकाची खास शैली होती. नर्गिसच्या अभिनयाला जोम देण्यासही या शैलीचा प्रभाव नाकारणे शक्य नसले तरी नर्गिसने याच चित्रपटात अभिनयाचा कस दाखविला !

सर्व प्रकारचा छळ सोसून, केवळ सूडापायी अनावर झालेल्या आपल्या मुलाकडून ' नैतिक मूल्ये ' पायदळी तुडवली जात आहेत म्हणून स्वतःच्या मुलाला गोळी मारणारी राधा...नैतिक मूल्याचा विजय आणि मुलाच्या वियोगाचा पराभव असा एकाच क्षणी भारतीय स्त्री आणि आई हा दुहेरी भाव चेहऱ्यावर तिने दाखविला. चित्ररसिकांनी तर दाद दिलीच; पण पारितोषिकाचीही रांग लागली. नर्गिसने ' मदर इंडिया 'ची प्रतिमा अजरामर केली आणि ' मदर इंडिया 'ने नर्गिसला अजरामर केले !

काहीशी मनोविकृत स्त्रीची तगमग व्यक्त करणारा ' रात और दिन ' हा तिचा शेवटचा चित्रपट ठरला. रजतपटावरील नर्गिस इथे संपली ! मात्र ' जोगन 'पासून गवसलेले शुभ्रपण आणि ' मदर इंडिया 'मुळे मिळालेले उदात्तपण तिने पुढील आयुष्यभर जपले. उत्तानतेला, सवंगपणाला पडद्यावर कधीही स्थान न देणारी नर्गिस आपल्या 'घरेलु'पणात रमली. रुपेरी दुनियेत अभावानेच दिसणारी शालीनता, पातिव्रत्य, 'सॉफिस्टिकेशन' तिने आपल्या जगण्याने सिद्ध केलं. घरेलुपणाची स्वप्नं तिनंही रंगविली. मात्र आपल्या मुलाचा चित्रपट पाहण्याचं या राधेचं स्वप्न अधुरच राहिलं. तिचं जाणं आकस्मिक नसलं तरी तिच्या अपुऱ्या स्वप्नाची रुखरुख सर्वांनाच चुटपुट लावून गेली ! □

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

मॅक्झिम गॉर्की

सुमती देवस्थळे

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# णमो अरिहंताणं

मुखपृष्ठ २ वरून

हायवेवर त्याच दिवशी संध्याकाळी ह्याच अहिंसेच्या पुजाऱ्यांच्या गाड्या इकडे तिकडे उडत होत्या. रस्ता वाहतुकीला खुला झाल्याचा आनंद उपभोगत होत्या.

महावीर कोणाला समजला? वर्षानुवर्षे न चुकता गंध कपाळाला लावून दुधा-तुपाच्या अभिषेकाची व सोन्या-चादीच्या अलकारांची लाच भगवंताला देणाऱ्या लक्ष्मीदासाना? की २३ दिवस शांतपणे भजन करीत सत्याग्रह करणाऱ्या दरिद्री शेतकऱ्याना? प्रवचनांमध्ये मस्त देहावरील सुगंधी मुड्या हालवणाऱ्या आणि पोलीस संरक्षणात अर्वाच्य शिव्या देत दगडफेक करणाऱ्या शेटजीना की महात्मा गांधीचा वारसा सांगणाऱ्या, वाळक्या देहाने उन्हातान्हात बसून शातपणे सत्याग्रह करणाऱ्या हजारो गोविंदा-पायगोडांना?

गोळीबारात हुतात्मा झालेल्या आबा इंगळेच्या घरातील पाच माणसं मिलिटरीत आहेत. त्यांना मात्र भारतातल्या समतेचा हृदयविदारक प्रत्यय आला. ते भारतातल्या सरहद्दीवर, आपल्या गावापासून हजारो मैल दूर राहून गोळ्या खातात. आणि त्यांचा शेती बघणारा आबा गावात राहूनही गोळ्या खातो. हुतात्मा बनतो. राजकारण्याना भारतामध्ये हीच समता अभिप्रेत आहे काय?

२७ एप्रिल — शाम वसंतराव वैद्य, निपाणी

## भारतीय लिपी

¤ एका भारतीय लिपीची आवश्यकता माडताना (माणूस- १८ एप्रिल ८१) डॉ. शरद अभ्यंकर यांनी रोमन लिपीची चर्चा केलीआहे. त्यात ते म्हणतात, 'रोमन लिपीत फक्त २६ अक्षरे आहेत म्हणून ती शिकायला सोपी आहे.'

वास्तविक प्राप्त परिस्थितीत तरी हे विधान फसवे ठरते. कारण प्रत्येक अक्षराची दोन दोन रूपे सध्या आवश्यक समजली जातात. म्हणजेच एकूण अक्षराची (खिळ्यांची) संख्या ५२ भरते. दुसरे म्हणजे अक्षरांचा उच्चार निश्चित नसल्याने रोमन वर्णमाला ही स्वतंत्र लिपी म्हणून सिद्ध होत नाही.

तुलनेने 'आयुध'प्रणीत सरल मानक देवनागरी फक्त ४८ खिळ्यांवर बसवली आहे आणि मुळात देवनागरी असल्याने ती लिपी म्हणून स्वयंसिद्ध आहे. कोणत्याही देशी-विदेशी भाषेचे रेखाटन करणे तिच्याद्वारे शक्य आहे. सपर्क- 'आयुध' मासिकद्वारा चेतना मुद्रणालय, धुरूवाडी, रानडे मार्ग, दादर, मुंबई ४०००२८.

रवीन्द्र वाघ, मुंबई

¤ समाईक लिपीच्या बाबतीत सध्या बरीच हालचाल सुरू झालेली दिसत आहे. महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री डॉ. बळीराम हिरे यानी एक संशोधन समिती नेमली आहे. आपल्या देशातील सर्व भाषांसाठी एका लिपीचा वापर करण्याची शक्यता आहे का, यावर या समितीने संशोधन करावयाचे आहे. आपल्या राज्याचे भाषासंचालक समितीचे अध्यक्ष आहेत. वाईचे ख्यातनाम डॉ. शरद अभ्यंकर यांनाही या विषयात रस वाटू लागला आहे. एका भारतीय लिपीची राष्ट्राला कशी गरज आहे यावर तर्कशुद्ध मुद्देसूद विवेचन करून त्यानी देवनागरी लिपीची शिफारस केली आहे. (सा. मा. दि. १८/४) पण गंमत अशी की डॉ. हिरे व डॉ. अभ्यंकर या दोघाचीही घोडी वरातीच्या फार मागे राहिली आहेत.

सामाईक लिपीची वरात १९६४ साली निघाली. भाषापंडितांच्या एका समितीकडे भारत सरकारने हे काम सोपविले. आपल्या देशातील प्रमुख भाषाचे गाढे विद्वान या समितीचे सदस्य होते. या समितीचा अहवाल एकमुखी होता. ध्वनीशी सर्वस्वी निगडित अशी जगातील एकमेव जी लिपी (phonetic script)- देवनागरी लिपी, आपल्या देशाची सामाईक लिपी असावी अशी शिफारस या समितीने केली. हा अहवाल भारत सरकारच्या शिक्षणखात्याने १९६६ साली प्रसिद्ध केला. तेव्हापासून या अहवालावर धूळ साचत आहे. असे का ते देव व भारत सरकारच जाणे! अक लिहिण्याच्या बाबतीत अरेबिक अक्षरे वापरण्याची शिफारस या समितीने केली असावी असा माझा अंदाज आहे. १९६६ चा अहवाल बघितल्याशिवाय यासंबंधी जास्त लिहिणे उचित होणार नाही; पण भारत सरकारच्या हिंदी प्रकाशनात अरेबिक अक्षरांत अंक लिहितात. त्यावरून मी वरील अंदाज केला आहे. तामीळमध्ये अरेबिन अक्षरात अंक लिहितात. मुंबईच्या मराठी विज्ञान परिषदेच्या सर्व प्रकाशनात अंकासाठी अरेबिक अक्षराचा वापर केल्याचे दिसून येईल.

जे आधीच सापडलेले आहे तेच पुन्हा नव्याने शोधण्याचे श्रम करण्याच्या भानगडीत डॉ. हिरे यांच्या संशोधनसमितीने न पडलेले बरे. त्यामुळे कालव्यय व अफाट द्रव्यव्यय टळेल. विस्तारित देवनागरी लिपी ग्राह्य धरून या समितीने पुढील कार्यक्रम आखावा असे मी सुचवू इच्छितो.

दिनांक ११ एप्रिलच्या Times of India मध्ये श्री.इग्लासिया(R. IGLASIA) याचे समाईक लिपीबद्दल उद्बोधक पत्र 'माणूस' च्या वाचकांनी अवश्य वाचावे या लेखकाने उल्लेख केलेला १९६६ चा अहवाल मी मागविला आहे. त्याचा अभ्यास केल्यावर माझ्या मनातील कल्पनाना मूर्त स्वरूप येईल. नंतर महाराष्ट्र सरकारच्या समितीला मार्गदर्शक सूचना करण्याची मी उमेद बाळगून आहे!

सामाईक लिपी वापरात आणावी म्हणून पुष्कळ प्रचार करावा लागेल हे कोणीही नाकबूल करणार नाही. प्रचारातील धोक्याची स्थळे जाणून व ती कटाक्षाने टाळून प्रचार केला पाहिजे. अतीउत्साही प्रचारकांना काबूत ठेवले पाहिजे.या मुद्द्यावर श्री. वाकणकर यांचे विचार मननीय आहेत. ते म्हणतात, "देशातील संपर्कलिपी म्हणून भारत सरकारने परिवर्तित देवनागरीचा पुरस्कार केला आहे इतर लिप्या नष्ट करण्याचा त्यामागे हेतू नाही." आणखी एक मुद्दा मला सुचतो. समजा, एका भाषेच्या मूळ लिपीबरोबर त्या भाषेसाठी वैकल्पिक (alternative) लिपीचा वापर केला तर ती भाषा नष्ट होत नाही, उलट तिची वाढ होते. या मुद्द्याच्या पुष्टचर्थ दोन उदाहरणे देता येतील. हिंदी सैन्यातील भिन्न भाषिकांसाठी ब्रिटिश राज्यकर्त्यांनी रोमन लिपीत उर्दू भाषेचा वापर केला. सैनिकांच्या या भाषेला रोमन उर्दू भाषा म्हणतात. तिच्यामुळे उर्दू भाषेचा सर्व देशभर प्रचार झाला असे म्हणणे वावगे होणार नाही. कोकणी भाषेची हकिकत याहीपेक्षा गमतीची आहे. काहीजण कोकणीसाठी मराठी लिपी वापरतात तर काही जण कानडी लिपी. गोव्याचा ख्रिश्चनसाहेब मात्र कोकणी भाषेसाठी रोमन लिपी वापरतो. आता बोला!

२३ एप्रिल — मा. भा. ढवळे, पुणे